१२८६२
म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.

# चांदणवेल

## बोरकर

संपादक
कुसुमाग्रज
गो. म. कुलकर्णी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

28 FEB 1979

24 JUN 1979

19 AUG 1979

22 AUG 1979

5 SEP 1979

19 SEP 1979

10 OCT 1983

[ कृ.मा.प. ]

चांदणवेल

बोरकरांची निवडक कविता

संदर्भ
७९९५१
काव्य
१९.२.६३
२११५

[illegible] ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलमाव
अनुक्रम ७९९५१ । काव्य
क्रमांक २११५ ता. दि. १९/२/६३

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ७८५९

बोरकरांची निवडक कविता

# चांदणवेल

संपादक

कुसुमाग्रज
गो. म. कुलकर्णी

कॉन्टिनेन्टल प्रकाशन
पुणे ३०

प्रकाशक : अनिरुद्ध अनंत कुलकर्णी
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर कॉलनी, पुणे ३०.

मुद्रक : य. गो. जोशी
आनंद मुद्रणालय, १५२३ सदाशिव, पुणे ३०

मुखपृष्ठ : दलाल आर्ट स्टुडिओ, मुंबई
प्रथमावृत्ती : १९७२

© सर्व हक्क सुरक्षित
पुनर्मुद्रणाचे हक्क प्रकाशकाकडे

प्रकाशन क्रमांक : ५५१
किंमत पाच रुपये

## अनुक्रमणिका


प्रस्तावना । एक ते सव्वीस
निळावतीच्या दीपकळ्यांनो । १
कवि कोण । २
सांजवेळ । ३
तेथें कर माझे जुळती । ४
मुशाफिरा । ६
दूधसागरास । ८
सावल्यांचें नृत्य । १०
जलद भरुनि आले । ११
ते कर मन्मातेचे । १३
उर्वशीच तूं जाया । १५
सुर्मेवाला । १६
बांगड्या । १८
पाठमोरी पौर्णिमा । २०
माझी बेगम । २२
तुझें आगमन । २३
घरांतलें चांदणें । २४
स्मृति । २६
दुखणाइत दिवा । २८
माझा छंद । २९
सागराला आली जा । ३०
सांध्यसुंदरी । ३१
सागरास । ३२
जपानी रमलाची रात्र । ३५

साद । ३७
भिडली रात्र पहाटे । ३९
सायंप्रार्थना । ४०
गृहलक्ष्मीस । ४२
स्पर्श । ४३
सजवूं कार्तिकमास । ४४
शांतीचा जयजयकार । ४६
भंग्याच्या घरीं । ४८
आकाशमाऊलीस । ४९
जीवन त्यांना कळलें हो । ५०
अमृत खेचुनि आणूं भूवर । ५१
तव नयनाचें दल हललें ग । ५३
रुमडाला सुम आलें ग । ५४
साबरमतीच्या काठीं । ५५
माझ्या मनाची ' माऊ 'ली । ५७
क्षितिजाकडे । ५९
माझी पूजा । ६०
असलें हें फळ केवि तपाला ? । ६२
वास्तवता मज न दिसे । ६४
अजून थोडें सोस मना । ६६
खिडक्यांवर वाजे वारा । ६७
माझ्या गोव्याच्या भूमींत । ६९
हिरवळ आणिक पाणी । ७२
अद्भुत वारा । ७४
मी नंदाघरची बावडि ग । ७५
मज लोभस इहलोक हवा । ७७
माझें घर । ७९
श्यामा । ८१
सुटलेलें वेड । ८३
भिजले कुंतल । ८४

डाळिंबीची डहाळिशीं । ८५
काळी माया । ८६
शारदेचा भुल्या । ८७
झाडें झालीं निळीं निळीं । ८८
हिमाद्रीहुनी भव्य नक्षत्रमौली । ८९
ज्ञानदेव गेले तेव्हां । ९०
कामद्रुमाची डहाळी । ९१
हृदयच जेव्हां होतें कोकिळ । ९२
आतां नाहीं जवळ नि दूर । ९३
झालें हवेंचेच दही । ९५
प्रार्थना । ९६
वाढत्या सांजवेळे । ९८
सुखा नाहीं चव । ९९
फांद्यामधुनी चंद्र दिसावा । १००
दीस कसा तरी जातो । १०२
क्षितिजीं आलें भरतें ग । १०३
चित्रवीणा । १०४
मंद असावें जरा चांदणें । १०६
सरिंवर सरी आल्या ग । १०७
ती एक याद । १०८
कळत जातें तसें । १०९
पर्जन्याचीं पिसें सांडलीं । ११०
इंद्रदिनाचा असर सरेना । १११
फांदीसारखी झुकते सांज । ११३
चालले हे उंट कोठे ? । ११४
शिशासारखी भरली । ११५
विसर । ११६
आसवें । ११७
हळद लावुनी आलें ऊन । ११८
स्मरतें कधीं । ११९

तूं गेल्यावर । १२०
जळणाऱ्या जळत रहा। १२१
चांदणवेल । १२२
कृतार्थ । १२३
वळून बघता मागें । १२६



# प्रस्तावना

कवी बा. भ. बोरकर यांचा जन्म इ. स. १९१० मध्ये गोमांतकात बोरी येथे झाला. प्रापंचिक अडचणींमुळे त्यांना मॅट्रिकच्या पुढे फारसे शिक्षण घेता आले नाही. वयाच्या विसाव्या वर्षीच त्यांना गोव्यात शिक्षकाचा पेशा पत्करून राहावे लागले. सुमारे चौदा-पंधरा वर्षे ते याच व्यवसायात होते. १९४६ साली त्यांनी गोव्याच्या मुक्तिसंग्रामात उडी घेतली. पण राजकारणात ते फार काल रमू शकले नाहीत. १९५५ नंतर त्यांनी वाङ्मयविभागाचे संचालक म्हणून पुणे व गोवा आकाशवाणी केंद्रांवर काम केले आणि तेथूनच ते १९७० मध्ये, वयाच्या साठ वर्षांनंतर, सेवानिवृत्त झाले. १९४६ ते १९५५ पर्यंतचा बोरकरांच्या बाह्यजीवनाचा कालखंड कंटकमयच म्हटला पाहिजे. पण या कालखंडानेच त्यांना अधिक चिंतनशील बनविले, अंतर्मुख होण्यास शिकविले. परिणतप्रज्ञ जीवनाची व परिपक्व कलेची जाणीव करून दिली. जाळणाऱ्या आपत्तींनी कसे उजळून निघावे याचा पाठ दिला. मूळच्या श्रद्धान्वित वाणीला संस्कारित केले, पैलू पाडले.

वाणी हीच बोरकरांच्या जीवनाची अखंड सहचरी. विश्रमी, श्रमी, भ्रमी, ते तिचीच मूर्ती मनीमानसी आठवतात, आळवतात. जे सुचेल, रुचेल त्यावर लिहीत राहतात. तो त्यांचा नित्याचा व्यवहारच झाला आहे. वयाच्या चौदाव्या-पंधराव्या वर्षी त्यांनी कवितेची दीक्षा घेतली, तेव्हापासून आतापर्यंत त्यांनी तिच्या संकीर्तनात, आराधनेत खंड पडू दिला नाही. कधी मधुरकोमलकांतपदावलीने तर कधी दाठर जड चालीत, कधी स्फूर्तीमुळे तर कधी स्फूर्तीसाठी बोरकर गात असलेले, गाण्यात असलेले दिसतात.

बोरकरांचा पहिला काव्यसंग्रह 'प्रतिभा' हा १९३० मध्ये प्रसिद्ध झाला, पण बोरकर खरे रसिकांसमोर आले 'जीवनसंगीता' ने (१९३७). दहा वर्षांनंतर (१९४७ साली) प्रसिद्ध झालेल्या 'दूधसागर' ने रसिकमान्यतेचे हे शिक्कामोर्तब

कायम झाले. १९५० मधील 'आनंदभैरवी'ने या मान्यतेला थोडा ढळ पोचला; खुद्द बोरकरांचा आत्मविश्वास या काळात डळमळल्याचे 'आनंदभैरवी'च्या अर्पणपत्रिकेवरून वाटते. ही डळमळ एकप्रकारे स्वातंत्र्योत्तर काळातील विचलितश्रद्ध भारतीय मनाचीही प्रतिनिधी आहे. १९६० मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'चित्रवीणे'वरून बोरकर पुनश्च सावरलेले दिसतात. याच वर्षी, बोरकरांच्या पन्नासाव्या वाढदिवसाच्या निमित्ताने बोरकरांच्या तोंपर्यंतच्या कवितांचे एकत्र संकलन 'बोरकरांची कविता' या नावाने प्रसिद्ध झाले. श्री. मंगेश पाडगावकरांनी बोरकरांची घेतलेली प्रदीर्घ मुलाखत याच संकलनात आहे. त्यानंतर त्यांचे आणखी दोन काव्यसंग्रह निघाले. 'गितार' (१९६६) व 'चैत्रपुनव' (१९७०) त्यांनी कोकणीतही काव्यलेखन केले आहे. शिवाय कादंबरी, कथा, लघुनिबंध, चरित्र वगैरेसारख्या गद्याच्या क्षेत्रातही त्यांची काही मुशाफिरी आहेच. चित्र-संगीतादी कलांतही त्यांची गती आहे; पण ते विशेष रमतात कवितेतच.

बोरकरांचे काव्यलेखन चालू झाल्याला आता चाळीसाहून अधिक वर्षे झाली. या चाळीस वर्षांत मराठी कवितेच्या वळचणीखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. बोरकरांनी ज्या काळात काव्यलेखनाचा श्रीगणेश केला, तो काळ आधुनिक कवितेच्या कौतुकाचा होता; आजचा जमाना आहे 'नव' किंवा 'चालू' कवितेचा. आज मराठी कवितेचा चेहरामोहरा साफ बदललेला दिसतो. आजच्या जाणिवेतून कालच्या कवितेकडे पाहणाऱ्याला तीत वेधक असे फारच थोडे आढळते. अशा थोड्यांतच बोरकरांच्या कवितेचा अंतर्भाव होतो. काल-आजच्या भेदाची रेषाच बोरकरांच्या काही कवितांच्या बाबतीत पुसट होते, क्वचित पुसलीही जाते. पण ही किमया नेहमीच होते असे नाही. कधी ही कविता अपेक्षापूर्तींचा किंवा अनपेक्षित निर्मितिसौंदर्याचा आनंद देते तर कधी अपेक्षाभंगाचे दुःख. बोरकरांच्या कवितेत प्रवाहीपणाबरोबरच मागे-पुढे; पुढे-मागे हिंदकळत राहण्याचीही क्रिया आढळते. या क्रियेचे मूळ बोरकरांच्या द्विविध स्वरूपाच्या व्यक्तित्वात असावे.

या व्यक्तित्वात ऐहिकता आणि आध्यात्मिकता, प्रेय आणि श्रेय, पाश्चात्त्य आणि पौर्वात्य, प्रचारप्रवणता व शुद्धरसपानदृष्टी, कला आणि कारागिरी, दृढ परंपराप्रेम व मुक्त 'मंचर'वृत्ती यांचे चमत्कारिक मिश्रण झाले आहे. या द्वंद्वांच्या क्रिया–प्रतिक्रियांतून कधी अभिजात कलाकृती सिद्ध होते तर कधी शब्दबंबाळ गारुड जन्माला येते. स्वकवितेच्या या यशापयशाचा तटस्थपणे विचार करण्याची क्षमता असूनही बोरकर त्या दिशेने कधी

प्रवृत्त झाल्याचे दिसत नाहीत. या बाबतीत निदान बाह्यतः तरी ते बेफिकीर वाटतात. काव्यदेवीच्या वनातले गंधमद्य पिऊन त्याची धुंदी आत्मरतपणे ते अनुभवू पाहतात आणि असे असूनही आपण ‘ कवी ’ असल्याचा विसर इतरांना पडू नये, अशीही त्यांची इच्छा असते. आपल्या कविप्रतिमेची जपणूक ते कसोशीने करितात. आपल्या ओठी सुंदरतेच तरल तराणा तरळत राहिलेला दिसावा म्हणून ते शिष्टसंमतमार्गापेक्षा अक्षुण्ण वाटेने पद-न्यास करीत असल्याचा भास कधीकधी होतो. या बहिर्मुख आविर्भावाबरोबरच जनमर्यादा धरून अमर्याद गवसणार नाही; असेही केशवसुतांप्रमाणे बोरकरांना वाटत असावे. केशवसुतांची कविता बोरकरी वृत्तींना एकंदरीने मानवणारी नव्हे; केशवसुतांच्या कवितेतील ‘ चिरविद्रोही ’ ‘ वारसवन्ही ’ला बोरकरांजवळ तसे स्थान नाही; * पण केशवसुतांचा ‘ झपूर्झा ’ मंत्र मात्र वाडेकोडेपणे नाचतगुंगत म्हणावा, असे बोरकरांना मनापासून वाटते. ज्ञाताच्या कुंपणावरून उड्डाण करून चिद्घनचपलेच्या मागे धावणाऱ्यांपैकी शेकडा नव्याण्णव होरपळून जातात; याची बोरकरांना याद नसेलच असे नाही, पण आपण या नव्याण्णवातील नसून ‘ हजारांतील एखादे ’ आहोत, असा त्यांना विश्वास वाटत असावा; शिवाय होरपळावे लागले तरी ‘ जळण्या ’चे म्हणून काही ‘ सुख ’ असते, असेही ते तत्त्वतः मानतात. त्याग-भोगाचे, जगण्या-मरणाचे, एक विशिष्ट तत्त्वज्ञान, संचित बोरकरांनी आपल्याभोवती कडेकोटपणे उभे केले आहे. या तटबंदीच्या आड राहून जीवनातील सारे शापताप ते थोपवू पाहतात. ही तटबंदी इतरांच्या दृष्टीने अभेद्य असेल-नसेल; बोरकरांची तरी तशी श्रद्धा आहे आणि या श्रद्धेचे उच्चारण, उद्घाटन त्यांच्या कवितेतून वारंवार होते.

व्यक्तिमत्त्वाच्या विविध प्रकारच्या वर्गीकरणांत ‘ अध्यात्मवादी ’ व ‘ भौतिक-वादी’ असेही एक वर्गीकरण समाविष्ट केल्यास, बोरकरांची गणना ‘अध्यात्मवादी’ गटात करावी लागेल. हे वर्गीकरण तसे निरपवाद नाही. कालचा अध्यात्मवादी आज भौतिक-वादी किंवा उद्याचा अध्यात्मवादी परवा भौतिकवादी बनणे अशक्य नाही. पण बोरकरांच्या बाबतीत तरी या प्रकारच्या परिवर्तनाची शक्यता कमी वाटते. बोरकर अध्यात्माच्या विचारधारेशी कमालीचे एकरूप झालेले आहेत. गाथापोथी वाचणाऱ्या कौटुंबिक वारशाने, व्रतवैकल्याने व्यापलेल्या भोवतालच्या वातावरणाने, आसमंतात पसरलेल्या देवळारावळांमुळे आणि अवतीभवती विहरणाऱ्या निसर्गाच्या गूढरम्य विलासितांच्या प्रत्यक्षानुभूतीमुळे

* वरील दोन्ही शब्द बोरकरांनीच ‘ हे केशवसुत ’ या ‘ चैत्रपुनव ’ मधील कवितेत वापरलेले.

बोरकरांना या अध्यात्मप्रवण विचारधारेची दीक्षा मिळाली असावी. बोरकरांच्या कवित्वाचा अंकुर तरारला तोही यातूनच. कवितेच्या आशय-अभिव्यक्तीची दिशा नियत होण्यासाठी या श्रद्धाशीलतेने साह्य केले. अधिक चिंतन-मनन-वाचनाने त्यांनी ही श्रद्धा पुढे चिरेबंद करून टाकली. तिला जीवननिष्ठेचे स्वरूप दिले. नंतरच्या काळात बोरकरांत जो काही थोडाफार बदल झाला. तो आविष्काराच्या अंगाने. मूळच्या श्रेयप्रचुर प्रेरणांना तसा कधी तडा गेला नाही. या प्रेरणांतून निर्माण होणारे आशयाचे ताण पूर्वसिद्धच राहिले. बोरकरांच्या प्रेमकल्पनेचा, निसर्गगौरवाचा, कलाधारणेचा, संस्कृतिविचाराचा, ज्ञानोबापासून विनोबापर्यंतच्या संतस्तोत्रांचा, दिव्यत्वविषयक प्रचीतीचा किंवा गांधीजीवनावर 'महात्मायन' रचण्याच्या संकल्पाचा बीजमंत्र अध्यात्म हाच आहे.

या 'मराठीच्या नगरी' ला हा मंत्र तसा नवा नाही. ब्रह्मविद्येच्या सुकाळाची प्रतिज्ञा मराठी भाषेहूनही फार प्राचीन आहे; पण ब्रह्मविद्येची पारंपरिक बैठक व हे नूतन 'अध्यात्म' एक नव्हेत. पारंपरिक अध्यात्मचिंतन आत्मानात्मविचारावर भर देणारे तर हे आधुनिक अध्यात्म ऐहिकाच्या ऐश्वर्यात्मक सामर्थ्यांच्या जयजयकाराने दुमदुमलेले. या नवीन अध्यात्मात पार्थिवाला अपार्थिवापासून विलग करण्याची भूमिका अभिप्रेत नाही. पार्थिवातच अपार्थिवाचा गाभा शोधणे, हे या अध्यात्माचे उद्दिष्ट आहे. या अध्यात्माची परिभाषा जरी भारतीय असली तरी युरोपातील मानवतावादाचा, ऐहिकाच्या महतीचा, निसर्गविषयक नव्या जाणिवांचा, या अध्यात्मावर फार मोठा प्रभाव पडलेला दिसतो. त्यात पूर्व आणि पश्चिम यांचा एक व्यापक, काव्यात्म संघात, समवाय अनुस्यूत आहे. केशवसुतांच्या स्वर्भूसंगम कल्पनेतून, बालकवींच्या निसर्गस्तोत्रांतून, रे. टिळकांच्या खिस्तविषयक विचारांतून, 'बी' च्या चिद्विलाससदृश उद्‌गारांतून किंवा तांबे यांच्या 'ल्हादैकमय'तेच्या संकल्पनेतून हे नवे अध्यात्मच स्रवते.

या अध्यात्माची विकसित आणि उल्हसित प्रस्फुरणे टागोर-अरविंदांच्या साहित्यातून विशेषत्वाने प्रकटतात. विश्व ही एक परमेश्वरनिर्मित अविस्मरणीय कलाकृती, स्वर-सौंदर्याने नटलेली वीणा आहे ;कलावंताच्या हळुवार अंगुलीने स्पर्श केल्यासच ती मुखरित होते; तीतून सकलेंद्रियमोही संगीत पाझरते; निसर्गाच्या, कलेच्या, एकंदर मानवी व्यापांच्या अंगोपांगांतून हा विश्वसंमोहनाचा साक्षात्कार अनुभविणे, हीच मानवाची श्रेष्ठतम साधना होय, असे टागोरप्रभृती कलावंत मानतात; सत्य-शिवाचे अवतरणही यातनच होईल, नवा महामानव जन्माला येईल, अशीही श्रद्धा यामागे आहे. हा एकप्रकारचा 'सौंदर्यवाद' च; पण प्रचलिताहून थोडा वेगळा.

या प्रकारच्या सौंदर्यवादाचे मराठी साहित्यातही अवतरण झाले, पण ते टागोर-अरविंदांच्या साहित्यातील अवतरणाइतके रसोत्कट, आनंदोद्रेकी किंवा कल्लोळपूर्ण नाही. तांबे, बी व बोरकर हेच त्याचे मराठीतील प्रमुख प्रतिनिधी. त्यांतल्या त्यात बोरकर हे टागोर-अरविंदांना या बाबतीत अधिक जवळचे. बोरकरांनी ही जी जवळीक साधली ती उत्तर-कालात; प्रारंभकाली त्यांच्यासमोर प्राधान्याने जो आदर्श होता तो तांबे यांचा. तांबेनिर्मित 'मधुघटां' चे बोरकरांनी मुक्तपणे आकंठ प्राशन केले. बोरकरांच्या रसयात्रेचा प्रारंभ झाला तो या तांबेदत्त पाथेयाने. तत्पूर्वीचा त्यांचा प्रवास ठेचकाळत, अडखळत चाललेला होता. बोरकर जे रसपूर्ण कवी झाले ते क्रमशः, उत्क्रांतिमार्गाने, पूर्वसूरींचे बोट धरून.

बोरकरांनी ज्या वेळी आपला पहिलावहिला काव्यसंग्रह प्रसिद्ध केला ( १९३० ) त्या वेळी केशवसुतांनी मराठी कवितेत केलेल्या क्रांतीला अर्धशतक होत आले होते. केशवसुतांनंतर आधुनिक कवितेची धुरा वाहणारे गोविंदाग्रज, बालकवी, रे. टिळक, रेंदाळकर इत्यादी कविश्रेष्ठ १९२० च्या आसपास आपले जीवितकार्य संपवून गेले होते. याच सुमारास लो. टिळकांचे निधन झाले आणि गांधीयुगाला सुरुवात झाली. पहिल्या महायुद्धाचा शेवट झाला तोही याच सुमारास. रविकिरणमंडळ व तांबे यांचे काव्य वाजू-गाजू लागले ते यानंतरच्या लगतच्या काळात. आधुनिक कवितेच्या दृष्टीने केशवसुतांची पहिली पिढी कल्पिली तर गोविंदाग्रज-बालकवी यांची गणना दुसऱ्या पिढीत होते. रविकिरण हे तिसऱ्या पिढीचे; तांबे हे वयाने ज्येष्ठ असले तरी त्यांचा परिचय महाराष्ट्राला रविकिरणमंडळाच्या कालातच झाल्याने तांबे यांचाही अंतर्भाव तिसऱ्या पिढीतच करावा लागतो. बोरकर, कुसुमाग्रज, इंदिरा संत, संजीवनी मराठे वगैरे कवि-कवयित्रींचा समावेश चौथ्या पिढीत होतो. साहजिकच बोरकरांना किंवा त्यांच्या समकालिनांना केशवसुतांच्या कवितेपेक्षा गोविंदाग्रज-बालकवींची व त्याहीपेक्षा रविकिरण-तांबे यांची कविता कालदृष्ट्या अधिक जवळची होती. गेय चाली, सफाईदार रचना, नवलेखनतंत्र, मध्यमवर्गीय सुशिक्षितांच्या सुखदुःखांना परिमित प्रमाणात या कवितेतन फुटलेली वाचा; इत्यादींमुळे रविकिरणमंडळाच्या कवितेचा बोलबाला, बोरकरपूर्व कालात फार झाला.

तांबे यांच्या कवितेची एकंदर बैठकच रविकिरणमंडळाहून वेगळी. स्थूलपणे बोलावयाचे झाल्यास रविकिरणमंडळाच्या प्रेरणा पाश्चात्त्य संस्कृती व तज्जन्य सुधारणा-वादात आढळतात, तर तांबे यांच्या कवितेचे अधिष्ठान पौर्वात्य तत्त्वविचार हे आहे. तांबे यांच्या कवितेवर नवसंस्कृतीचा काहीच प्रभाव नाही, असे नव्हे; कालिदास, जयदेव, मम्मटाप्रमाणे टेनिसन वर्ड्स्वर्थ, ब्राउनिंग इत्यादींचाही ठसा तांबे यांच्या कवितेवर

उमटलेला आढळतो. पण एकंदर प्रकृतिधर्म आहे तो पौर्वात्यानुगामी. या विशिष्ट प्रकृति-धर्मामुळेच तांबे 'आनंदयात्री'ही बनले. तेही विश्वसौंदर्याला 'हरिची कारागिरी'च मानतात. विश्वाचे रंगरूप बाह्यतः जरी द्वंद्वात्मक वाटले तरी त्याचा स्वभाव आनंदपूर्ण आहे; विश्वाच्या नादरूपरंगात हा आनंद ओतप्रोत भरलेला आहे; अशीच त्यांचीही श्रद्धा.

"I look upon the visible world as the expression of joy itself! It is joy that has emanated itself in the innumerable forms and names. Thus, while joy or bliss is the very nature of the structural frame–work of the universe, it is its very essence, its very nature, sorrow is only foreign to it." *

हे त्यांचे उद्गार याचेच निदर्शक. 'आनंदी आनंद', 'अनंतस्तोत्र', 'मंदिरीं मना, तव गान भरे' यांसारख्या त्यांच्या कवितांतून हाच आशय उद्घोषित होतो. 'मंदिरीं मना, तव गान भरे' मध्ये तर ते 'माधुर्यच माधुर्य भरे...माधुर्याविण कांही न दुसरें' असे निःशंक आनंदोद्गार काढतात.

तांबे–टागोर यांच्यामधील श्रद्धासाम्य, कलासक्ती व संगीतप्रेम लक्षात घेता, त्यांचे समानधर्मत्व वेगळे विशद करण्याची आवश्यकता नाही. बोरकरही तांबे–टागोरांकडे का आकृष्ट झाले, तेही यावरून स्पष्ट व्हावे; बोरकरांच्या मूळ निष्ठा या साऱ्यांना समानच आहेत; पण या निष्ठांचे धूसरत्व दूर होऊन त्यांना विशिष्ट घाट येण्याच्या संदर्भात तांबे यांची कविता बोरकरांना विशेष प्रेरक ठरली. यामुळे बोरकरांच्या कलाजीवनात व त्यांच्या विकासात तांब्यांना अतिशय महत्त्वाचे स्थान लाभले.

कालदृष्ट्या, तांब्यांच्याही आधी बोरकरांवर जो प्रभाव होता, तो बालकवींचा. बाल-कवींच्या निसर्गरमणीय कवितेवर साऱ्याच रसिकांची मुरकुंडी पडते. बोरकरांसारख्या निसर्ग-सौंदर्याच्या कुशीतच वाढलेल्या कवीला तिने संमोहित करावे, यात नवल नाही; पण असे असूनही बोरकर बालकवींशी पूर्णतया तदात्म होणे शक्य नव्हते. बालकवींच्या कवितेतून प्रकट होणारा सुप्त दुःखभाव, बोरकरांसारख्या ईश्वरवाद्याला अनोखाच वाटणारा. बोरकर दुःख-व्यथेशी जवळीक साधतात, पण या दुःखभावाला जिव्हारी झोंबणारी धार सहसा चढत नाही. 'लोचनीं ये आज पाणी' अशी कितीही आर्त आळवणी ते करीत राहिले तरी या ओघळणाऱ्या अश्रूंतून त्यांना शेवटी दिसणारे दृश्य 'चेतोहर'च असते; बोरकरांसारखी श्रद्धान्वित माणसे खाईतही स्वर्गच पाहतात. या

* 'राजकवी तांबे यांचा साहित्यविषयक पत्रव्यवहार' पृ. १४

मंडळींचा निखळ ' Tragic Vein ' शी तसा आंतरिक संबंध प्रस्थापितच होऊ शकत नाही. ' मरणांत खरोखर जग जगतें ' असे मानणाऱ्या या धारणेला एक प्रकारची तृप्ती, तितिक्षा, संथ सोशिकपण वेढून राहते. स्वाभाविकपणेच या वृत्तीच्या कलावंतांच्या कृतीतही मग ते उतरते. तांबे-बोरकरांची कविताही या नियमाला अपवाद नाही.

तांबे-बोरकरांना बळकटपणे जोडणाऱ्या वरील दुव्याबरोबरच निसर्गप्रीती, स्त्रीप्रेम-विषयक कल्पना, कलाविषयक विशिष्ट जाणीव, संगीतप्रवणता, इत्यादींसारखे आणखीही काही घटक या उभयतांतील ऋणानुबंध दृढ करितात. म्हणूनच ' माझे हात आता थकले आहेत आणि कान तुमच्याकडे लागले आहेत ' असे उद्‌गार तांबे बोरकरांना उद्देशून काढतात तर तांबे यांची कविता प्रथम हाती आली, त्या वेळी आपल्याला ' चिंतामणी गवसल्याचा आनंद झाला ' असे बोरकर म्हणतात. बोरकरांची तांबेविषयक ही आदर-बुद्धी इतरही अनेक प्रकारे व्यक्त झाली आहे. ' कविवर्य तांबे यांच्या घराण्याची गायकी पुढे चालविण्याच्या निष्ठेने मी कलेच्या उपासनेला लागलो ' असे ' जीवनसंगीता 'च्या प्रास्ताविकात बोरकरांनी उद्‌गार काढले आहेत. हा संग्रहही त्यांनी तांबे यांनाच अर्पण केला आहे. किंबहुना, ' कविवर भास्कर गावा ' हे या संग्रहाचे धृवपदच बनले आहे.

पण बोरकर म्हणजे तांबे यांची निर्जीव प्रतिकृती नव्हे. विशिष्ट काळात तांबे यांच्या कवितेने बोरकर प्रभावित झाले असले, या कवितेला त्यांनी आप्तवाक्याप्रमाणे जपले असले, तरी ते या आप्तवाक्याजवळच थांबले नाहीत. तांबे यांच्या कवितेतील स्वपोषक रस घेत घेत बोरकरांच्या कवितेने तांबे यांच्याही पुढचा पल्ला गाठला. ' जीवन-संगीता'नंतर प्रसिद्ध झालेल्या ' दूधसागर 'मध्ये याची प्रचीती येते. ' दूधसागर ' मधील ' बांगड्या ', ' सुर्मेवाला ', ' संध्याकाळीं उमललेली कळी ' यांसारख्या कविता तांबे घाटाच्या असूनही त्यांची जडणघडण अधिक डौलादर वाटते. ' दूधसागर ', ' जलद भरुनि आले ', ' सांवल्यांचें नृत्य ', 'पाठमोरी पौर्णिमा', 'स्मृति' यांसारख्या कवितांतील नाट्य वा नजाकत बोरकरांच्या वाढत्या निर्मितिसामर्थ्याची साक्ष देणारी. त्यांतील नखरेल-पणाही खास बोरकरी ढंगाचा.

बोरकर आणि तांबे यांच्या प्रकृतीत काही प्रमाणात साम्य असले तरी बऱ्याच प्रमाणात वेगळेपणही आहे. उभयतांच्या परिसरातील आणि युगप्रवृत्तीतील भिन्नत्वही दुर्लक्षिता न येण्याजोगे. तांबे कितीही रसलोलुप व सौंदर्यवादी वृत्तीचे असले तरी त्यांची ही रसलोलुपता विशिष्ट गृहस्थी बाण्याने सीमित झालेली आहे आणि त्यांच्या सौंदर्य-

वादाला अभिजातवादाची मोठी मुरड पडली आहे. बोरकर तुलनेने अधिक कलंदर वृत्तीचे आणि कमी सांकेतिक वाटतात. परिसरदृष्ट्या तर उभयतांतील फरक फारच ठळक तांबे इंदोर-ग्वाल्हेरसारख्या संस्थानी, सरंजामी वातावरणात व बलभीमबुवासारख्यांच्या साध्याभोळ्या श्रद्धेत रुळलेले तर बोरकर गोव्यातील लॅटिन संस्कृतीत वाढलेल्या नोकदार आधुनिक ख्रिस्ती समाजाशी संपर्क साधणारे. ही संस्कृती विशेष जीवनरसिक व कलाविलासी मानण्यात येते. बोरकरांच्या प्रकृतीवरही तिचा संस्कार उमटणे, स्वाभाविकच. कला आणि साहित्याच्या क्षेत्रात दान प्रॉपेर्सिय कुरैय आफाँसु ई फिगैरेदुसारख्या युरोपीय संस्कृतीत मुरलेल्या कलाभिज्ञ विदुषीचे बोरकरांना मार्गदर्शन लाभले; हेही या अनुषंगाने लक्षात घेण्यासारखे. भारतीयांचे आत्मदर्शन व ग्रीकांची सौंदर्यदृष्टी यांचा संगम बोरकरांत घडावा, अशी या विदुषीची इच्छा असल्याचे बोरकर सांगतात. * बोरकरांच्या कवितांचा आशय व अभिव्यक्ती, त्यातील मानवी व अतिमानवी घटकांचे मिश्रण जाणून घेण्याच्या दृष्टीने त्यांचे हे निवेदन महत्त्वाचे.

ग्रीकांच्या सौंदर्यदृष्टीचे मर्म पाश्चात्त्य साहित्याच्या अध्ययनाने, आणि पौर्वात्यांच्या आत्मदर्शनाचे स्वरूप मराठी संतांच्या अभ्यासातून, बोरकरांनी आत्मसात केलेले असणेही शक्य आहे. भौतिक व आत्मिक सौंदर्यदर्शनाचा लाभ एकत्रटपणे करून देण्याच्या बाबतीत ग्रंथांचा ‘ रावो ’ टरलेली ‘ ज्ञानेश्वरी ’ तर बोरकरांची जीवनसाथीच बनलेली. ज्ञानेश्वरीच्या शब्दकलेचे, पदलालित्याचे ऋण बोरकरांची शैली सातत्याने वागवीत आली आहे. बोरकरांची रचना, चतुर व शहाणी होण्यासही ज्ञानदेवीने बरेच साह्य केले असावे. गोमांतकीय संतकवी सोहिरोबा अंबिये यांच्या पदरचनेचा व गोमांतकातील लोकगीतांचाही काही एक ठसा बोरकरांच्या शैलीवर उमटलेला दिसतो. बोरकरांचे व्यक्तित्व व कवित्व असे संस्कारबहुल आहे. त्यात आपाततः परस्परविरोधी वाटणारेही काही प्रवाह आहेत. या रसलंपट कवीवर रमवर्ज्य दिसणाऱ्या गांधीजींचा असलेला प्रभाव अशांपैकीच.

बोरकरांच्या संस्कारसहज वयातच गांधीजींचा उदय झाला. १९२० नंतरच्या स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंतच्या कालखंडावर राजकीयदृष्ट्या अधिराज्य होते ते गांधीजींचेच. स्वातंत्र्यपूर्वयुगातील मध्यमवर्गही आजच्याहून अधिक राजकारणाभिमुख असलेला. पण बोरकरांचे गांधीजींविषयक आकर्षण केवळ राजकीय स्वरूपाचे नाही. बोरकर गांधीजींकडे पाहतात ते महामानवाचा एक आधुनिक अवतार, आध्यात्मिक कृतिशूरतेचे, नैतिक सौंदर्याचे एक भव्योदात्त, करुणकोमल प्रतिनिधी म्हणून. बोरकरांना कलासौंदर्याचा पाठ इतर अनेकांकडून

* ‘ बोरकरांची कविता : एक चर्चात्मक संवाद, ’ पृ. ४४.

मिळाला असेल; पण कृतिसौंदर्याचे प्रात्यक्षिक त्यांनी जे पाहिले, अनुभविले ते गांधी-जीवनाच्या द्वाराच. बोरकरांचा 'महात्मायन' रचण्याचा संकल्प किंवा राजकारणात सहभागी होण्याची त्यांची ऊर्मी यातनच उदित झालेली. 'आनंदभैरवी'त गांधीजींच्या जीवनावर व मरणावर आधारलेल्या बऱ्याच कविता आहेत. ('साबरमतीच्या कांठीं' 'सायंप्रार्थना', 'त्यांना जीवन कळलें हो', 'आमार जीबनइ आमार बानी', 'भंग्याच्या दारीं', 'असलें हें फळ कैंवि तपाला' इ.)

गांधीजींचे भारतीय राजकारणातील प्रभुत्व चालू असताच समाजवादी विचारांचे ज्वालाग्राही तत्त्वज्ञान भारतात प्रादुर्भुत झाले. दीप्त तरुण मनाला त्याचे अधिक प्रलोभन वाटणे स्वाभाविक होते. बोरकरांना समवयस्क असलेल्या कुसुमाग्रजांची प्रतिभा समाज-वादाच्या धगधगत्या जाणिवेने या काळातच पेटून उठली. 'क्रांतीचा जयजयकार' गर्जू लागली. या ज्वालेने इतरही अनेकांना ग्रासले; पण बोरकरांसारखा मनस्वी आणि भावक्षुब्ध कवी यापासून अलिप्तच राहिला. क्रांतीऐवजी 'शांतीचा जयजयकार' गाऊ लागला. याला बोरकरांना वाटणारे गांधीजींविषयक वैयक्तिक आकर्षणच अधिक कारणीभूत आहे. आचार्य कालेलकरांसारख्यांच्या सान्निध्यात येऊनही बोरकर गांधीजींच्या तत्त्वज्ञानाशी तसे तद्रूप झालेले दिसत नाहीत. इतर अनेकांप्रमाणे बोरकरांनाही गांधीजी जे जाणवतात, ते 'मूळ भारतीय आर्यत्वा'चे मूर्तिमंत प्रतीक म्हणून; बोरकरांची भारतीय अध्यात्माविषयीची ओढही त्यांना गांधीजींच्या व्यक्तित्वाकडे आकृष्ट करण्यास कारणीभूत झाली असावी. ही ओढ तशी एकंदरीने रोमॅन्टिक स्वरूपाचीच.

यामुळे बोरकर काही काळ राजकारणात पडले तरी ते तेथे फार काळ रमू शकले नाहीत. या काहीशा कमलभक्षक वृत्तीच्या कवीला हे राजकारण मानवण्यासारखे नव्हतेच; तो त्यांचा प्रकृतिधर्म वाटत नाही. स्वप्रकृतिधर्माला सोडून त्यांनी लिहिलेल्या बऱ्याच कविता 'आनंदभैरवी'त समाविष्ट झालेल्या आहेत. त्यांतील घोपट प्रचारकी सूर त्यांचा त्यांना सुद्धा कर्कश वाटला असावा, म्हणूनच 'माझ्या भावगीतांची ही भैरवीही असेल, पण मी ती आनंदाने गायलेली आहे' असे उद्गार त्यांनी 'आनंदभैरवी'च्या प्रारंभीच काढले. आहेत. कला आणि प्रचाराच्या पुस्तकी वादात येथे शिरण्याची आवश्यकता नाही, तथापि बोरकरांच्या राजकीय जाणिवेच्या कविता, बोरकरांच्याच भाषेत बोलावयाचे तर 'अनुप्राणित' वृत्तीतून स्फुरलेल्या वाटत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. बोरकरांनी खास सामाजिक जाणिवेवर आधारलेल्या कविता लिहिलेल्या नाहीत; त्यांच्या गद्यलेखनात

येणारा सामाजिक संदर्भ कवितेत अभावानेच आढळतो, हेही येथे लक्षात घेण्याजोगे आहे.

बोरकरांची कविदृष्टी परिस्थितिसापेक्ष जीवनव्यापारापेक्षा परिस्थितिनिरपेक्ष मानवी विचार-विकारांवर केंद्रित होते. ती समकालीन मूर्त समाजव्यवहारापेक्षा समाजनिरपेक्ष अमूर्त अशा सनातनतत्त्वाशी उतावीळपणे नाते जोडू इच्छिते किंवा साऱ्या जीवन-व्यवहाराकडे पूर्वसिद्ध संकल्पनांच्या चष्म्यातून तरी पाहते. यामुळे ही दृष्टी एका बाजूने मूलगामी वाटते तर दुसऱ्या बाजूने आवर्तनशील, पुनरुक्तिप्रवण व संकेतनिष्ठ. मध्यंतरीच्या काळात त्यांनी थेटपणे जीवनानुगामी होण्याचा प्रयत्न केला, पण त्यांचे हे जीवनानुगामित्व निखळ स्वरूपाचे न राहता ते प्रचाराच्या भलत्याच फाटयाला जाऊन भिडले. प्रवासाचे या प्रकारचे पर्यवसान, बोरकरांनाही अभिप्रेत नसावे; त्यामुळे काही काळ तरी त्यांची स्थिती रानभरी झाली. 'आनंदभैरवी'तील 'वास्तवता मज न दिसे' वरील जोर केवळ परिहासविजल्पितात्मक मानण्याचे कारण नाही. त्यात खुद्द कवीच्या या काळातील द्विधाचित्तत्वाचेही प्रतिबिंब उमटलेले आहे. याच संग्रहातील त्यांची 'करी मला वज्रदेही' ही कविताही या संदर्भात महत्त्वाची. डोळे असून आंधळा झाल्याची व पाय असून पांगळा पडल्याची जाणीव या कवितेत अतितीव्रपणे डंख करीत असल्याचे आढळते. हा डंख केवळ व्यक्तिगत नसला तरी त्यातील व्यक्तिगत घटकामुळे तो दाहक झाला आहे. बोरकरांची ही द्विधावस्था संपल्याचे व ते नागमोडी वळण घेऊन पुन्हा पूर्वपदावर आल्याचे 'चित्रवीणे'वरून स्पष्ट होते. 'गितार' व 'चैत्रपुनव' याचीच ग्वाही देतात. 'प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति' हे तत्त्व बोरकरांच्या बाबतीत तरी खरे ठरले आहे.

अलौकिकाच्या अंगाने, निसर्ग-प्रेम-कलांतील लौकिक सौंदर्याचे आस्वादन करणे ही बोरकरांची मूळ प्रकृती. या प्रकृतिधर्मामुळेच श्री. मंगेश पाडगावकरांना दिलेल्या मुलाखतीतून 'कवि हा जिवा-शिवाचं साफल्य अनुभवतो तेव्हा त्याचा अनुभव कला-कृतीतून आविष्कृत होतो; अनुभव शिवाचा, पण तो बोलतो जिवाच्या परिभाषेत' † सारखी विधाने बोरकरांच्या मुखातून बाहेर पडतात. महाबळेश्वर व मुंबई येथील संमेलनांच्या अध्यक्षपदांवरून अगदी अलीकडेच ( १९७० ) त्यांनी केलेली भाषणे त्यांच्या या विशिष्ट भूमिकेचीच साथ करतात. काव्यसाधना ही अध्यात्मसाधनाच आहे; आत्म-विद्येचा हा एक आगळा आणि लोभसवाणा आविष्कार आहे; असे या संमेलनांतून त्यांनी आवर्जून मांडले. हे विचार तत्त्वतः सर्वांना मान्य होण्यासारखे नसले आणि खुद्द बोरकरांची काव्यसाधना या कसोटीला कितपत उतरते, हे प्रश्नचिन्हांकित असले तरी बोरकर तत्त्वतः

† 'बोरकरांची कविता : एक चर्चात्मक संवाद' पृ. ३१.

'Spiritual Poetry' चे प्रवक्ते, पुरस्कर्ते, भोक्ते आहेत हे यावरून पुन्हा एकदा स्पष्ट होते; 'माझा छंद', "माझ्या मनाची 'माऊ'ली", 'छेड अशीच शरीरसतार' यांसारख्या कवितांतून हाच आशय प्रकट झालेला आहे.

बोरकरांची ही काव्यविषयक किंवा जीवनविषयक धारणा त्यांच्या आरंभकालीन कवितांतूनही दृग्गोचर होते. १९३३ साली त्यांनी 'करि सुंदरि स्वरशृंगार' नावाची जी कविता लिहिलेली आहे; तीत निसर्गसौंदर्य, शृंगारभाव, संगीतानुरक्ती व अध्यात्मप्रवणता एकत्र आणलेली आढळतात. बोरकरांच्या दृष्टीने ही सारी जवळिकीची व परस्परांत कालविली जाणारी सरोवरे; बोरकरांची कविता आपल्या काळात जी पृथगात्म ठरली ती याप्रकारच्या मिश्रणांमुळे.

"गान न तें फुलणें, लखलखणें,
ॐकाराचें अभंग लेणें
दिव्य जिवांचें संपूर्ण जिणें
ऐंद्रिय साम्यविहार

..................

कर उन्नत मम ॐकारचि तन
हृदयंगम संगीतहि जीवन
स्पर्शें करि मज हरुनि अहंपण
सामवेद साकार."

यांसारख्या ओळी आज कलादृष्ट्या कच्च्या वाटल्या तरी त्यांचे सच्चेपण नाकारण्यासारखे नाही.

'जीवनसंगीता'तील कविता तांबे यांच्या छायेत वाढलेली व रचनादृष्ट्या अपरिपक्व असली तरी ती बोरकरांच्या विकासाची भावी दिशा स्पष्ट करते. रसप्रसन्न, निसर्गलोलुप, प्रणयधुंद, कलाभिमुख वृत्तीप्रमाणेच, बोरकरांच्या जीवनवेधी आर्त दृष्टीचा प्रत्ययही हा संग्रह देतो. 'वास्तव', 'माझे अश्रू', 'तेथें कर माझे जुळती', 'दरवणें', 'किति दयाघना करितोस ऋणी', 'रे फुलेंच जड गमलीं हृदया' यांसारख्या या संग्रहातील कविता बोरकरांच्या दृष्टिवेधाच्या अनुषंगाने महत्त्वाच्या. बोरकरांच्या या विशिष्ट वृत्तीचा लसलसता उन्मेष आढळतो, तो मात्र 'दूधसागर' या संग्रहात. या संग्रहाचे नाव धारण करणारा 'दूधसागर' हा एक साधा धबधबा, पण बोरकरांनी त्याचे

वर्णन करताना त्यातन एक महिम्नस्तोत्र उभे केले आहे.

‘ हांस खदखदून असा दूधसागरा
लासल्या गिरिदरींत फेक फेस पांढरा
हास्यीं तव वेदघोष
सृजनाचा दिव्य तोष
जीवनकल्लोळहर्ष वर्षवी शुभंकरा ’

हे त्याचे पहिलेच कडवे किंवा,

‘ नाभींतुन प्रणव उठे
रोमांतुन कोंभ फुटे
झुळझुळतीं दरवळतीं कंपनें स्वरांचीं
ध्यानांतिल सिद्धमुनी
कोरित अनुपम लेणीं
करिति वज्रलेप नर्तनें नटेश्वराचीं
रत्नांचे द्रव स्रवती
स्वप्निल रस लवलवती
त्यांवरतीं फुलतिं गुजें यक्षकिन्नरांचीं
डगडगतो आदिताल
नाचे कटिबद्ध काल
डमरूंतुनि उपनिषदें घुमतिं शंकराचीं ’

हे हिमालयाच्या हाकेचे वर्णन, बोरकरांच्या प्रकृतीचे वेगळेपण अधोरेखित करते. हिमालयाचे वर्णन आजवर अनेक कवींनी केले आहे; पण भारतीय परंपरेचा व पूर्व-सुकृतांचा संपन्न रसस्पर्श असलेले या प्रकारचे वर्णन विरळाच; हा स्पर्श रसिकाला एका संस्कारपूत वातावरणात घेऊन जातो. बोरकरांच्या कवितेतील हे परंपरेचे अनेकमुखी आलेख, संदर्भ, अनुसूचन, आपल्या लयबद्ध लललखाटाने त्यांच्या कवितेला एक वेगळीच झळाळी प्राप्त करून देते. तिची आवाहनकक्षा विस्तारते. कवीच्या विदग्ध रसवृत्तीची प्रचीती देते. बोरकरांची ‘ ज्ञानदेव गेले तेव्हां ’ ही कविताही या दृष्टीने लक्षणीय आहे.

ज्ञानेश्वरांचा समाधिप्रसंग प्रत्यक्ष पाहिलेल्या, अनुभवलेल्या नामदेवाने या लोक-विलक्षण प्रसंगावर रचलेली चिरकरुण विलापिका लोकविख्यात आहे; बोरकर या पूर्ण-परिचित प्रांतात तितक्याच अभिजातपणे प्रवेश करतात आणि तो प्रसंग व ते प्रांगण, तीतील करुणोदात्ततेसकट पुन्हा जिवंत करितात. त्या संचिताला नव्याने उजाळा देतात.

'चैत्रपुनव 'मधील 'भिंत' ही एका रखरख दुपारचे वर्णन करणारी अवघ्या सहा ओळींची कविता; पण या कवितेला लाभलेला ज्ञानदेवांच्या जीवनाचा आकस्मिक संदर्भ बोरकरांच्या मनोमंदिरात ज्ञानेश्वरांची मूर्ती किती दृढपणे सुस्थित झाली आहे, ते सूचित करतो. पूर्वसंचिताचे असे हे संस्कारी स्पंदन हा बोरकरी कवितेचा एक विलोभनीय विशेष. बोरकर हे स्पंदन प्रत्यक्षानुभूत करतात. 'सजवूं कार्तिकमास' ही कविता वाचताना व्रतोत्सवी व निसर्गसमृद्ध कार्तिक महिना आपल्या सगळ्या उल्हासासकट व विलसितांसकट आपल्यासमोर नटून उभा राहतो. 'वाढत्या सांजवेळे' कवितेतील विविध शकुन-संकेतांचे कौशल्यपूर्ण प्रक्षेपण कवितेचे भारलेपण (hypnotic quality) वाढविण्यास कारणीभूत झाले आहे.

भरल्या कळशीला वेढणारे शनि-राहू, अंगात यक्षाने छेडलेल्या लक्ष तारा, तुळशीत पुरून ठेवलेले स्वप्न, पंखा वारीत येणारा स्वप्नीचा राजपुत्र, यांसारख्या उल्लेखांनी वाढत्या सांजवेळेला पाणवठ्यावर पाऊल ठेवणाऱ्या नायिकेवर या मंतरलेल्या परिसराने जे चेटूक केले, ते सहीसही आपल्यापर्यंत येऊन ठाकते. 'वोखटी 'सारखा एखादा दुसरा आज अरूढ असलेला शब्दसुद्धा मग अधिक प्रवाही बनतो. अशा शब्दांची ( मेहुड, लासणे, गोमटी, घुणुघुणू इ. ) समुचित पेरणी हीही बोरकरी शैलीची एक लक्षणीय झलक. 'दीक्षीचा श्लोक', 'स्वस्तिवचन', 'सामवेद', 'वात्सल्याची गायत्री', 'क्षमेची जान्हवी', 'मयवनिचे वेत्र', 'आकाशातून ॐकारणारी शांती', 'रतिमदनांचा जरतारी हिंदोळा', 'क्रौंचपक्ष्याच्या रक्ताने भिजलेली डहाळी', 'समुद्राच्या पोटात वाजणारा सृजनाचा शंख' यांसारख्या आणखी कितीतरी उक्ती या अनुरोधाने पुढे करतां येतील. बालपणी पोथीपुराणांच्या संस्कारांनी पल्लवित झालेल्या व प्रौढपणी संतशैलीत न्हालेल्या बोरकरांनी आवाहन करताच हे संस्कृतिसंदर्भ, Myths, समारंभपूर्वक उपस्थित होतात. त्यांची साथ करतात. 'उर्वशी', 'वास्तवता मज न दिसे', 'कामद्रुमाची डहाळी' यांसारख्या कविता अशा संदर्भांनी गजबजून उठल्या आहेत.

'Myths' चे कवितेतील उपयोजन तसे नवे नाही; केवळ आधुनिक मराठी कवीच घेतले तरी गोविंदाग्रज, बालकवी, तांबे, कुसुमाग्रज, यशवंत, मर्ढेकर, विंदा यांसारखे जुने-नवे कवी विविध पद्धतींनी, उद्दिष्टांनी या 'Myths' चे उपयोजन करीत आलेच आहेत. बोरकर मुख्यतः तिचे उपयोजन करितात ते संस्कारसिद्धीसाठी. या 'Myths' प्रतीक म्हणूनही त्यांच्या कवितेत अधूनमधून मिरवितात; पण प्रतिमा-

प्रतीकासाठी ते निसर्गाचा अवलंब अधिक प्रमाणात करीत असल्याचे दिसते.

प्रेमभावनेला घातलेली पुढील प्रतिमापूरित साद पाहा :

' हिरवें झुंबर हलुंच हालवूं
सुमगंधीं स्वर गोड कालवूं
निळे रुपेरी मीन चाळवूं
करूं फेनाचा सुबक तुरा'

(' घरांतलें चांदणें ')

रोमरोमांना पुलकित करणारी एखादी तरल अनुभूती आविष्कृत होताना बोरकरांच्या कवितेत ती रूप, रस, गंध, नाद स्पर्शादी संवेदनांनी कशी व्याप्त होते; तेही वरील कडव्यातून स्पष्ट होते. ' स्पर्श ' कवितेतील सुगंधाने दाटून उमललेल्या लक्षावधी कळ्या, पिकून लवलेल्या नक्षत्रांच्या पिवळ्या द्राक्षलता; 'बांगड्या' कवितेतील रंगांच्या परस्परांत मिसळणाऱ्या अनंत, नाजुक, वर्तुळाकार छटा किंवा ' जपानी रमलाची रात्र 'मधील उन्मादक चेतकांचा विविध प्रकारचा लालस, मदिर मारा; वातावरणदृष्ट्याही महत्त्वाचा 'जपानी रमलाची रात्र' मधील वातावरण यामुळे आरंभापासूनच जळते, उसासते झाले आहे. येथे उद्दीपकतेच्या छटा विविध प्रकारे वाढवीत वाढवीत त्यात कानाच्या तारा झणाणून सोडणारा उन्माद ओतला जातो आणि एक उद्दाम ज्वालागीत जन्माला येते. या ' ज्वाला-गीता 'तील वातावरणाच्या जोडीने ' दुखणाइत दिव्या ' तील खोकत खोकत काजळ ओकत दमट हवा कुजट करणाऱ्या वातावरणाचा विचार केल्यास बोरकरांच्या वातावरण-निर्मितीतील सव्यसाचित्वाची कल्पना येते. त्यांच्या कवितेतील प्रतीतिगोचरतेचा उगमही काही एका प्रमाणात या प्रकारच्या वातावरणनिर्मितीतच आहे. सौंदर्यानुभूतीच्या विविध ललकाऱ्या या वातावरणातून घुमत असतात.

असे ललकारणे प्रिय असल्यामुळेच संगीताच्या परिभाषेने बोरकरांची कविता भरलेली आहे. किंबहुना संगीताची प्रतिमा त्यांच्या साऱ्या जीवनविषयक व कलाविषयक अत्युच्च जाणिवांना व्यापून काही अंगुले वर उरते. जे शब्दांत सांगावयाचे ते नादात गुणगुणण्याकडे त्यांचा कल आहे. ' जीवनसंगीत ',' आनंदभैरवी ',' चित्रवीणा ', ' गितार ' ही बोर-करांच्या काव्यसंग्रहांची नावेही बोरकरांची संगीतलुब्धता सूचित करतात. या लुब्धतेचे बीज त्यांच्या संवेदनारूपात आढळते. प्रणयाची धुंदी; जीवनाचे संवादित्व; लयपूर्णत्व; निसर्ग-सौंदर्याचे सकलेंद्रियमोही गूढमधुर गुंज; ऋतुचक्रांची आवर्तने; कलेतील शब्देवीण संवादण्याची क्रिया; उगम-विलयाची उघडली-मिटली जाणारी रंध्रे; पार्थिवातून अपार्थिवात चालणारी ये-जा; थरारून टाकणाऱ्या हर्षोत्कट किंवा करुणोदात्त अनुभवक्षणीची मनोऽवस्था

सुखद क्षणीही मधेच दाटणारी आर्त, अनामिक हुरहूर; पर्युत्सुकता; बोरकरांना साकार व्हावी, करावी, असे वाटते. व्यक्तित्वाच्या अणुरेणूंना विविध पातळ्यांवरून वेढून, व्यापून राहणाऱ्या या अनुभूतींना मंत्रित, मूर्त करण्याला संगीताखेरीज–'त्या धन्य' गायनीकले-खेरीज–अन्य कोणतेच माध्यम युक्त ठरणारे नव्हे. बोरकरांचे संगीतशबलत्व उद्भवले ते यातूनच.

यामुळेच सुंदरतेचा तरल तराणा त्यांच्या ओठांवर तरळू लागतो; विश्व हे एक 'गान' आहे, असे ते म्हणतात. शरीर ही एक सतार असल्याची परिभाषा त्यांच्या मुखातून येते; जीवनाला घुंगुरसराची उपमा द्यावी, असे त्यांना वाटू लागते; अज्ञातातील जाणिवांना गूढ घंटारवांचा आकार मिळतो; प्रणयस्पर्शांत संगीताचे ऐश्वर्य ओसंडू लागल्यासारखे वाटते; चांदणी रात्र भैरवीचे आलाप छेडीत असल्याचा भास होतो; दुपार ही असावरी ठरते; प्रियेने केसांवरून फिरविलेल्या हाताचे मुलतानी रागात परिवर्तन होते; हृदय हे कोकिळ बनते; प्रियेचा फिटलेला ओष्ठबंध मुक्तछंदधारी रूप घेतो; पावसाच्या बरसातीतून मल्हाराची धून ऐकू येते; महाभागांचे जीवन दीपरागाच्या स्वरात जाणवू लागते; थोडक्यात जे जे रमणीय, अद्भुत, उदात्त, करुणकोमल आणि वेड लावणारे असते; ते ते सारे गायनमयच होते. 'निर्झरमय, काननमय, गायनमय दिव्य जाहला देह' असे जे बालकवींनी उद्गार काढले ते या प्रकारच्या अनुभूतीच्या आविष्कारासाठीच.

बोरकरांच्या रचनातंत्रावरही या संगीतप्रवणतेचा परिणाम झालेला आहे. त्यातील खटके, कंप, नाद, पेच या साऱ्यांची फेक होते, ती याच दिशेने;

'मत्करींची, मन्मनींची वात कंपे साजणा
बांसरीच्या, त्वन्मुखाच्या सोसवेना रे सुखा
चोरचालीं रात्र येई मंदिरीं, हृन्मंदिरीं'

('तीन सांजा')

'निरवीं भवाटवीं
वैभवीं नि गौरवीं
विश्रमीं, श्रमीं, भ्रमीं तुझी उणीव जाणवे'

('मालवणारी वात')

'जिथें विपत्ती जाळी, उजळी
निसर्गलीला निळी काजळी
कथुनि कायसें काळिज निखळी'
('तेथें कर माझे जुळती')

'जळीं, स्थळीं, मलिं, अनलीं, अनिलीं
तृणपर्णी, चरजनीं, ग्रहगणीं'
('करिं सुंदरि स्वरशृंगार')

यांसारखा आरंभकालीन रचनेचा बाज, खटकेबाज संगीताच्या हव्यासातूनच निर्माण झालेला; हा हव्यास आजही पूर्णपणे संपलेला नाही; पण बोरकरांच्या उत्तरकालीन शब्दसंगीतात त्यामानाने अशी उघळमाधळ कमी आढळते. 'लरीवर लरी'सारख्या कवितेत तर भावलय व शब्दलय एकमेकींत विरघळल्या आहेत. भाव–शब्दांचे या प्रकारचे अद्वैत भावगीतात्मक कवितेची गुणवत्ता नेहमीच वाढीस लावते.

संगीताप्रमाणेच निसर्गसौंदर्य व स्त्रीलावण्य यांच्यामधून बोरकरांना जीवनचैतन्याचा रसपूर्ण साक्षात्कार होतो, किंबहुना या साक्षात्काराचे केवळ एक माध्यम म्हणजेच संगीत. मूळ चैतन्याची लवथवती प्रतीती बोरकरांना प्रकर्षाने येते, ती निसर्गाच्या व स्त्रीच्या लावण्यातून; त्यांच्या नटचंचल, अम्लान विभ्रमांतून; हे विभ्रम त्यांना कधी अलगपणे भावतात तर कधी एकवटपणे; त्यांच्या छायाप्रकाशात्मक विलसितांचे पोत दूरस्थपणे का होईना, पण 'मेघदूता'ची आठवण करून देतात. बोरकर कलिकाकोशाप्रमाणेच कुमारिकाही मनात हळुवारपणे डोकावून पाहतात.

निसर्गप्रेमाची व प्रेमनिसर्गाची जाण बोरकरांना जवळजवळ एकाच वेळी आली. आपल्या पहिल्या प्रणयसाक्षात्काराचे धुंदपण व त्याची त्यांनी चांदण्या रात्रीशी घातलेली सांगड या दृष्टीने लक्षणीय आहे † प्रणयानुभूतीच्या आधीच निसर्ग त्यांचा सोयरा, सहचर, सखा बनलेला होता. बोरकरांचा जन्मच रामणीयकतेचे वरदान लाभलेल्या गोव्यात झालेला. या भूमीच्या सघन विशेषांचा आलेख बोरकरांनी 'माझ्या गोव्याच्या भूमींत' या कवितेत काढला आहे. हा आलेख तेवढा काव्यपूर्ण नसला तरी या भूप्रदेशाची वैशिष्ट्ये तो विशद करतो. हा प्रदेश परवापरवापर्यंत राजकीय व सांस्कृतिकदृष्ट्या मध्य-

†. 'बोरकरांची कविता : एक चर्चात्मक संवाद' पृ. १६.

महाराष्ट्रापासून अलग राहिलेला असल्यामुळे बोरकरकृत निसर्गचित्रणावर 'प्रादेशिक'तेच छाप मारण्यात येतो. किंबहुना मराठी ललितसाहित्यातील 'प्रादेशिक'तेचा बोलबाला 'सह्याद्रीच्या पायथ्याशीं'सारख्या गोमांतकीय लेखकाच्या कथासंग्रहापासून सुरू झाला. या प्रदेशाची काही खास वैशिष्ट्ये आहेत व बोरकरांच्या 'मुशाफिरा', 'इतुक्या लौकर येई न मरणा', 'सागरा', 'दूधसागर', 'दरवणें' वगैरेसारख्या कवितांतून ती दृग्गोचर होतातही. 'वझरा', 'रुखावळ', 'पिसोळी', 'तणारा', 'गीम' यांसारखे बोरकरांच्या कवितेतील काही शब्द, ही प्रादेशिक छटा वाढवितात; पण याप्रकारचे शब्दप्रयोग किंवा तत्सम गोमांतकीय उल्लेखांत बोरकरांच्या कवितेचे काही खास वैशिष्ट्य सामावले आहे, असे नाही. तीतील 'प्रादेशिक'तेचा गाजावाजा झाला तो आनुषंगिक कारणांनी; एरव्ही 'प्रत्येक भूभागातील निसर्गाला स्वतःचा असा खास Persona असतोच. तो खऱ्या निसर्गकवीला स्वभावतःच जाणवतो आणि त्याच्या कवितेतून आपाततः प्रगट होतो. त्या दृष्टीने कोणतीही अस्सल निसर्गकविता प्रादेशिकच असते' हे बोरकरांचेच म्हणणे¶ या बाबतीत मान्य होण्यास हरकत नाही. (बोरकरांच्या निसर्गकवितेचे वैशिष्ट्य आहे, ते तीतील प्रादेशिकतेपेक्षा तीमधून रसडोळसपणे स्फुरणाऱ्या सौंदर्यवेधात. बोरकरांच्या यशस्वी निसर्गकवितेत ऋतुचक्रातून मुसावलेले सृष्टीचे लावण्य नुसते कौतुकाने न्याहाळले जात नाही, तर ते गात्रांनी आकळलेही जाते.)

कविकुळात वसंताचा बोलबाला फार. बोरकरांचे निसर्गभान असे सांकेतिक किंवा सांप्रदायिक नाही. आणि त्यांना विशिष्ट ऋतूच प्रिय आहे, असेही नव्हे. सहाही ऋतू आणि बाराही मास त्यांना सातत्याने मोहित करणारे. लावण्यराज श्रावणाप्रमाणेच दीपोत्सवी कार्तिक-मासही त्यांचा आवडता. स्वप्नांच्या लोकरीची दुशाल पांघरून हेमंताचेही ते तेवढ्याच उत्साहाने स्वागत करतात. 'जलद भरुनि आले', 'सरीवर सरी', 'खिडक्यांवर वाजे वारा' 'झालें हवेचें दही', 'झाडें झालीं निळीं निळीं', 'क्षितिजीं आलें भरतें ग' यांसारख्या कविता म्हणजे तर विविधप्रकारे आळविलेली पर्जन्यसूक्तेच. पर्जन्याची उन्हाळी, पावसाळी रूपे त्यांना त्यांतील गति-स्थितीसकट वेढून टाकतात. आकाशात गडद निळे ढग अवतरले की, त्यांचेही हृदयाकाश भरून येते; घनातल्या टाळमृदंगांचा नाद कानामनात निनादू लागतो; आणि बंदिस्त खिडक्यांवर पावसापूर्वीचा वारा वाजू लागला की, या वाऱ्याची सैरभैर गती प्रौढ कविमनातही संचारते; उच्छृंखल यौवनाला फिरून जागृत करते.

---

¶. 'बोरकरांची कविता : एक चर्चात्मक संवाद' पृ. ३७.

बोरकरांची ही पर्जन्यसूक्तावली तीतील रचनासामर्थ्यासाठीही लक्षणीय आहे. या साऱ्या कवितांचा आरंभ एका चेतनाबिंदूच्या अवतरणाने होतो. हा बिंदू आपल्या आंतरिक गतीने प्रसरणशील होत होत नाद, रूप, स्पर्शादी संवेदनांना आवाहित करीत करीत एका वेगळ्या मनोवस्थेला जन्म देतो. एक नवी भाववृत्ती साकार करतो. 'खिडक्यावर वाजे वारा' किंवा 'सरीवर सरी' चा आरंभ व शेवट या दृष्टीने पाहावा. 'खिडक्यावर वाजे वारा' ची गती बंदिस्ततेकडून मुक्ततेकडे जाते तर 'सरीवर सरी'-चा प्रवास तप्ततेकडून तृप्ततेकडे होतो. या प्रवासाचे पर्यवसान, विवक्षित भावावस्थेत होऊन प्रत्यक्षात कविता संपली तरी तिचे गतिचक्र थांबत नाही. ते मनात मंदपणे आवर्तित होतच राहते.

या पर्जन्यस्तोताचे प्राधान्याने जे आवाहन आहे, ते शृंगारभावाला; शृंगारभावात एरव्हीही बोरकर राधाकृष्णप्रतिमेचे मिश्रण करतातच; मेघसाहचर्यामुळे ही प्रतिमा पर्जन्य-विषयक कवितांतून वारंवार डोकावते. 'सरीवर सरी'प्रमाणेच, 'झाडें झालीं निळीं निळीं' आणि 'झालें हवेचें दही' या कवितांतही ही प्रतिमा आहेच. कृष्ण वा निळा रंग बोरकरांच्या विशेष लोभातला. येथे झाडे, आकाश, पाणी वा रात्रच निळाईचे लेणे ल्येते असे नाही, तर येथील चांदणीरात्रही निळ्या रंगाने मुसावलेली असते. बोरकर स्वकवितेलाही 'निळावतीच्या दीप कळ्या' असे संबोधतात. श्रावण महिन्यातील विविध रंगच्छटांचे लावण्य रेषांकित करताना, प्रदोषकांत; क्षितिजासम जांभुळ; जलदासम श्यामल; सांध्यमेघछायास्वरूपी; अशी या निळाईची सौम्य वा सांद्र रूपे अलवारपणे ग्रथित करण्यास ते विसरत नाहीत.

'निळावलें मन, निळावलें तन
निळावलें नवनीत घटांतुन,
निळ्या वेळुंतिल शीळ निळी सखि, निळा उरांतिल पीळ
निळ्या निळ्या प्राणांतिल ज्योती
निळीं निळीं डोळ्यांतिल मोतीं'
घननीळाच्या निळ्या गालिचा निळा निळा मी तीळ'

याप्रकारच्या 'चैत्रपुनवे'तील निळ्या 'दशा'च्या वर्णनात बोरकरांच्या नीलिमा-प्रीतीचे गहिरे प्रतिबिंब उमटलेले आहे.

बोरकरांच्या या नीलिमा प्रेमाला त्यांच्या रसिक सौंदर्यवेधी दृष्टीबरोबरच निळ्या रंगाचे अनंताशी नाते जोडणारा भारतीय संकेतही काही अंशी कारणीभूत झाला असावा.

आकाश, ढग, वारा, ऊन, पावसाप्रमाणेच समुद्र, चांदणे, झाडे, रात्र, काळोख सांज, दुपार, हे निसर्गघटकही बोरकरांचे काव्यविषय झाले आहेत. समुद्र त्यांना प्रिय असला तरी प्रियतर सांज आहे आणि प्रियतम आहे चांदणे. या दृष्टीने बोरकरांच्या निसर्गसंगीताला उत्तरांगप्रधान मानावयास हरकत नाही. येथील दिवसाचा आरंभच सांज-वेळेपासून होतो. येथील कळ्या संध्याकाळीच उमलतात. 'मुशाफिरा', 'सांजवेळ', 'तीन सांजा', 'वाढत्या सांजवेळे'सारख्या कविता सांध्यरंगरंजित आहेत;

'सांज दाटली शिरीं
परतली घरा भिरीं
सांवळ्या राखावळींत धूर मात्र कांपरा
स्तब्ध मार्ग तांबडा
वळत जाय वाकडा
मोडक्या पुलावरुन तार जाय बंदरा
काळवंडलीं जळें
चिंचही न सळसळे
वाटतें भयाण सर्व, सलत आंत कातरा'

या 'मुशाफिरा'सारख्या कवितेतील भयसूचक, कातर ओळी वगळल्या तर सामान्यतः बोरकर संध्याकाळची पार्श्वभूमी निवडतात ती प्रेमिकांच्या 'हुरहुरीतील माधुरी' व्यक्त करण्यासाठी.

संध्येचे एक वेगळेच रूप 'ये संध्ये जा कथुनी' या कवितेत दिसते. येथील सांध्यरस नेहमीची हुरहूर लावीत नाही, किंवा वातावरणात प्रणयाचा धूपदीप पसरीत जात नाही, अथवा येथील संध्याछाया हृदयाला भिवविणाऱ्याही नसतात; त्या या प्रीतीचे गहिरे गुज कनकाच्या दीपप्रकाशात केवलपणे कथन करीत राहातात. ही संध्या वाचकाला न कळतच अंतर्मुख करते, तत्त्वचिंतक बनविते. संध्या–जरा–मृत्यू यांची नेहमीचीच साखळी येथेही आहे; पण तिची जडणघडण वेगळी वाटते. तिचा येथील स्पर्श दाहक न होता शामक होतो. त्यातून केवळ आजच्या अंताची सूचनाच मिळत नाही तर उद्याच्या अवतरणाचे आश्वासनही मिळते. हीच शांत-तृप्तता 'सांध्यसुंदरी' कवितेतही प्रतीतीस येते.

आशयदृष्ट्या या कवितांचे वेगळेपण जसे लक्षणीय आहे तसे 'संध्याकाळी उमल-लेली कळी' व 'वाढत्या सांजवेळे' या कवितांच्या रचनातंत्रातील वेगळेपणही उल्लेखनीय वाटते. या दोन्ही कविता 'घट' परंपरेतील असल्या तरी 'संध्याकाळीं उमललेल्या कळी'पेक्षा 'वाढत्या सांजवेळे' ही कविता रचनादृष्ट्या अधिक परिपक्व उतरली

आहे. पहिली १९२८ मध्ये लिहिलेली तर दुसरी १९५९ मध्ये. आशयदृष्ट्या नसली तरी अभिव्यक्तिदृष्ट्या बोरकरांची कविता काही एक काळपर्यंत कशी प्रौढ, परिणत होत गेली; हे या दोन रचनाशिल्पांतील फरकातून स्पष्ट होते.

सृष्टिघटना तीच असली तरी कवीच्या भाववृत्तीप्रमाणे बदलणारी तिची रूपे पाहण्याच्या दृष्टीने बोरकरांच्या कवितेतील चंद्र-चांदण्याचे उल्लेख एकत्र करण्यासारखे आहेत. संगीताप्रमाणेच येथील चांदणेही विविधभावधारी आहे. संगीताचा षड्ज चांदण्याशी जुळविण्याचा व चांदण्याचे धुंद किरण संगीताच्या सुरात कालवण्याचा बोरकरांना छंदच आहे. अलौकिक सौंदर्यानुभूतीच्या प्रकटीकरणाचे वेध लागल्याचेच ते द्योतक. असे केल्याखेरीज त्यांच्या सौंदर्यवृत्तीचे समाराधनच होत नाही. यामुळेच संगीताप्रमाणे चांदणेही बोरकरांच्या कवितेत सर्वदूर पसरलेले आढळते. डोळ्यांत, मनात, कानांत, गवाक्षात, अंगणात, घरादारात, झाडांवर, समुद्रकिनारी, माडांच्या राईत, झाडांच्या फांदीवर, स्मृतीत, स्वप्नात, जिकडे पाहावे तिकडे चांद आणि चांदणेच दिसते. हे एक वेगळ्या प्रकारचे चांद्रायणव्रतच म्हणावयाचे. या चांदणवेलीला आलेली फुले स्वाभाविकपणेच प्रणयगंधाने मुसमुसलेली असतात.

चंद्र हा मनसिज असल्यामुळे तो मदनाशी संबंधित असावा यात नवल नाही; पण केवळ चंद्रच नव्हे तर बोरकरांचा बहुतेक सारा निसर्गच प्रणयाचा सहचर, सखा, मंत्री असतो. विरह-मीलनाचे सारे सोहळे, सोपस्कार चाललेले असतात, ते या निसर्गाच्या सान्निध्यातच. निसर्ग व प्रेम यांचे येथील हे सख्य पुष्कळदा अद्वैताच्या पातळीला जाऊन भिडते. येथे प्रेयसीच्या डोळ्यांत सहाही ऋतू, बारामास सामिन्नलेले असतात तर कधी कामभाव हा द्रुमरूप धारण करतो. प्रेम-निसर्गाची बोरकरांच्या कवितेतील ही युती 'माझी आगबोट'सारख्या त्यांच्या प्रारंभकालीन कवितेतही आढळते. येथे नारळीचे वृक्ष प्रेमस्तंभ होतात, पानांआड लपलेल्या पक्ष्यांना दबलेल्या हृदयभावाचे रूप येते आणि केळीच्या बुंध्यातून ठिबकणारे पाणी अश्रुमय बनते.

निसर्ग व प्रणय याची बोरकरांच्या कवितेतील अनुभूती सर्जनशील व ऐंद्रिय (Sensuous) असते. 'जपानी रमलाची रात्र'प्रमाणे प्रसंगी, येथील प्रणयदर्शन उद्दीपक व उन्मादकही होते; पण त्यात ग्राम्यतेचा भाग मुळीच नसतो. ही दर्शने नेहमीच सुसंस्कृत रसिकतेने विनटलेली असतात. त्यांत रसिकत्व तर असतेच शिवाय या रसिकत्वाला पुष्कळदा परतत्वस्पर्शांचाही वेध लागलेला आढळतो; त्यामुळे ही चित्रणे उद्दीपक असूनही

थळ होत नाहीत आणि तत्त्वस्पर्शी होऊनही तत्त्वजड बनत नाहीत. ऐंद्रियता आणि अतींद्रियता, भोग व त्याग, रती व विरती, बहिर्मुखत्व व अंतर्मुखत्व यांचा बोरकरांना अभिप्रेत असलेला तोल येथेही कार्यकर होतो. " संसाराचा रस घ्यावयाचा पण त्याच्या गाळात स्वतःला रुतू द्यायचे नाही. संन्यासाचा आनंद लुटायचा पण त्याचा सुतकीपणा स्वतःला शिवू द्यायचा नाही. जीवनाच्या प्रेमाने मोहरून जायचे पण आतला एकान्त ढळू द्यायचा नाही † ही या संबंधीची बोरकरांची तत्त्वप्रतिज्ञा.

ही प्रतिज्ञा जशी शुद्ध देहनिष्ठ नाही, तशी देहभावनेला वर्ज्यही मानणारी नव्हे. ती देहभावाला तुच्छ लेखीत नाही किंवा देहाच्या प्रमादशीलतेमुळे शरमिंधी होत नाही. किंबहुना या प्रमादशीलतेमुळेच माणसाचे माणूसपण आकळते. ψ ' मज लोभस हा इह-लोक हवा ' ची बोरकरांची मागणी, गात्राने ऋतू आकळण्याची, स्पर्शसंगीतातील सारे ऐश्वर्य भोगण्याची त्यांची वांच्छा यातूनच उद्भवलेली. या स्पर्शांमुळे जननांतरीच्या जटिल समस्या उकलतात, रसभोगातूनच रसवर्ज्यत्वाकडे जाता येते; याबद्दल त्यांना तरी शंक नाही. ' कामद्रुमाच्या डहाळी 'चे पुढील गुणगान याचेच द्योतक :

" याच डहाळी खालती झालें उन्हाचें चांदणें
आणि छायेनें प्रकाशा तिढे घातले उखाणे
उष्टी घोळवितां बोरें रामा उमगली सीता
भोळ्या मिठींत राधेच्या कृष्णा गवसली गीता
सुजातेची खीर येथें झाली मुक्तीहुन गोड
बोधिसत्त्वाची फळली पूर्वसुकृतांची जोड
माग्दालीनेच्या पूजेनें ख्रिस्त येथें झाला होता
सुळीं जाण्याच्या पूर्वींच सुखें मरूनियां जिता
क्रौंचपक्ष्याच्या रक्तानें हीच डहाळी भिजली
फळ हिचेंच चाखून ईव्ह आपाद लाजली "

' उर्वशी ' ही कविताही या अनुरोधाने महत्त्वाची. स्त्रीसौंदर्याचा मानदंड ठरलेल्या या उर्वशीच्या येथील उत्कंठापूर्ण आवाहनास बोरकरांच्या साऱ्या सौंदर्यसंवेदनांना उधाण

---

† मुंबई व उपनगर मराठी साहित्य संमेलन २० वे अधिवेशन : अध्यक्षीय भाषण.

ψ ' विश्वामित्रा ! व्यर्थ न तप तव–पतनचि तव गा अमुचें वैभव ' ( ' विश्वा-मित्रास ' )

आले आहे. कळांचे, फुलांचे, रसगंधांचे मार्दव त्यात एकवटले आहे. सारी सौंदर्यबंधने व ऋतलांछने येथे गळून पडली आहेत आणि उरले आहे, ते नितळ, निरभ्र, मांगल्य. बोरकर स्त्रीत्व हे साऱ्या उत्पत्ति-स्थिति-लयाचे आदिपीठ, साऱ्या आवाहन विसर्जन क्रियांचे शक्तिकेंद्रच मानतात.

‘ तव नयनाचें दल हललें ग !
पानावरच्या दंवबिंदूपरि
त्रिभुवन हे डळमळलें ग !
तारे गळले, वारे ढळले
दिग्गज पंचाननसे वळले
गिरि ढासळले, सुर कोसळले
ऋषि, मुनि, योगी चळले ग !
ऋतुचक्रांचे आंस उडाले
आकाशांतुनि शब्द निघाले,
“ आवर आवर अपुले भाले
मीन जळीं तळमळले ग ! ”
हृदयीं माझ्या चकमक झडली
नजर तुझी धरणीला जडली
दो हृदयांची किमया घडली
पुनरपि जग सावरलें ग ! ”

(‘ तव नयनाचें दल हललें ग ’)

स्त्रीच्या महतीचे हे वर्णन केवळ अद्‌भुत वा अतिशयोक्त म्हणून दूर सारता येण्यासारखे नाही. ही एक उत्कट आणि मनोज्ञ कविश्रद्धा आहे. तिचा एरव्हीच्या सुखवादाशीही काही संबंध नाही; शरीर हे येथे अशरीराला जोडणारा दुवा, सेतू, ‘ सिंफनी ’ बनते. भोग-त्यागाच्या—द्वंद्वात्मक जाणिवेचे एक अंग होते. यामुळेच बोरकर त्यागाच्या-अंगाने ज्या वेळी या भावबंधाकडे पाहतात, तेव्हा त्यांना आलिंगन-चुंबनाविना मीलन झाल्याची, विरहाच्या कालकूटात पोहत असताही अमृताने न्हाल्याची भाषा बोलावीशी वाटते. स्त्रीच्या सौंदर्याचे व सामर्थ्याचे दाहक पण उद्धारक तेज ‘ खंजीर हे मारीत जा!’ कवितेमधे आविष्कृत झाले आहे. स्त्रीच्या व्यक्तित्वाच्या दृष्टीने ‘ खाईंतला स्वर्ग ’ ‘ आणखीन् काय ? ’ सारख्या कविताही महत्त्वाच्या. बोरकरांच्या कवितेतील राधाकृष्ण-भावाचा उगमही या द्वंद्वपूर्ण, उन्नत प्रेमविषयक जाणिवेतच असावा. बोरकरांची प्रेम-

कविता म्हणजे एकप्रकारे मधुराभक्तीचे आधुनिक अवतरणच. पूर्वसूरींच्या मधुराभक्तीत दैवी भावनेला प्राधान्य होते; येथे दैवी अंश न नाकारता, त्याचे मानुषीकरण करण्याकडे कल आहे.

बोरकरांच्या प्रेमविषयक कवितांच्या मंत्र-तंत्राचे मूळ तांबे यांच्या गायकीत असले तरी ही प्रेमकविता तांबेप्रणीत सीमांचे उल्लंघन करून बरीच पुढे गेली आहे. रविकिरण-मंडळाच्या किंवा तत्सम स्वरूपाच्या कवितेशी तिचे गोत्र जुळण्यासारखे नाहीच. या प्रेमकवीचे एक अंग ना. घ. देशपांडे, ना. धों. महानोर, ग्रेसप्रभृती कवींशी जुळतेमिळते असले तरी एकंदरीने साम्यापेक्षा त्यांत भेदच अधिक. अनिलांच्या प्रेमकवितेचा आंतरसूर मात्र बोरकरांच्या प्रेमकवितेशी संवाद साधू शकेल असा आहे, पण सूर एकच असला तरी तो लावण्याच्या दोघांच्या पद्धतीत फरक फार; त्यामुळे ही बैठकही न जमणारीच.

बोरकरांच्या प्रेमकवितेची तुलनाच करावयाची झाल्यास ती काही प्रमाणात पु. शि. रेगे यांच्या प्रेमकवितेशी करता येईल. विदग्धता, सुशिक्षितपठ्ठत्व, स्त्रीदाक्षिण्य, देहभावगौरव, प्रेमभावनेला मिळणारी राधाकृष्णयुतीची डूब, पूर्वपरंपरेचा वेध घेण्याची धाटणी, उभयतांत समानच आहे; पण असे असूनही हे साम्य एका मर्यादेनंतर आपोआपच संपुष्टात येते. रेगे यांचा काव्याशय बोरकरांहून अधिक अंतर्मुख, सूक्ष्म आणि प्रदर्शनविरहित तर असतोच, शिवाय रेगे यांची शैलीही बोरकरांच्या शैलीहून कितीतरी अधिक नितळ, संक्षेपशील, प्रयोगनिष्ठ व आधुनिक आहे. या प्रकारचे प्रयोगशीलत्व व आधुनिकत्व बोरकरांत नाही. बोरकर तसे सांप्रदायिकच. म्हणूनच या उभयतांच्या काव्यलेखनाला जवळजवळ एकाच काळात प्रारंभ होऊनही रेगे तंत्रदृष्ट्या नवकवींचे अग्रणी ठरले आणि बोरकर नवकाळात मुक्तपणे वावरूनही अद्यतनाशी जिव्हाळ्याचा लागाबांधा अद्यापीही जुळवू शकले नाहीत. त्यांची कविता आजच्या संवेदनशीलतेला, जीवनसंदर्भांना ज्वलंतपणे स्पर्श करू शकत नाही.

कालतत्त्वाला औपचारिक किंवा अनौपचारिकपणे स्पर्श केल्याने कलाप्रांतात काही आगळा पुरुषार्थ साधला जातो अशातला भाग नाही; आणि नव्या-जुन्याला छेद देणारे नित्यनूतन, सार्वकालिक असेही काही या क्षेत्रात मानावे लागते; यातही शंका नाही. पण असे नित्यनूतनत्व साधण्याला चैतन्यशक्तीच्या गतिस्रोताने त्या कलापात्राला अखंड भरते येत राहणे, अत्यावश्यक. ही अट सातत्याने पुरी करणारी कला हातांच्या बोटांवर मोजण्याइतकीही नसल्याने अशा कलेशी बोरकरांच्या कवितेची तुलना करणे साऱ्याच दृष्टींनी अन्यायकारक ठरेल. बोरकरांनी नव्याशी आपला सूर जुळवून घ्यावा, असा आग्रह धरणेही

युक्त होणार नाही. प्रत्येक कलावंत आत्मनियत परिघातच भ्रमण करीत असतो. या भ्रमण-कक्षेचा विस्तार–संकोच व या भ्रमणाची गुणवत्ता, त्या कलावंताच्या अंतःसामर्थ्यावरच अवलंबून राहाणारी. या भ्रमणाला केवळ पुनरावर्तनाचे स्वरूप आल्यास मात्र कलेचा प्रवाहही स्थितिशील होतो.

बोरकरांच्या कवितेतील आजवरची स्थित्यंतरे लक्षात घेता, ही कविता आज एका विवक्षित सीमारेषेवर येऊन स्थिरावल्याचे दिसते. विशेषतः 'गितार' व 'चैत्रपुनव' हे त्यांचे अलीकडील काव्यसंग्रह वाचताना, या स्थितिशील पुनरावर्तनाची जाणीव विशेष प्रबल बनते. बोरकरांचे हे स्थितिशीलत्व, कवित्वशक्तीच्या प्रकृतिजन्य ऱ्हासातून आले असते तर प्रश्न वेगळा होता; पण हे जे स्थितिस्थापकत्व उद्भवले आहे ते मुख्यतः बोरकरांनी ठामपणे (Dogmatically) स्वीकारलेल्या विशिष्ट जीवनकल्पनांतून. बोरकर काव्यसाधनेचे योगसाधनेशी साम्य असल्याचे सांगतात, तथापि कोणतीही साधना पूर्व-संकल्पनाग्रस्त झाल्यास त्या साधनेचे अंतिम उद्दिष्ट विफल होण्याची शक्यता असते, याकडे ते द्यावे तेवढे लक्ष देत नाहीत. अर्जित वैभवाचे आत्मतृप्तपणे आवर्तात्मक प्रदर्शन मांडण्यातच ते आज मग्न आहेत.

सत्य, शिव आणि सुंदर या मूल्यत्रयीच्या बोरकरकृत एकंदर स्वीकारात व आविष्कारात याची साक्ष पटते. या मूल्यांची अंगभूत महती मान्य करूनही बोरकरांनी ठराविक पद्धतीने तिचे मंडन चालविल्याने ही मूल्यत्रयी त्यांच्या कवितेत जेवढी प्रभावशाली वाटावयास हवी तेवढी वाटेनाशी झाली आहे. बोरकरांचा श्रद्धाविषयाचा केवळ एक भाग असे तिला स्वरूप येऊ पाहत आहे. मूल्ये सनातन असली तरी त्याभोवतीचे संवेदनसंदर्भ सतत बदलत असतात; या बदलत्या संदर्भांना बदलत्या पद्धतीने चैतन्यपूर्ण स्पर्श झाल्यासच, या मूल्यांचे सामर्थ्य प्रतीतिगम्य होते; ती मग जुनी राहूनही नव्याशी संवादित्व साधू शकतात; कोणत्याही काळी ती समकालीनच वाटू लागतात; अन्यथा, यांना कंठाळीपण येण्याचा धोका संभवतो.

बदललेल्या काळाचा बोरकरांवरही अर्थात काही परिणाम झाला आहेच; रचनेची नवी वळणे कळत न कळत त्यांच्या शैलीत उतरू लागली आहेत; पण या 'नव्या' चे व बोरकरांचे मैत्र अद्यापि तरी जुळावे तसे जुळलेले नाही; बोरकरांच्या शैलीची मूळ प्रकृती अलंकरणशील, गेय व संस्कृतनिष्ठ; तर नव्या लयीचा ओघ याच्याविरुद्ध दिशेने जाऊ इच्छिणारा; या नव्या शैलीशी सांधा जुळवून घेण्यासाठी बोरकरही अलीकडे गद्य-

लयीचा अंगीकार करू लागले आहेत; पण या लयीशी किंवा तीतून प्रकट होणाऱ्या आशयाशी ते मनोमन समरस होऊ शकत नाहीत; परिणामी बोरकरांची ही नवी कविता आपली मूळ संपत्ती हरवून बसते आणि महत्त्वाचे असे नवेही काही साध्य करू शकत नाही.

याचाच आणखी एक परिणाम म्हणजे जुन्याचे अट्टाहासाने केले गेलेले उपयोजन. जुनी वृत्ते, जुनी परिभाषा, जुना आशय, संतप्रणीत साचे, बोरकर आज प्राचुर्याने पुनरुक्त करू लागले आहेत. त्यांच्या नव्या काव्यसंग्रहांत ओवी, अभंग, गौळण, लोकगीत, पदे जुने शब्द यांचा वाढता पायरव आढळतो.

'फुलांमधें फुल जाई जाईचें
यशोदेचें मूल नवलाईचें
जाईचा बांधूं झोपाळा
बसवूं त्यावर गोपाळा
या टोकाहुन त्या टोका
या त्याला देऊं झोका
झोका भिडुं दे आभाळा
भुरळ पडूं दे चंद्राला
चांदणें निळसर कृष्णाचें
पारणें सगळ्या तृष्णांचें
सुख हें मिळुं दे त्रैलोक्या
ये बाइ दे बाइ दे झोका
फुलांमधें फूल बाइ जाईचें
यशोदेचें मूल नवलाईचें'

ही एक 'चैत्रपुनव'मधील कविता. ही कविता वाचताना, आशय-अभिव्यक्तीच्या सांकेतिक पुनरुक्तीखेरीज व दिसामाजी काही तरी लिहिण्याचा दंडक पाळण्याखेरीज अधिक काय साधले जाते, ते कवीच जाणे!

वरीलसारखी कविता लिहिताना कदाचित बोरकरांसमोर अपौरुषेय वाङ्मयाचा आदर्श असावा; या प्रकारच्या निर्मितीचे ईप्सित ते मनाशी बाळगून असावेत; पण निर्जीव अनुसरणाने अपौरुषेय वाङ्मयाचे क्षितिज गाठता येत नाही, याची जाणीव बोरकरांसारख्या अभिज्ञाला नसेलच असे नाही; ही जाणीव असूनही या आवर्तातून त्यांना बाहेर पडू नये असे वाटते, की बाहेर पडणे जमत नाही? या प्रश्नाचे नेमके आणि निश्चित उत्तर देणे मुष्किलीचे. कलावंत कितीही मोठा असला तरी त्याच्या कलाजीवनात

ल्हानमोठे पेचप्रसंग अधूनमधून उद्भवतातच; बोरकरांच्या कलाजीवनातही 'आनंद भैरवी'च्या आसपास असा एक पेच उद्भवला होताच; तो आशयापुरता सीमित होता; आजचा पेच आशयाइतकाच अभिव्यक्तिव्यापीही आहे. बोरकरांचे एकेकाळचे सामर्थ्यच त्यांच्या आजच्या मर्यादांना कारणीभूत होत आहे.

बोरकर हे मूळचे परंपराप्रेमी; त्यांच्या परंपराप्रेमावर झालेल्या सुभग व रसपूर्ण संस्कारांनी त्यांना 'कवी' बनविले. या दोहोंच्या संगमामुळे ते आपल्या काळातील कविश्रेष्ठ ठरले. ज्या काळात बोरकरांनी काव्यलेखनास प्रारंभ केला तो काळ काव्यदृष्ट्या क्षीणबळ व परंपरासौंदर्याच्या अनुभूतीला आचवलेला होता. या पार्श्वभूमीवर बोरकरांची कविता आहे त्याहूनही अधिक पृथगात्म वाटली. या पृथगात्मतेच्या उसळत्या उल्हासातूनच बोरकरांच्या काही चिरतरुण, चिररुचिर कवितांचा जन्म झाला. मराठी कवितेच्या क्षेत्रातील ही त्यांची संस्मरणीय कामगिरी. मराठी रसिकांच्या उदंड प्रेमाचे बोरकर अधिकारी बनले, ते त्यांच्या या कर्तृत्वामुळे.

हे उदंड रसिकप्रेम व आजवरची आपली काव्यतपश्चर्या व जीवनसाधना पाठीशी घेऊन बोरकर आज 'महात्मायन'चा दीर्घकालीन संकल्प पूर्ण करण्यात मग्न आहेत. त्यांच्या या ग्रंथसिद्धीच्या-सोहळ्याचे सोत्कंठ वेध त्यांच्याइतकेच रसिकांनाही लागून राहिले आहेत.

—गो. म. कुलकर्णी

# चांदणवेल

निळावतीच्या दीपकळ्यांनो आलां माझ्या घरीं
नाचुनि गाउनि रंगविली ही मम अंगण-ओसरी

मुशाफरीला चला जिवांनो विसरा आतां मला
चिंवचिंव ऐकुनि चिमण्यांची ये दाटुनि माझा गळा

दाणे टिपतां त्यांना बघुनी ओठीं आणिन हसूं
आणि आठवुनि तुमच्या लीला पिउनी घेइन असूं

ग्रंथालय ठाणे
दा. क्र. ..........
शाखा (स्थळ प्रत)

## कवि कोण?

देवलसी जीव सदाचा उदासी
फुकाच्या सुखासी पार नसे

भावनेचा फूल भक्तीचा गोसावी
दिसे तसें गोवी काव्याभासें

लोण्याहून मऊ मायेचें अंतर
दुर्बळा अंतर देत नसे

देवाचे संदेश उकलुनी दावी
विश्वासी सुखवी आत्मज्ञानीं

मनानें बालक बुद्धीनें जो वृद्ध
तोडितो संबंध जगे जरी

सौंदर्यांचा भोगी जीवनीं विरागी
निद्रेंतही जागी जगासाठीं

कर्तव्याची चाड कुडीच्यापरीस
दगडा परीस करू शके

मतीनें कृतीनें उक्तीनें निर्मळ
तेजानें उजळ करी जनां

हाच खरा कवि प्रीत पाझरवी
तेजें दिपे रवि ईश्वर हा

## सांजवेळ

सूर्य गेला देशांतरा आणि दिशा अंधुकली
पंख-दमल्या पक्ष्यांचीं भिरीं घरा परतलीं

नभाचिया नुरेवर रंग विटुनी उल्हासी
त्याचा गाभा गढूळला स्पष्ट दिसे कासाविशी

तरुगिरींचिया ओळी कुणीं फांसल्याशा वाटे
तप्त सांवळ्या भूमीचा कोंडलेला श्वास सुटे

श्रांत कोलाहल टाकी वायुचिया स्कंधीं मान
सिंधुतीरीं घ्यावयाला सांजवेळ-समाधान

सांध्यजळ व्याकुळलें तम पाहुनी गहन
चुळबुळे, खळबळे भाव होईना सहन

भव्य नौकांतले दीप स्तब्ध सावधान झाले
त्यांस देखुनी जळाचें खिन्न काळीज हालले

तेजोरेषा थरारल्या त्याच परी काळजांत
आणि तयां पाहुनीयां दीप जहाले स्तिमित

दूर कुठूनसा आला गूढ घंटारव कानीं
मंत्रमुग्ध माझी वृत्ती, मुकें मन, मुकी वाणी

## मु शा फि रा !

चालसी किती जगें किती युगें मुशाफिरा ?
एकटेपणा तुझा असह्य हो चराचरा !

सांज दाटली शिरीं
परतलीं घरा मिरीं
सांवळ्या रुखावळींत धूर मात्र कांपरा

स्तब्ध मार्ग तांबडा
वळत जाय वांकडा
मोडक्या पुलाकडून तार जाय बंदरा

काळवंडलीं जळें
चिंचही न सळ्सळे
वाटतें भयाण सर्व ! सलत आंत कातरा

आसपास ना कुणी
भय भरे उगी मनीं
एक रात्र होउं या परस्परांस आसरा

या इथें वडातळीं
पाय टाकुनी जळीं
जागुनी वदूं कितीक काल, गुंफुनी करां

शीणभाग घालवूं
अन् विकल्प मालवूं
प्रीतिची निगूढता निशंत आणुं या भरा

आपुले झरे मुके
करुं जुळून बोलके
गात गात विस्तरून भेट देऊं सागरा

# दूधसागरास

हास खदखदून असा हास दूधसागरा
लासल्या गिरीदरींत फेंक फेंस पांढरा

हास्यीं तव वेदघोष
सृजनाचा दिव्य तोष
जीवनकल्लोळहर्ष वर्षवीं शुभंकरा

हास्यध्वनि तव उठोत
कंठ प्रस्तरां फुटोत
हिरवळो नटो फुलांत माउली वसुंधरा

श्रीहरिवरदानहास्य
चित्कलाविलासलास्य
श्रेय हें मुलां फुलां तुला मला कलाधरा

शिरिं पडोत दैवदंड
आपण हासूं उदंड
ग्रीष्म असो जगत हंसो ओसरोहि आसरा

या जगांत हास्य उणें
हास्याविण दीन जिणें
हास्यशून्य जीवनास यौवनीं जडे जरा

विष द्याया हंसति कुणी
पचवाया हंसति कुणी
हास्य अकारण तारक रे तुझेंच सुंदरा

प्रभुहि अकारण हंसला
नी त्रिलोक रसरसला
विश्व तदिय हास्याचा मोकळा निळा झरा

हंसती जे द्वंद्वमुक्त
तेच भक्त, ते विरक्त
ते सभाग्य पुण्यशील जिवविती चराचरा

हंसतचि जे जगति मरति
दीपराग जागवीति
कविमुनिशास्त्रज्ञ मनीं घुमवुनी नवी गिरा

हास्य इथें जोंवरि तव
मिळवूं नव विजय, विभव
स्वस्तिवचन सफल करूं भूषवूं महेश्वरा

# सावल्यांचें नृत्य

सावल्यांचें नृत्य माझ्या चांदण्याच्या अंगणांत
घननीळ वेदनांचें लास्य तुझ्या गायनांत !

अबोलीचा गोंड माझा दिसायाला साधाभोळा
पोटीं परी गांठ त्याच्या ठावी माझ्या काळजाला

सुरंगीच्या सुगंधानें डंख विसरला नाग
रात ओथंबली तरी जाईना का तुझा राग ?

जांभ रंगा आला दारीं तळीं गुलालाची रास
माघ मोहरला अंगीं जरा बिलगुनी हास

## जलद भरुनि आले

गडद निळे गडद निळे जलद भरुनि आले
शीतलतनु चपलचरण अनिलगण निघाले

दिन लंघुनि जाय गिरी
पद उमटे क्षितिजावरि
पद्मरागवृष्टि होय माड भव्य न्हाले

धुंद सजल हसित दिशा
तृणपर्णी सज्ज तृषा
तृप्तीचें धन घनांत बघुनि मन निवालें

उतट बघुनि हरिकरुणा
हरित धरा हो गहना
मंदाकिनिवरुनि धवल विहगवृंद डोले

रजतनील, ताम्रनील
स्थिर पल जल, पल सलील
हिरव्या तटिं नावांचा कृष्ण मेळ खेळे

मीन चमकुनी उसळे
जलवलयीं रव मिसळे
नवथर रसरंग गहन करिति नयन ओले

धूसर हो क्षितिज त्वरित
ढोर पथीं अचल चकित
तृण विसरुनि जवळिल तें खिळवि गगनिं डोळे

टप टप टप पडति थेंब
मनिंवनिंचे विझति डोंब
वत्सल ये वास, भूमि आशीर्वच बोले

# ते कर मन्मातेचे

ते कर मन्मातेचे
वर जणुं स्वरसुंदर कवितेचे

झाडिति हे सदनींचें अंगण
मनिंचें आणि अमंगल मीपण
क्षुद्र सुखांचे तसे रजःकण
सांचति जे भवतींचे

लावुनि लावण्याच्या वेली
गुंफिति त्यांचीं फुलें रसेलीं
वास्तुदेव पूजिती त्रिकाळीं
निर्माल्य न कधिं ज्यांचें

मलीन देहा घालिति न्हाऊं
म्हणति, " जिवाला उटणें लावूं
पावित्र्याचे दरवळ देऊं
फेडूं पांग जगाचे. "

घास ताटिंचे भरिती ओठीं
स्पर्शें ज्यांच्या अमृत पोटीं
विषय ज्यांपुढें अनंत कोटी
गमती तृणवत् साचे

शिविती चिंध्या, भग्न भावना
विदीर्ण स्वप्नें, जीर्ण कामना
दैन्य झाकिती कळे न कवणा
तंतु भरुनि ममतेचे

बांधिति जखमा या देहाच्या
त्यांहुनि खोलहि या हृदयाच्या
घड्या तयांवर माधुर्यांच्या
सिंचन प्रेमजलाचें

आधारचि ते निराश्रितांना
धैर्यद, वत्सल रुग्णजनांना
संजीवक संगरविद्धांना
भाग्यलेख दलितांचे

धन्य करांनो या या काळीं
दिव्य लिहा हो अमुच्या भाळीं
तोडूं जाळिं, उडूं आभाळीं
घरटें करुं गगनाचें

# उर्वशीच तूं जाया

क्षाळी पद संध्या
गांगजळा ये रंग मोतिया

गडे धुळीचें झालें सोनें
किनारले गिरि रजतरसानें
मोरपिसांसम चमकति पानें
झालें जग मयमाया

शिरिं अपुल्या खग वळिति तोरणें
शिंपडिती मोत्यांचे दाणे
मलयानिल नाचत मोदानें
लागति ते वेंचाया

रत्नकांति ये दाहि दिशांना
अवचित दीप्ती तव नयनांना
ज्योतिर्मयता अपुल्या प्राणां
काया या जणुं छाया

दीप उजळले हृदयीं, ओठीं
द्युतिनिर्झर ओघळले पोटीं
स्पर्शें विश्वें अनंत कोटी
लागति बघ तेवाया

रंभाकृति तव मृदुक हिमानी
दृढ धरिली मीं दोंहि करांनीं
अतीत तरि मज उरशी अजुनी
उर्वशीच तूं जाया

## सु र्मे वा ला ✓

मी सुर्मा विकणारा
आलों तुमच्या दारा
नमुना याचा पाहिल्याविना लावुं नका माघारा

किंमत याची थोडी
प्रीतिवचांची जोडी
फुलल्या अथवा गालांवरची लालस राजस गोडी

डोळा इकडे आणा
द्या अश्रूचा दाणा
घरभर जगभर आनंदाचा आढळेल नजराणा

संसाराचा भारा
मोरा जेविं पिसारा
होउनियां क्रीडाल सुखानें फुलवुनियां परिवारा

पोलादाचा भाला
भिडला जर हृदयाला
शिवतां तुमची चोखट दृष्टी लाजवील सोन्याला

भाग्य असें थोड्यांना
पंख जसे घोड्यांना
रंग शराबी, गंध गुलाबी नशिबाच्या कोड्यांना

हें सुख उपभोगा रे
भिडवा स्वर्ग जगा रे
डोळ्यांमध्यें साथ ठेवुनी न करा नरक उगा रे

चोख करा रे डोळे
त्यांत दयाघन वोळे
रतिमदनाचा जरीकिनारी हिंदोळा आंदोळे

वास इथें मम थोडा
तोंवर हें सुख जोडा
नातरि जीवन होइल अंतीं कळिकाळाचा खोडा

व्हा दैवाचे चेले
अमर सुखाचे पेले
सुर्मा घालुनि नयनीं व्हा रे मदनाचे अलबेले

हा घ्या मोफत फावा
न्या हो अपुल्या गांवा
मात्र सुखामधिं या गरिबाची गोड आठवण ठेवा

## बांगड्या

बांगड्या बघा या
श्रावण लावण्यराज लागला फुलाया

जलवलयें, स्वरवलयें
दिनकर-शशिकरवलयें
मिसळुनि घडिल्या प्रणयें
गोड बांगड्या या

नाजुक या सुंदर अति
मंजुळ रवि रुमझुमती
रत्नांसम चमचमती
भाग्य रंगवाया

या प्रदोषकांत निळ्या
या बिजल्या सोनसळ्या
लाजविती रुसुनि खुळ्या
आम्रकिसलया या

नव युवती ! कां भिडस्त ?
भरुनि घ्या त्वरें स्वहस्त
वाजवुनी तरुण मस्त—
चरणिं लोळवाया

या वासंतिक हिरव्या
आशांसम नित्य नव्या
वधुहृदयापरि हळव्या
प्रेम-ओवया या

निर्मळ हें हिरवेंपण
पतिगृहिं न्या करिं मिरवुन
सतत करा जपुन जतन
ही सुरम्य माया

क्षितिजासम या जांभुळ
जलदांसम या श्यामल
वत्सल या गंगेंतिल
सांध्य-मेघ-छाया

या माउलि, अपुल्यास्तव
वर ज्यांचा सुखसंभव
कर ज्यांचा दे गौरव
वैश्वदेव राया

ये कन्ये, ये दुहिते,
अपरिणिते, ललितलते,
ये कांते, ये माते,
सुभग-साज न्याया

## √पा ठ मो री  पौ र्णि मा

पाठमोरी मूर्ति तूझी पाहिली मीं कौतुकें
वाटलें त्वत्कुंतलीं गे गुंतलीं सारीं सुखें

भार त्यांचा गाढ काळा मेघ आषाढांतला
का फुलांच्या मार्दवें मानेवरी भारावला ?

प्रीतिचा गे दूत माझा हा सुरंगीचा सर
खोवुनी तूं कुंतलीं गे गोविलें अभ्यंतर

हा न झेला गे फुलांचा––लाजरी सौदामिनी
वांकुनी केशीं तुझ्या मातें खुणावी हासुनी

काय आघातें तिच्या हे केस तूझे कांपती ?
प्रीतिभावें चाळवोनी वा मला बोलाविती ?

कंप त्यांचा अंतरंगीं जाय माझ्या खेळुनी
आणि त्यांचा वास माझा श्वास टाकी कोंडुनी

भाग मानेचा खुला हा गे बिजेचा चंद्रमा
अंबराच्या नीलिम्याला गे उणी स्वर्गोपमा

कांतिपानें धुंद झालें गर्द हें नीलांबर
पोत––छे ! स्वर्जान्हवीचा झोत हा पाठीवर !

पद्मिनी ! झाला करांचा गोड चाळा मोहक
आंगठीचा नील हासे रम्य संध्यातारक

होति पूर्वापश्चिमा आरक्त हस्तांचे तल
कंकणीं नक्षत्रपुंजां तेज आलें शीतल

स्वर्धरेची धार झाली त्वत्कटीची रेख ते
देवता आपाद कोणी रम्य ऊर्मी लेखिते

कच्छ वाटे सिंधुपृष्ठीं पंथ ज्योत्स्नामंडित
पाहुनी झाले किती गे प्रीतिभावें पीडित ?

स्वैर वांकी या रुपेरी--फेंस खेळे सुंदर
पावलांच्या लालिम्याला भूमिची थोडी सर

पाठमोरी तूं बिजेची रात्र, लावण्यें रमा
हासुनी पाहीं वळोनी, होउं दे ना पौर्णिमा

# माझी बेगम

माझी बेगम आली—प्यारी—माझी बेगम आली

मस्त मोंगली विलास सगळे उधळित ही भवतालीं
डोळ्यांतुनि वाळ्याचें अत्तर हासत-हासत जाळी

केश रेशमी, गाल मखमली, अधरिं शराबी लाली
वचनीं बुलबुल, गायनिं कोकिळ, कवनीं शुक कुरवाळी

न्हाली ही शृंगाररसानें प्रतिभालंकृति ल्याली
सुमधुर स्वप्नें, दिव्य भविष्यें फुलवित गालीं, भालीं

श्वासें जाळी धूप, कटाक्षें उरांत खंजिर घाली
आणि तत्क्षणीं घाव चुंबुनी होई रंगरसेली

हासत, नाचत ये चंदेरी माझी गझल–कवाली
अन् रक्ताची मैफल उडवी हृदयीं–रंगमहालीं

# तुझें आगमन ✓

या वळवाच्या सरीपरी तूं आलिस माझ्या दारीं ग

झाकळलें नभ होय मोकळें
गळे तयांतुन ऊन कोवळें
हें धन असलें कधिं न देखिलें रविच्या विभवागारीं ग

मळल्या राया न्हाउनि नटल्या
निजलेल्या स्वरलहरी उठल्या
रुळवित चरणीं चपल लाजऱ्या सोनकिनारी भारी ग

मृद्गंधाच्या चंवऱ्या मिरवित
नाचत नाचत आले मारुत
कणाकणांतुनि घुमवित मादक मदनाची ललकारी ग

थरारलीं बघ कमळें सगळीं
मकरंदाला फुटली उकळी
जलदाची पिचकारी बसली निळया निळया कासारीं ग

तृणातृणांतुनि उठली तृष्णा
आवरिशी मग कां तव करुणा ?
खुलें करीं जें जीवन अडलें वरुणाच्या भांडारीं ग

# घरांतलें चांदणें

घरांत पडलें आज चांदणें ऊठ साजणा ऊठ जरा
परस्परांवरि या किरणांपरि सोडूं पुनरपि नयनशरां

ओलांडुनि भिंतीचें कुंपण
चंद्रदूत हे आले चोरुन
त्या वाटेनें जाऊं आपण
पाहूं हिरवीगार धरा

निजलेलीं स्मरगुंजें जागवूं
तहान त्यांची हसत भागवूं
हृदयांतिल मकरंद नाचवूं
भिउनि राहिला जो तिमिरा

सुज्ञपणाच्या बेड्या तोडूं
संवत्सरांचीं वसनें सोडूं
दो हृदयांतिल पराग जोडूं
जडवुनि अधरावर अधरा

हिरवे झुंबर हळुच हालवूं
सुमगंधीं स्वर गोड कालवूं
निळे रुपेरी मीन चाळवूं
करूं फेनाचा सुबक तुरा

अशा विलासीं रमुनी भ्रमुनीं
कणकण अपुले जातां शिणुनी
भूवक्षावर विलगुनि पडुनि
मिळवूं चंद्रावर नजरा

पुन्हा एकदां होऊं तान्हीं
रमूं सृष्टिच्या स्तन्यसेवनीं
गात्रीं कोंडुनि रात्र चांदणी
आणुं पहाटेआधिं घरा

# स्मृति ✓

लोचनीं ये आज पाणी त्वत्स्मृतीनें साजणी
भैरवी आलापिते ही रात्र येथें चांदणी

सूर ओथंबून कंठीं कर्दळी भारावल्या
मुग्ध झाडांच्या तळीं भांबावल्या या सावल्या

स्वैर एकाकी भ्रमे दिङ्मूढ वेडा काजवा
खिन्न झाला दोडकीच्या स्वप्नपुष्पांचा थवा

सांचलें पाणी इथें अन् त्यांत गोठे चांदणें
आंसवांच्या या जिण्याला मौज ना स्वप्नाविणें

योजनें लंघून राहे स्वप्न माझें देखणें
सुस्मृतींचीं चालवीतों येथ मी पारायणें

या गवाक्षांतून तूं मीं चंद्र होता देखिला
चुंबनांचा पाठ आम्हीं त्याजला होता दिला

ओतिली त्यानें तदा हर्षें सुधा सृष्टीवर
तीहुनीही गोड आम्हीं वर्षिले सस्वर

रात्र होतां शांत सारी, गाल गालां लाविले
भोगिलें ऐश्वर्य सारें स्पर्शसंगीतांतलें

मेघ वेगें पांगले अन् वायु झाला शीतळ
विश्वही झालें निळें अन् लोचनीं आलें जळ

आजही ये तेंच पाणी दूर तूं गे साजणी,
दूर तूं, छे ! तूं जिवाला राहसी आलिंगुनी

रात्र गाई भैरवी ही गोड वाटे सुस्वर
आणि अश्रूंतूनही हें दृश्य हो चेतोहर

## दुखणाइत दिवा

दुखणाइत हा जळे दिवा !

खोकत खोकत काजळ ओकत
कुजट करी ही दमट हवा

बघति त्याकडे जीर्ण चिरगुटें
मडकीं, डबडीं, आणि तवा

दीन बालकें रडुनि झोपलीं
पोटीं आवरुनी वणवा

कृश देहांच्या चिंध्यांवर त्या
नाचति डांस तशा पिसवा

लाज सांवरुनि बसे चुलीशीं
माय, कपाळीं कर उजवा

नसे दारुचि तिजला आतां
वा लाखोलीची परवा

मुख पांडुर, अविकारी अविचल
सधवा असुनी ही विधवा

थांब मुशाफिर ! हिच्या मुखावर
वाचूं ये संदेश नवा !

## माझा छंद

माझा छंद दिवाणा
न कळत मन्मुखिं सुंदरतेचा तरळे तरल तराणा

येइ जगा स्वप्नाची कांती
श्रमितांतरिं सुरुचिर विश्रांती
कलहिं फुले ज्योतिर्मय शांती
दूध फुटे पाषाणा !

येइ धार ललनांच्या नयनां
जनसेवानिरतांच्या वचनां
निद्रारत जनतेच्या स्वप्नां
अन् कुदळीस, कृपाणा

जळुनि जाय मोहुनि भस्मासुर
कलि पातालीं करि देशांतर
कालमुखांतुनि उठे युगांतर
जीवन येइ उधाणा

स्वसुखास्तव जरि गुणगुणतों मी
हर्ष कणकणीं उधळी स्वामी
प्रकाश पाडुनि अंतर्यामीं
सोडवि गहन उखाणा

या छंदानें मुकलें घर जरि
रत लोकत्रय पाहुणचारीं
स्वागतार्थ ये धावुनि दारीं
अडला जेथ शहाणा

# सागराला आली जाग

क्षमा करीं थांबवेना सागराला आली जाग
चंद्र आला डोईवर ढगांची हो पांगापांग

उजळली आपुल्याला दिव्य प्रवासाची वाट
मोह घाली परी तुला कांठचा हा थाटमाट '

बंदरींचे हे ग दिवे रात्रीसवें विझायाचे
शरावीचे कांचपेले पितां पितां फुटायाचे !

भुलायाचें फसायाचें येथ असेंच व्हायाचें
अनुभवावीण परी तुला नाहीं कळायाचें !

नाहीं राग तुझ्यावर जरी गुंतलीस येथें
जातां सोडुनियां तुला माझें काळीज तुटतें

सये, जातीच्या नाखव्या वेळ येतां थांबवेना
तुझ्यावीण जाय तारूं परी जिवा जाववेना !

गात गात तुझीं गाणीं संपवीन तरी वाट
तुझ्यासाठीं ठेवीन या शुद्ध रुधिराचा पाट

रात्रीसवें धुंद तुझी जेव्हां सये ओसरेल
क्षितिजांत पांढरें हें टोंक शिडाचें दिसेल

तेव्हां नको बोल लावूं डोळां आणूं नको पाणी
तुझ्यावरल्या प्रीतीची जाण तीच गे निशाणी

वाट काट वेगें जी मीं तुझ्यासाठीं केली सोपी
स्वप्नें संपतां येथलीं तेथें जाऊं गाढ झोपीं

# सांध्यसुंदरी

इंद्रनील चंद्रकांत सांध्यसुंदरी ही
येइ हसत मधुर मंद विश्वमंदिरीं ही

उंबऱ्यांत धुउनि उन्हें धूळ माणकांची
मूर्ति सजल-पारिजात-कांत पावलांची
नेसुनि ये वसन नरम तलम अंजिरी ही

मंदानिल दुडदुडुनी विलगले पदांला
उचलुनि त्यां मृदुल करें लाविलें उराला
चुंबुनि त्यां मोहरली स्नेहमंजिरी ही

कुरवाळुनि बोलवि ही बोबड्या खगांना
लावुनि गालांस बोट खुलवि वल्लरींना
एक एक नवलदिवा लावि अंबरीं ही

पिककंठी जलवंती उघडुनी उराला
दावि इंद्रचापवर्णचित्ररत्नमाला
कुजबुजली गुज तिजशीं स्वर्गमाधुरी ही

झाले छायार्द्र नेत्र भूमिमाउलीचे
वात्सल्यें जड झाले पयद गाउलींचे
स्वागत हें भावोत्कट बघुनि बावरी ही

व्यथित मना ! कर जोडुनि स्मर ' शुभं करोति '
स्थिरचर एकाग्रचित्त जाहलें सभोतीं
वाहाया तुजवर ये शांतिनिर्झरी ही

# सा ग रा स

आलों चालुनि वाट युगांची
आणि गांठिला तुझा किनारा
शिणल्या शरिरावरी तरारे
तव लाटांपरि दाट शहारा

गेला दिन मन खोलुनि जळतें
वाहुनि तुज रक्ताची ओंजळ
वितळूं लागे मधु रजनीच्या
निळ्या निळ्या डोळ्यांतिल काजळ

क्षितिजाच्या झिलईंत नाहलें
धवल शिडाचें निश्चल तारूं
पडे दिशांच्या अष्टदलावर
भग्नपर्ण जणुं फूलपांखरूं

हरवुनियां कंठांतिल माला
शिणुनी फिरले खग माघारे
छायांच्या रायांत थरकले
हिरवेकाळे लाख मनोरे

चढवित पारा चंद्र चितारी
तरि कांचेची निळी इमारत
चंचलतेनें काढूं पाहे
भंगुरतेवर चित्रें शाश्वत

मींहि कैकदां तव पुलिनीं या
रचिले सुंदर किल्ले, इमले
मोहुनियां रत्नांच्या मोलें
किती वेंचिले शंखशिंपले !

आनंदाच्या निळयापांढऱ्या
लाटा नच मावुनियां पोटीं
तुझ्याच परि मी गात लोळलों
कर्पुरकणिकांच्या या कांठीं

सुगंधजालीं बांधुनि नंतर
जधीं विंधिलें मला फुलांनीं
स्फटिकाच्या पात्रांतुन दिधली
तूंच लाल फेसाळ वारुणी

धुतल्या जखमा आळवीत तूं
क्षितिजींचीं सोन्याचीं गाणीं
विष हृदयांतिल वाहुनि नेतां
तुझें जांभळें झालें पाणी

सखिला मानुनि मानसकन्या
दिले इथें तूं मज नजराणे
छंद तराणे गाउनि झालों
कधीं शहाणे, कधीं दिवाणे

बाल्य निमालें, सरली मादक
तरुणपणाची नवी नव्हाळी
लाख भुकांची, लाख मुखांची
आली कानीं हांक विखाळी

श्वासें त्यांच्या राख उडाली
लकाकलें हृदयांतिल स्थंडिल
अमृत, वारुणि पुरति न आतां
लाख पशांतुन आण हलाहल

जळो, जळो स्वास्थ्याचें कुंपण
दुबळ्या आकांक्षांचें घरकुल
तुझ्यापरी रुधिरांत उठूं दे—
अखंड धडपड, अखंड तळमळ !

कळे मला कां म्हणती तुजला
रत्नाकर, तीर्थांचें आगर
शिकव जगाचें दु:ख गिळुनियां
फळांफुलांनीं भरण्या डोंगर

थकतां माथा असाच दे मज
मायकुशीसम तुझा किनारा
नश्वर नेत्रांपुढें असूं दे
ईश्वरतेचा सदा पसारा

# जपानी रमलाची रात्र

तुझें विजेचें चांदपांखरूं दीपराग गात
रचीत होतें शयनमहालीं निळी चांदरात
रतिरत कुक्कुटसा कुंडीवर आरोहुनि माड
चोंच खुपसुनी फुलवित होता पंखांचें झाड
अद्भुत पंख्यापरि भिंतीवर आंदोलुनि छाया
लावित होती ताप जगाचा नकळत विसराया
धूप उसासत होता कोनीं रजताच्या पात्रीं
विचित्र रेशिमचित्रें होतीं रसावलीं गात्रीं
तुझा पियानो यक्ष जळांतिल होता निजलेला
मनांत गुंफित स्पर्शसुखाच्या स्वप्नांचा झेला
अन् म्यूसेचीं कवनें होतीं माझ्या हातांत
प्रतिचरणाला करीत होती धूम्रवेल साथ
जळत उसासत होतें त्यांसह अंतरांत कांहीं
होता चिमणा श्वान लोकरी घोटाळत पायीं
तोंच वाजल्या तुझ्या सपाता सळसळला घोळ
आलिस मिरवित चालीमधुनी नागिणिचा डौल
करांतुनी तव खिदळत आले स्तनाकार पेले
जळता गंधक पाच उकळती यांहिं रंगलेले
अभीष्ट चिंतुनि आम्हीं त्यांचे भिडवियले कांठ
सुरेहुनी तूं गडे भाजिले ओठांनीं ओठ
स्पर्शें तुझिया आणि पियानो थरारला सारा
मजसम त्याच्या कानशिलांच्या झणाणल्या तारा
गंधर्वांच्या दुहिता जमल्या करित पुष्पवृष्टी
हृदय मदाचें मोहळ झालें जडावली दृष्टी
पोहुं लागले तुझ्या रेशमी अलकांतिल मासे
हवा जाहली जड पाऱ्यासम अंगांतिल वासें

आणि तरंगत डुलूं लागली नौकेपरि शेज
तो कांतींतुन तुझ्या निथळलें फेनाचें तेज
नखें लाखिया, दांत मोतिया, वैदूर्यी नेत्र
अवयव गमले चपल चिवट कीं मयवर्निंचे वेत्र
कात सोडिल्या नागिणिचें तें नवयौवन होतें
विळख्याविळख्यांतुनि आलापित ज्वालांचीं गीतें
गरळ तनूंतिल गोठुनि झालें अंतरांत गोड
कळलें कां मज जडते देवां नरकाची ओढ
डोळे बांधुनि खेळत होतें जीवन मायावी
अंधपणांतच वितळत होतें भूत आणि भावी
तुझ्या जपानी भाषा-लिपिसम अगम्य सुंदरता
असुनी हातीं उरली दुर्लभ आली ना हाता

आजहि तुज शोधितां कधीं ती रमलाची रात
पाठींतुनि जंबिया मधाचा घालि काळजांत !

## सा द

एकच माझा साद ऐक प्रभु एकच माझा साद
पचूं न देईं मला कधींही इवलासाहि प्रमाद

स्वार्थें माझे मिटतां लोचन
घाल त्यांत अविलंबें अंजन
मोहिं गुंततां जरा कुठें मन मागें लाव प्रवाद

परदुःखावर शिजलें जें सुख
विटाळलें जरि तेणें हें मुख
या हृदयांतुनि त्या दुःखाचे उठवीं शत पडसाद

टेच अचानक लाव पदांला
खोक पडूं दे अभिमानाला
पाज यशाची चढतां मजला चढला जरि उन्माद

कलेंतुनी घसरतां विलासीं
अथवा मुक्तत्वांतुनि दास्यीं
आग लावुनी आत्मसुखाला धुमसत ठेव विषाद

निष्ठा जरि मम दुबळी झाली
खचवीं भू झणिं चरणाखालीं
विकल करीं वरवंचित प्राणा कोंडुनि अंतर्नाद

विश्वनाट्यविकसनीं तुझ्या या
रंगत मजला हवें फुलाया
दयामया ! कविपति ! निजनियमा न करीं मज अपवाद

पापासरशीं देउनि शापा
सन्मार्गीं मज लावीं बापा !
जाणतसें मी तुझ्या घरीं प्रभु ! शासन हाहि प्रसाद

# भिडली रात्र पहाटे

माझें सुख मोठें, सुख मोठें, ठेवुं कळेना कोठें

उरीं उगवला आत्मसुधाकर जनीं चांदणें दाटे
बाग बहरले जिकडेतिकडे बोथट झाले कांटे
छायेसम मज गमलें खोटें, सत्यचि तें उफराटें
रसलंपट मी, तरि मज क्वचित गोसावीपण भेटे
वाट उजळली चिरयात्रेची भिडली रात्र पहाटे
आटे आतां तृष्णा, वाटे त्रिभुवन मनिं कोंदाटे

# सायंप्रार्थना ✓

आतांच संपली सांध्य-वंदना त्याची
जो नवयुग-जनिता करुणामूर्ति दधीची
जनलाटा हटल्या, नटल्या तत्तेजानें
जणुं कांचनरविच्या स्पर्शें सागरवीची !

परि मंद अम्ही या दिव्य सुखा मुकलेले
हरिजनसे प्रभुमुख पहावयास भुकेले
डोळ्यांत घेउनी प्राण तिष्ठलों दारीं
ओवीत अंतरीं भावभक्तिचे झेले !

श्रुति धन्य ! अहाहा ! उठला जयजयकार
सुखकंपें फुलला गात्रांचा परिवार
राजमार्ग झाला उघडा वारा हात
शुभसंचित फळलें, दिसला प्रभु साकार !

ती मूर्ति साजिरी ज्योती कर्पुरगौर
ऋत–शांति–अहिंसा दलितस्फूर्ति गंभीर
गंगेपरि गेली पुढुनी संथ गतीनें
निःशब्द प्रीतिनें जिववुनि दोन्ही तीर !

जन सर्व पांगला, मी खिळलों परि धरणी
पदमुद्रा प्रभुच्या चुंबित अंत:करणीं
जनसेवक पथ तो कृतार्थ झाला आज
धजलों न तया मी तुडवाया या चरणीं !

प्रभु! तुमचें दर्शन घडलें झडलें पाप
अन् क्षणीं युगांचा जाणवला अनुताप
तें भाग्य पथाचें द्या हो या जीवाला
तुडवोत तया मग सुखें व्यापसंताप

ही अशी प्रार्थना उठली हृदयीं तेव्हां
दिन सरतां स्मरतों मी ती केव्हां केव्हां
चाहूल श्रुतींवरि ये त्या दिव्य पदांची
जनपदाघात मज दुःसह होती जेव्हां

## गृहलक्ष्मीस

आर्ये ! भार्ये ! मत्प्रियदर्शिनि ! मधुगात्रे ! सुखदात्रे !
कौस्तुभगर्भे ! जीवनसुरभे ! चिन्मात्रे ! गृहधात्रे !
विमलचरित्रे ! परमपवित्रे ! जननांतरसन्मित्रे !
चिरजननी ! चिरतरुणी ! रमणी ! यशमांगल्यधरित्रे

सखे ! श्रमांतीं तूं विश्रांती नित्य दिनांतीं शांति
पूजामूर्ती हो या हृदया कवितास्फूर्ति निवांतीं
पद्मदेहिनी ! ठेवुं नको मज गुंतवुनी निज गात्रीं
मरंद देउनि गंध न चोरीं स्थित जो तव हृत्पात्रीं

खग जे रतले पार्थिव भोगा मुकले ते दिग्भागा
त्यासह मंगल आत्मपरागा, स्वपराच्या अनुरागा
यास्तव नवरविच्या गे स्पर्शे उमल अनंत दलांनीं
नव कवनें, भुवनें, गगनें मज आकळुं दे पंखांनीं

रूपांतुनि तव मुक्त करुनि मज दावीं दिव्य स्वरूपा
पतनापासुनि सांभाळीं गे माझ्या शुभसंकल्पा
त्रिविध सुखें गे त्रिविधा विपदा अनुभविल्या सहभावें
अतीत त्यांना होउनि आतां वाटे गात रहावें

सुतकन्यांनीं अंगण भरलें, सुवर्ण चढलें दारा
वात्सल्यानें कृतार्थ केलें सखि ! अपुल्या शृंगारा
आजवरी घरिं जगत पाहिलें, यापुढतीं घर जगतीं
घ्याया याची शुभप्रचीती करिं मज अतिरति, विरती

तेजें तव दे मज चिरनवता, अमर्त्यता, रसवत्ता
वरदानें करिं मंगलतर मज गृहपति, नर, उद्गाता

# स्पर्श

फुलल्या लाख कळया
स्पर्शसुगंधा घन अंधारीं फुटल्या ग उकळया

ध्वनिकंपित तनुच्या शततंत्री
बंदी मन रतिमोहनमंत्रीं
लय लागुनियां नाचुं लागल्या स्वप्नींच्या पुतळया

धूप जळे तिमिराचा पवनीं
विनिद्रनयना व्याकुळ अवनी
पिकुनी लवल्या नक्षत्रांच्या द्राक्षलता पिवळया.

भुई वाळुची संगमरवरी
तीवर काळया फेनिल लहरी
व्यथेंतुनी सुख मंथित ग्रंथित झाल्या मधुर निळया

सुटल्या अवचित जटिल समस्या
फुटला रव स्मरकुटिल रहस्या
जननांतरिंच्या स्मृतिंच्या ज्योती पाजळल्या सगळया

द्रवलीं नयनें, स्रवलीं हृदयें
दो चंद्रांच्या संगम-उदयें
दुणी पौर्णिमा, रसा न सीमा, उसळयांवर उसळया

# सजवूं कार्तिकमास

सखे ! चल सजवूं कार्तिकमास
चांदणें भुललें आज उन्हास

पाजळती दिवजांसम झाडें
खुलीं नभाचीं रत्न-कवाडें
दिशा त्यांतुनी ओलेत्यानें बघती सांग कुणास

झळझळती गवताच्या गंजी
हवेंत भ्रमती चतुर किरमिजी
अहा ! पिसोळीं पुष्पदळांसम वहात भिडति तृणास

गुरांवरी मोहरली मखमल
पालवींत जरतारी किलबिल
झुळुक नदीवरली ये शीतल लालुचवीत मनास

निवळ कोवळें तेथिल पाणी
शिळा गळे भरिती मोत्यांनीं
पोहत आंतुनि लता पोपटी कवटाळिति चरणास

तिथें कुठें तरि दडुनि केवडा
पातींतुन वाजवी चौघडा
करूं तिथें चल खजिना उघडा, रिझवुं मना—नयनांस

नवरात्रांतिल मादक जाग्रण
अन् नंतरचें सीमोल्लंघन
त्यांतुनि सखि ! जें मेळविलें धन दावूं सुरललनांस

अंगिं थंडिचा फुलतां मोहर
आणिक झुलतां दिवे घरांवर
स्वप्नें रेखित अंधारावर जाउं सवें सदनास

# शांतीचा जयजयकार ✓

घुमवा जयजयकार शांतिचा घुमवा जयजयकार
दिव्यत्वानें दाहि दिशांचा उजळा हा प्राकार

पाप मिरवलें रात्रीं घेउनि पुण्याचा वेष
देशांचे ध्वज इथें नाचले ओकित विद्वेष
अन् स्पर्धेनें सहोदरांनीं केले नरमेध
पुन्हा मांडिला उभ्या जगाचा अखंड उच्छेद
हवेंत लढती भुतें मृतांचीं, मुक्तीविण लाचार
द्विजांनो, मुक्तीविण लाचार
घुमवा जयजयकार शांतिचा घुमवा जयजयकार

पहाट झाली, निज घरट्यांतुनि खुले करा प्राण
मानव्याच्या महदाकाशीं त्वरें करा स्नान
निर्विष होउनि सुरू करा उपनिषदांचे घोष
अन् शांतेचा रोष घालवा ओतुनि संतोष
अर्घ्यशुद्धी करा जगाची संन्यासून विकार
अमंगल संन्यासून विकार
घुमवा जयजयकार शांतिचा घुमवा जयजयकार

आनंदाचे वसंत तुम्ही, श्रेयांचे घोस
चोहींकडुनी सत्वरसाचा पाडा पाऊस
हृदयीं तुमच्या चराचराचें अनंत कल्याण
धर्म कर्म सर्वत्रांचें करा परित्राण
परमात्म्याच्या स्वप्नां आणूं रंग-रूप-आकार
मनोरम रंग-रूप आकार
घुमवा जयजयकार शांतिचा घुमवा जयजयकार

सर्वोदयधात्री ही भूमी सकलांची माता
पिता प्रभाकर उजळी, क्षाळी अखिलांचा माथा
उन्हा, चांदण्या, उदका, पवना सर्वां समभाव
प्राणाचें संगोपन आहे विश्वाचा भाव
आंध्य फेडुनी या सत्याचा करा प्रचार पुकार
अहर्निश करा प्रचार पुकार
घुमवा जयजयकार शांतिचा घुमवा जयजयकार

जगन्मुक्तिचें महाकवींचें म्हणा महागान
बुद्धाख्रिस्तापरि कृष्णार्पण करा सुखें प्राण
प्रतिष्ठापनेस्तव शांतीच्या मरणाचें वाण
घेउनियां वाढवा महीवर जीवन-महिमान
अभ्यंतरिंच्या भगवंताचा घडवा साक्षात्कार
प्रत्यहीं घडवा साक्षात्कार
घुमवा जयजयकार शांतिचा घुमवा जयजयकार

# भंग्यांच्या घरीं

हरि आला हो, हरि आला हो
भंग्यांघरिं हरि आला हो
हरिजन झालों सर्वांर्थानीं सगळा पंक गळाला हो

झाडा रस्ते, झाडा अंगण
न्हाउनि या हो, लावा चंदन
दसरा समजुनि दिवस आजचा आनंदानें पाळा हो

घरधनिणींनो घेउनि बाळां
लावा कुंकुमटिळक कपाळां
सौभाग्याची आज दिवाळी रंगी फुगडी घाला हो

या, पोरांनो धमाल उडवा
टाळ ढोलकीं मृदंग बडवा
हरिनामाचा लेजिम खेळत स्वर भिडवा आभाळा हो

छळ गिळिला तो येइ फळाला
बळ चढलें गळल्या गात्रांला
चोखोबांना घेउनि नाचे भागवतांचा मेळा हो

पडती आनंदाश्रू त्यांचे
पायपोस पसरा हृदयांचे
त्यावरुनी हरि आणूं या घरिं चला करूं दहिकाला हो

प्रज्वळल्या नयनां–प्राणांनीं
गाउनि ओव्या गाउनि गाणीं
उजळित सदनें उजळित गगनें या हरिला ओवाळा हो

# आ का श मा उ ली स

कोर विलोरी तुझ्या कपाळीं शिरिं मोत्यांची जाळी ग
तुझ्या लोचनीं मुक्तात्म्यांची शाश्वत नित्य दिवाळी ग

हरिकांतीचें वस्त्र तनूवर त्यावर ज्योतिश्चित्रें ग
स्रवती त्यांतुन परम पवित्रें अलिखित संतचरित्रें ग

पाप जाळुनी काजळ त्याचें गौरविसी निज नयनीं ग
पाणी सतिंच्या मुद्रेवरचें गाळुनि उजळिसि वदनीं ग

कूस तुझी नवरत्नकेतकी पराग भास्वत कोटी ग
अन् चंद्रांनीं भरुनी वाहे तुझी सुवासिन ओटी ग

वात्सल्याची तूं गायत्री, देवदयार्णव पोटीं ग
दुभुनी निशिदिनिं पोशिसि साम्यें भूतें लहानमोठीं ग

तूं ऋषिंचें तप, तूं कविप्रतिभा, तूं मुनियोगसमाधी ग
तूं श्रमसुखरत निष्पापांची शुभनिद्रा निरुपाधी ग

कर पावन तव या शिरिं असतां घर आम्हां नित जवळी ग
अमृतकमळें फुलुनी येती या तापत्रय-गरळीं ग

माते ! निजकरिं जग हें अमुचें पक्ष्यापरि कुरवाळीं ग
हृदया त्याच्या शर लागुनियां आली लाल जिव्हाळी ग

सुखशांतीचा, विश्रांतीचा फुंकर सांजसकाळीं ग
घालुनि, त्याला शिकव म्हणाया दिव्य अनंतभुपाळी ग

# जीवन त्यांना कळलें हो

जीवन त्यांना कळलें हो
मीपण ज्यांचें पक्व फळापरि
सहजपणानें गळलें हो

जळापरी मन निर्मळ ज्यांचें
गेलें तेथें मिळलें हो
चराचरांचें होउनि जीवन
स्नेहासम पाजळलें हो

सिंधूसम हृदयांत जयांच्या
रस सगळे आकळले हो
आपत्कालीं अन् दीनांवर
घण होउनि जे वळले हो

दुरित जयांच्या दर्शनमात्रें
मोहित होउनि जळलें हो
पुण्य जयांच्या उजवाडानें
फुललें अन् परिमळलें हो

आत्मदळानें नक्षत्रांचें
वैभव ज्यांनीं तुळिलें हो
सायासाविण ब्रह्म सनातन
घरींच ज्यां आढळलें हो
—उरींच ज्यां आढळलें हो

# अमृत खेचुनि आणूं भूवर

समुद्रवीणा छेडित चंद्रा उधळ निळ्या लहरी
धुंद तुझ्या साथीवर गाते मत्प्रतिभा लहरी

तुझें चांदणें माझें गाणें ये ये चल हिसळूं
माधवींत हिम, दुधांत केशर ये ये चल मिसळूं

नको नको संकोच—झोपलें जग सगळें शहरी
जागे आपण दोघे असल्या स्वर्गोत्सवप्रहरीं

रसिक खरोखर जे कुणि या क्षणिं गिरिवरि वा पुलिनीं
जाग्या ज्या या वेळीं त्या रे ऋतुमति रसनलिनी

कुणि शरविव्हल, कुणि स्मरविव्हल, कुणि अनलीं जळती
आणि कुणी पापाच्या दंशें रुधिरीं तळमळती

ज्याख्या नकळुनिही सख्यानें जीवन त्यां कळतें
जीवन ज्यांना कळतें त्यांना काव्यहि आकळतें

काव्य जयांना उमगे त्यांचा तूं रे रसराज
त्यांत आज तुजवरती माझा चढला स्वरसाज !

गड्या तुझ्यापरि मीही प्यालों सूर्याची आग
परि दर्यापरि आहे वाहे अपुला अनुराग

कळो ना कळो महती अपुली दुर्मुखल्या जगता
त्यासाठीं नच अडली केव्हां अमुची रसवत्ता

१८५८१

जहरप्राशन करुनी जेव्हां हर उरिं कळवळला
खेळवुनी तुज निटिलीं त्यानें अतिरस मेळविला

सामर्थ्याची चंदनउटि जी ती सौंदर्य-कला
वन्हि तिच्यांतच हिम होउनियां रसरूपीं थिजला

नीतीला रेखुनि प्रीतीचा लावूं सुभग टिळा
शक्तीच्या शिरिं ये भक्तीचा चढवूं मुकुट निळा

ही श्रीमंती आहे तोंवर चल आनंद करूं
ये उभयांच्या हृदयसुधेनें विश्वकटाह भरूं

समुद्रवीणा छेडित चंद्रा उधळ निळ्या लहरी
अमृत खेंचुनि आणूं भूवर दडलें जें जहरीं

# तव नयनाचें दल हललें ग

तव नयनाचें दल हललें ग !
पानावरच्या दवबिंदूपरि
त्रिभुवन हें डळमळलें ग !

तारे गळले, वारे ढळले
दिग्गज पंचाननसे वळले
गिरि ढासळले, सुर कोसळले
ऋषि, मुनि, योगी चळले ग !

ऋतुचक्राचे आंस उडाले
आकाशांतुनि शब्द निघाले,
" आवर आवर अपुले भाले
मीन जळीं तळमळले ग ! "

हृदयीं माझ्या चकमक झडली
नजर तुझी धरणीला जडली
दो हृदयांची किमया घडली
पुनरपि जग सावरलें ग !

# रुमडाला सुम आलें ग

तुला मला उमगला जिव्हाळा जन्मांचा पट फिटला ग
अन् शब्दांचा प्रपंच सगळा कमळांसम हा मिटला ग

तुला पहातां पहाट वाटे ओतीं कुरणीं मोती ग
प्रभेस मिळती कृतार्थ होती अभिलाषांच्या ज्योती ग

देखियल्याविण तव तनु मजला बाग फुलांची उघडी ग
खुडिल्याविण त्यां मन्मन झालें अन् सोन्याची परडी ग

मन तव चंद्रापरि करि सोबत जेथें संचित नेतें ग
चराचरांतुन प्रेमळपण तव हासत जवळी येतें ग

तुझ्या लोचनीं पावन सरिता क्रांती आणिक शांती ग
मदन अंतरीं जळला, पडल्या अस्थी प्रयागतीर्थी ग

आलिंगन-चुंबनाविना हें मीलन अपुलें झालें ग
पहा, पहा, परसांत हरीच्या रुमडाला सुम आलें ग

## साबरमतीच्या कांठीं

कर बांधाबांध गडे मांडू पुन्हा नवी चूल
संपली ग ताटातुटी विणूं आतां घरकूल

काढ तुझी लगबग आवडती साडीचोळी
बांध केस, माळ फूल, लाव टिकली वाटोळी

तुपाची ग फुलवात लाव भावें देवापुढें
लाव अंगारा मुलांना आतां संपलें सांकडें

कर आई-वडिलांना तीन वार नमस्कार
त्यांच्या आशीर्वादें असा आज सांधला संसार

तुझा उधळिला जो मीं गडे संसार देखणा
त्याच्यामुळेंच तयाचा सरे आज उणेपणा

खवळल्या समुद्रांत जरी घातली मीं उडी
मायमाउलीनें आज मला उचलिलें तडी

येथें आहे महात्म्याच्या पुण्याईचें तपोवन
आहे शांती आहे तृप्ती सर्व मुक्तीचें साधन

येथें पावनतीर्थात रमे सारसांची जोडी
साऱ्या आसमंतीं आहे गोव्यामधलीच गोडी

मोरपारव्यांची येथें दीसरात आहे दाटी
खारी, माकडांचीं पिलें धीट 'दीपका'च्या साठीं

'चंद्रनाथ' 'भारती'ला दुधा कांहीं नाहीं उणें
तुझ्यामाझ्यासाठीं आहे वाळवंटांत चांदणें

महात्म्याच्या पावलांनीं येथें धूळ झाली बुका
हवेमध्यें श्वास त्याचे धूप यायचा न तुका

तुझी भक्ती, तुझा त्याग, तुझें तप आलें फळा
माझ्या भविष्याचा मार्ग मला झाला ग मोकळा

महात्म्याच्या संगतीचा मला लाभला एकान्त
सहा महिन्यांत झाला खरा स्वप्नींचा दृष्टांत

त्यानें उचलिला भार सारी निरसली चिंता
त्याच्या पावलींच्या जळीं सोडूं आसक्तिअहंता

पुण्यक्षेत्रीं राहून या त्याचें स्वरूप आठवूं
साऱ्या गात्रांतून त्याला उरीं-जीवनीं साठवूं

गाऊं त्याचीं ओव्या-गाणीं शेकड्यांनीं, सहस्रांनीं
त्याच्या पावलांच्या खुणा उमटवूं पानोपानीं

चरक्याच्या तालावर रचूं त्याचें रामायण
जीवनांत पदोपदीं करूं त्याचें पारायण

आण यादस्तीनें परी एक येतांना नारळ
आणि बांध पदराला चार गोव्याचे तांदुळ

त्यांत आहे आपुल्याला जीवनाची फलश्रुति
पितरांची, वंशजांची आम्हां सर्वांचीच मुक्ति

## माझ्या मनाची ‘माउ’ ली

माझ्या मनाची ‘ माउ ’ली   फिरे वाटोळीवाटोळी
स्वतालाच धरण्याचें   तिला वेड तिन्ही काळीं

शेज चुलीची दिवसा   उशी राखेची रात्रीला
पीत सवांगानें वही   जाते स्वप्नांत यात्रेला

वाढणाऱ्या काळोखांत   तिचे उजळती डोळे
घर माझें सांभाळाया   तिचीं जागती पाउलें

करी घुशीउंदरांचा   लाल-मंगल शेवट
पाजी पोटींच्या वह्णीला   खाऱ्या रुधिराचे घट

विष बाधतां त्यांतलें   अमृताचा घेई शोध
खुडी अंकुरामधोनी   निवडून आयुर्वेद

पतंजलीची ही आई   घाली योगाचीं आसनें
ओढी अशौचावरोनी   शुद्ध भूचीं पांघरुणें

तिची रती अगोचर   तिचा अज्ञात अतार
तिच्या रसनेंत आहे   शुद्ध साष्टांग शृंगार

लक्ष प्रसवांचें वाहे   तिच्या भोगांत क्रंदन
एका युतींत ती राहे   आठ पिलांची गाभण

अष्टपुत्रा धुंडाळिते   घरीं काळोखाचा कोन
पिसावते कातावते   दिवे विजेचे पाहून

घेते आक्रसून गात्रें   पाहे होऊन व्याकुळ
घाली लावी गळ मला   तिच्या मातृत्वाची कळ

दिवे मालवितों सारे   शहारतों अंगोपांगीं
रव ऐकून पिलांचे   ओलावतों अंतरंगीं

फुटावया त्यांना डोळे   थांबतों मी कांहीं काळ
तोंच आक्रोश ये तिचा,   " बाप पोरां झाला काळ ! "

दिवे लावितां दिसेना,   काळोखांत सापडेना
अशी माझ्या ' माउ 'लीच्या   होई संसाराची दैना

तरी तशांतून वांचे पोर   एखादें दुसरें
मरणाच्या वेदीवर   खेळे जीवन हासरें

तिचें यौवन राखाया   पोरें खाई का भ्रतार ?
काय एकासाठीं वाहे   माय आठांचा हा भार ?

त्याग-भोगाचा हा खेळ   कळे परी आकळेना
मात्र सृजनाकारणें   अर्थ जीवना-मरणा

# क्षि ति जा क डे

जरा गोलसर जरा ओलसर हिरव्या माळावर
रांगत पांगत होती सरकत थरथरती लोकर

असेंच होतें चित्र बिंबलें निळसर क्षितिजावर
उभयांना कुरवाळित होते प्रभावतीचे कर

चित्त हरिखलें तोंच देखिलें झाड छत्रसें खडें
सकल तमाला उरीं कवळुनी खिन्नहृदय बापुडें

मीं खिळलेला खिस्त देखिला त्याच्या बुंध्यावर
होती त्याची माता चारित मेंढ्या कुरणावर

जखम अंतरीं घेउनियां मी हसत चाललों पुढें
वेदनेंतुनी वात्सल्याच्या विशाल क्षितिजाकडे

## माझी पूजा

हे मित्रांनो ! भाग्य न माझें तुमच्यासम जळण्याचें
मुख मंगल निज मातृदेविचें युग युग पाजळण्याचें
तुम्हि श्रद्धेच्या ज्योती
तुम्हि धैर्याच्या मूर्ती
नमन तुम्हांला त्रिवार माझें, पुढच्या सर्व पिढ्यांचें

भाग्य न माझें तुम्हांपरी जन ! मुकेपणीं जळण्याचें
अखंड अपुल्या निःश्वासांनीं परिसर दरवळण्याचें
धूप तुम्ही उदबत्त्या
हरण सदैव असत्या
स्मरण आपुलें श्वसन अखंडित संजीवन हृदयांचें

अन् भगिनींनो ! भाग्य न माझें तुमच्यासम फुलण्याचें
सर्व समर्पुनि निर्माल्याचें मंगल धन व्हायाचें
तुम्हि रसपुष्पें शोभा
सौंदर्याची आभा
स्मृतींत तुमच्या सत्य उद्यांचें स्वप्न होउनी नाचे

अन वडिलांनो ! भाग्य न माझें तुमच्यासम झिजण्याचें
नित्य उगाळित जीवनकाष्ठें शामकता देण्याचें
तुम्हि चंदन, हित, शांती
आश्वासन, विश्रांती
पुण्योदक नयनांतिल तुमच्या पाणी अभिषेकाचें

भाग्य न माझें अन् श्रमिकांनो ! तुम्हांपरी खपण्याचें
पीक काढुनी ताट भराया षड्रस-नैवेद्याचें
तुम्ही फळें सेवेचीं
उदंड आरोग्याचीं
तुमच्या बीजांमध्यें युगंधर सारे वृक्ष उद्यांचे

महापूजनीं स्थान न कळुनी या दुबळ्या जीवाचें
रितेपणीं निज निश्चल बसलों मुख पाहत देवीचें
हललें हृदयीं कांहीं
निनादले स्वर देहीं
घंटा झालों, स्त्रवलों स्तोत्रें, यश तुम्हां सर्वांचें

## असलें हें फळ केविं तपाला ?

असलें हें फळ केविं तपाला ! कुठलीं पापें झालीं गोळा ?
बसोत वसले कान आमुचे, तात, तुम्ही पिंडांतुन बोला

पुण्य मुहूर्ता घरांत शिरलों, तोंच वास्तु ही दुभंग झाली
तुटून पडली देवघरांतिल युगायुगांची अन् माठोळी

गोड तुम्हीं जी आळ लाविली, आंबा होउनि पाडा आली
फळांतुनी पहिल्याच कशी हो तुम्हांस डसली तक्षक-आळी ?

तुमचें पडलें रक्त शिरावर आणि आमुचीं फिरलीं माथीं
हातीं आलें सोनें त्याची बघतां बघतां झाली माती

हिंसेवांचुन शौर्य दिसेना, सत्तेवांचुन सत्य पटेना
कपिला दुभते दारीं तरिही संशय अमुचा कसा फिटेना ?

थेटर झालें अमुचें देउळ, मकानामधें दुकान आलें
आणि आमुचें शील मिरवितें पांढऱ्यांत गुंडाळुन काळें

कमळें तुडवुनि गाळ निवडिते नवी 'युगंधर' अमुची कविता
धुणीं धुण्यांतच रंगुनि वाहे अमुच्या साहित्याची सरिता

कसतो त्याला ना धड भाकर, श्वान धनाचा चघळी पोळी
कुलटेच्या न्हाणींत सारिते पतिव्रता गंधाची मोळी

खाकी जाउनि आली खादी तरी न सरल्या लाथा, गोळ्या
अजून रडती काळोखांतुन पिचल्या मळल्या साड्या-चोळ्या

पराधलक्ष्मी पडलीं भूमी, तरि काखेला अमुच्या झोळी
स्वातंत्र्याच्या पारावरतीं अमुच्या चारित्र्याची होळी

स्वर्णमालिनी फुटली अंगीं नखें कातडी स्रवती धारा
आणि चालला कली पुकारित दिवसाढवळ्या अमुचे बारा

खतासारखी तरीहि तुमची मुळांत अमुच्या वसते भाषा
श्रद्धा तुमची अमुचें जीवन, तुमचें जीवन अमुची आशा

द्या हो द्या उःशाप अम्हांला, झाडा हृदयांतली काजळी
रुधिरांतिल नरकासुर जाळा, प्राणांतुन पाजळा दिवाळी

# वास्तवता मज न दिसे

पागल मी पागल मी वास्तवता मज न दिसे
वस्तूंचे प्राण मला लाविति दिनरात पिसें

पुष्पांतुनि मोहविती शीतल मज अग्निशिखा
कधिं बाळें देवांचीं लाविति निज ओठ मुखा

पर्णांतुनि लसलसत्या चमचमती मोरपिसें
खुदखुदतें त्यांतुनि कधिं गोपींचें गोड हसें

तृण कोमल ये वरती नमवित जधिं खडक चिरे
मरणाला जिंकुनियां श्रद्धा हृदयात शिरे

दगडादगडामधुनी जळ जेव्हां झुळझुळतें
आईचें हृदय मला सहजपणें उलगडतें

मूकांच्या जखमांतुनि जेव्हां जड रुधिर गळे
वाल्मिकिचें रामायण पढल्याविण मजसि कळे

गरुडजन्म मजसि उषा, कृष्णमृत्यु मजसि निशा
रुद्राचें भस्म मला जळणाऱ्या दाहि दिशा

व्यासाच्या प्रणवाचें मंथन मज सिंधुमधें
प्रीतीची जीवकळा मेघाच्या बिंदुमधें

बद्धासन बुद्ध मला क्षितिजांतिल गिरिमधुनी
सूर्यास्तांतुनि दिसते दधिचीची नित्य धुनी

खंडित वृक्षांत उभ्या खिळलेला ख्रिस्त दिसे
'जूडा'चा दंश मला मृत्यूहुनि खोल डसे

भोगविलासांत दिसे कलिची मज रक्तपिती
अप्सरेंत मी बघतों जळणाऱ्या लक्ष सती

भिक्षेच्या करटींतुनि भस्मासुर भिवनि मला
मी रडतों ओरडतों, ' उघड तिळा, उघड तिळा ! '

ऐकेना परि कोणी अग्नि उरीं धडधडतो
ज्वालांपरि मी निरर्थ हा अनर्थ बडबडतों

शापित मी, शासित मी, वास्तवता मज न दिसे
वस्तूंतुन ठेचाळत धुंदित मज हिंडतसें

# अजून थोडें सोस मना

रे, अजून थोडें सोस मना

जळल्यावांचुन नाहीं ज्योती
कढल्यावांचुन नाहीं मोती
रडल्यावांचुन नाहीं प्रीती
        नच घणांवांचुनी देवपणा

प्रसववेदनांविण ना सृष्टी
तपनावांचुनि नाहीं वृष्टी
दुःखाविण ना जीवनदृष्टी
        मेल्याविण मिळला स्वर्ग कुणा ?

क्षुधेविणें रसनेंत न गोडी
छलनाविण ना सुकृत-जोडी
उरिं फुटल्याविण सुटति न कोडीं
        रस नसे यातनेविण कवना

दातांनीं जरि जीभ चाविली
कुणि बत्तिशी सांग तोडिली ?
सगळी ही अपुलीच मंडळी
        मग शब्द कशाला उणादुणा ?

घरटें तुटतां, खुलें दिगंतर
मोह संपतां, आप्त चराचर
सोससोसतां सासर हो घर
        अद्भुत यापरि हरिची करुणा

# खिडक्यांवर वाजे वारा

खिडक्यांवर वाजे वारा ग
चल उघड सुंदरी दारा

रस्त्यांत धुळीचे भंवरे
नभ क्षणांत झालें गहिरें
रवि ठिबके होउनि पारा ग

खोडांतुनि फुटले भास
दगडांतुनि सुटले श्वास
रजताच्या झडल्या धारा ग

सांभाळित अंचल-ओचे
उघडलें दैव कोणाचें ?
निर्वेध वेचुं या गारा ग

करुं मुखांत त्यांचें पाणी
आकळूं ऋतू गात्रांनीं
दो क्षणांत निववुं सहारा ग

उच्छृंखल यौवन नाचे
भय सरे जरामरणाचें
ये बहर पुन्हा शृंगारा ग

मातींतुनि खिदळे पाणी
पाण्यांतुनि फुटती गाणीं
गाण्यांत हिरवळे चारा ग

प्राणांत नवीनच ज्योती
पावलींत झालर मोतीं
नवतोरण घरसंसारा ग

# माझ्या गोव्याच्या भूमींत

माझ्या गोव्याच्या भूमींत
गड्या नारळ मधाचे
कड्याकपारीमधोनी
घट फुटती दुधाचे

माझ्या गोव्याच्या भूमींत
आंब्याफणसांची रास
फुलीं फळांचे पाझर
फळीं फुलांचे सुवास

माझ्या गोव्याच्या भूमींत
वनश्रीची कारागिरी
पानाफुलांची कुसर
पशुपक्ष्यांच्या किनारी

माझ्या गोव्याच्या भूमींत
उन्हाळ्यांत खारा वारा
पावसांत दारापुढें
सोन्या चांदीच्या रे धारा

माझ्या गोव्याच्या भूमींत
येतें चांदणें माहेरा
ओलावल्या लोचनांनीं
भेटे आकाश सागरा

माझ्या गोव्याच्या भूमींत
चांफा पानावीण फुले
भोळाभाबडा शालीन
भाव शब्दांवीण बोले

माझ्या गोव्याच्या भूमींत
गड्या साळीचा रे भात
वाढी आईच्या मायेनें
सोनकेवड्याचा हात

माझ्या गोव्याच्या भूमींत
सागरांत खेळे चांदी
आतिथ्याची अगत्याची
साऱ्या षड्रसांची नांदी

माझ्या गोव्याच्या भूमींत
जिव्या सुपारीचा विडा
अग्निदिव्यांतुन हसे
पाचपोवळ्यांचा चुडा

माझ्या गोव्याच्या भूमींत
काळे काजळाचे डोळे
त्यांत सावित्रीची माया
जन्मजन्मांतरीं जळे

माझ्या गोव्याच्या भूमींत
लाल माती, निळें पाणी
खोल आरक्त घावांत
शुद्ध वेदनांचीं गाणीं

माझ्या गोव्याच्या भूमींत
खड्गा जडावाची मूठ
वीर-शृंगाराच्या भाळीं
साजे वैराग्याची तीट

माझ्या गोव्याच्या भूमींत
उंच घूड देवळांचे
ताजमहाल भक्तीच्या
अश्रूंतल्या चांदण्याचे

माझ्या गोव्याच्या भूमींत
तृणीं सुमनांचे गेंद
सिद्ध कुणब्यांच्या तोंडीं
शुद्ध सौंदर्याचे वेद

माझ्या गोव्याच्या भूमींत
सुखाहुनी गोड व्यथा
रामायणाहुनी थोर
मूक उर्मिलेची कथा

माझ्या गोव्याच्या भूमींत
सारा माझा जीव जडे
पुरा माझ्या कवनांचा
गंध तेथें उलगडे

# हिरवळ आणिक पाणी

१

हिरवळ आणिक पाणी
तेथें स्फुरती मजला गाणीं
निळींतुनी पांखरें पांढरीं किलबिलतात थव्यांनीं

सुखांत चरती गुरेंवासरें
लवेंतुनी लहरतें कांपरें
हवेंतुनी आरोग्य खेळतें गार नि आरसपानी

उरीं जिथें भूमीची माया
उन्हांत घाली हिरवी छाया
सांडित कोमल आनंदाचे पाझर पानोपानीं

जिथें अशी समृद्ध धरित्री
घुमति घरें अन् पुत्रकलत्रीं
रमे श्रमश्री माहेरींच्या स्वाभाविक लावण्यीं

सख्यापरतें जिथें न बंधन
स्मितांत शरदाचें आमंत्रण
सहजोद्गारीं गाढ चांदणें, स्पर्शीं स्नेह हिमानी

ऋतूऋतूंतुन जिथें सोहळे
तसेच उघड्यावरी मोकळे
आणि अंगणीं शृंगाराची निर्मळ अमृतवाणी

माणुस जेथें हवाहवासा
अभंग-ओवीमधें दिलासा
विश्वासावर जीवन सुस्थिर, श्रद्धा नेक इमानी

देव जिथें हृदयांत सदाचा
भार मनाला नसे उद्यांचा
सुखें दुज्याच्या हिरवळ चित्तीं, दुःखें डोळां पाणी

# अद्भुत वारा

आज अचानक नकळे कोठुन आला अद्भुत वारा
खिडक्या दारें उघडुनि ओतित स्वर्णिल अमृतधारा

भांड्यांच्या उतरंडी पडल्या भुइभर झालीं धान्यें
भेदरुनी त्यांवरलें उठलें शनैश्चरांचें ठाणें
राख झाडुनी लखलखला अन् समिधांमधिल निखारा

काळोखाचा धूप जळाला, घर भरलें गंधानें
वातीवरची झडुनि काजळी अंकुरलें अन् सोनें
जुन्या विषावर सोडित असला नवीन मंत्र-उतारा

कवितांवरची धूळ उडाली, फडफडलीं अन् पान
शब्दांचे गज तोडुनि झालीं मुक्त अनावर गानें
ध्यानांतच घुमल्या दुमदुमल्या स्थिरवीणेच्या तारा

भिंतीवरचे लेप वितळले, मावळला मळ सारा
स्फटिक तयांतुन पाजळला अन् घेउन पोटीं पारा
एकच तारा करि करुणेचा सगळीकडुन पहारा

मृत्यूविण हा जन्म नवा मज हांकेवीण इषारा
कृतीविणें निर्मिती क्षणोक्षण घराशिवाय निवारा
अतां रवीपरि चराचरांतुन बघेन निज अवतारा

# मी नंदाघरची बावडि ग

नंदाघरची बावडि ग, मी नंदाघरची बावडि ग
दिसुनी क्षणभर श्याम मनोहर त्यासम झाल्यें लालडि ग

अष्टांगांनीं पाझरल्यें मी
व्योमींचे रस आले रोमीं
मातीमधुनी स्रवुनी साखर झाल्यें वेडी भावडि ग

गाय पाडसाविण पान्हेली
तशी भरूनहि मी तान्हेली
तुमच्या जलभरणाविण तृष्णा गोड असुनिही कोरडि ग

घाली रवि सोन्याचीं लेणीं
चंद्र विणी मोत्यांनीं वेणी
लावी उटणीं पवन तरीही न पुरे माझी आवडि ग

घेण्यांतिल सुख कळलें बाई !
देण्यांतिल : त्या मितीच नाहीं ! !
तुमच्या कलशांसंगें भरती माझ्या जीवन-कावडि ग

घट तुमचे ते रिघतां पोटीं
दुवा सुखें पुटपुटल्यें ओठीं
प्रीतीची गत अशीच उलटी आणिक बोली बोबडि ग

करूनी करुणा पुरवा तृष्णा
मिळवा तुमच्या उरिंच्या कृष्णा
कुब्जेपरि होईन उजू, जरि आठ ठिकाणीं वांकडि ग

युगायुगांची मी ग गोपी
पडल्यें सांपडल्यें या कूपीं
कुंजवनांतिल तृणातृणाशीं घाला माझी सांगडि ग

# मज लोभस हा इहलोक हवा

स्वर्ग नको सुरलोक नको मज लोभस हा इहलोक हवा
तृप्ति नको मज मुक्ति नको पण येथिल हर्ष नि शोक हवा

शोक हवा परि वाल्मिकिच्या परि सद्रव अन् सश्लोक हवा
हर्ष हवा परि स्पर्शमण्यापरि त्यांत नवा आलोक हवा

शंतनुचा मज मोह हवा अन् ययातिचा मज देह हवा
पार्थाचा परि स्नेहविकंपित सार्थ सदा संदेह हवा

इंद्राचा मज भोग हवा अन् चंद्राचा हृद्रोग हवा
योग असो रतिभोग असो अतिजागृत त्यांत प्रयोग हवा

आयु हवें आरोग्य हवें यशभाग्य तसा प्रासाद हवा
श्लाघ्य हवें वैराग्य तयास्तव त्यांत विरोध विषाद हवा

तापासह अनुताप हवा मज पापासह अभिशाप हवा
शिळांत पिचतां जळांतुनी मज निळा निळा उःशाप हवा

मार्क्साचा मज अर्थ हवा अन् फ्रॉइडाचा मज काम हवा
या असुरां परि राबविण्या घरिं गांधींचा मज राम हवा

लोभ हवा मज गाधिजमुनिचा अखंड आंतर क्षोभ हवा
पराभवांतहि अदम्य उज्ज्वल प्रतिभेचा प्रक्षोभ हवा

पार्थिव्यांतच वास हवा परि दिव्याचा हव्यास हवा
शास्त्रांचा अभ्यास हवा परि मानव्याचा ध्यास हवा

विश्व हवें सर्वस्व हवें अन् मृत्यु समोर सयंत्र हवा
शरांत परि ही विव्हळतां तनु उरांत अमृतमंत्र हवा

हविर्भुक् सुरमुख मी वैश्वानर नित्य नवा मज ग्रास हवा
हें सुख दुर्लभ वाढविण्या मज चौऱ्यांशींत प्रवास हवा

# माझें घर

तूस स्वतंत्र गोऱ्यांत केव्हां तरी केव्हां तरी
फेसाळल्या लाटांपाशीं सिंधुसरितेच्या तीरीं
बांधीन मी छोटेंसेंच लाल चिरेबंदी घर
गार विलायती वेल चढवीन भिंतीवर

मागें विहीर कांठाची वर प्राजक्ताचें खोड
गर्द हिरवें न्हाणीशीं नीरफणसाचें झाड
केळबनाच्या कडेला स्वच्छ छोटासाच गोठा
त्यांत सवत्स कपिला, ओल्या चाऱ्याचा नि सांठा

फूलपाखरांच्यासाठीं पुढें फुलझाडें चार
आंबा एकादा कलमी यात्री म्हणूनियां खार
गारव्याच्यासाठीं कांहीं गार नाजूक पोफळी
नागमोडी त्यांच्यावर पानवेली मिरवेली

वर पश्चिमेला गच्ची अभ्यासिका पूर्वेकडे
शेजारच्या माडावर पाहीन मी सोनसडे
कानीं समुद्राची गाज पुढें ग्रंथ स्वर्णाक्षरी
पारव्यांची कुजबुज खिडकीच्या गजांवरी

असा पहाटेला घेत हुक्क्या-चहाची लज्जत
लिहीन मी भावगीतें तेथें घुमत घुमत
आणि येतां थोडा शीण बसूनियां गच्चीवर
रेखाटीन भोवतींचें चित्र एखादें सुंदर :

जाळीं फेकणारे कोळी त्यांच्या मासळीच्या होड्या
खपणारे वावराडी त्यांच्या विसाव्याच्या विड्या
कधीं काजळता कूस कधीं उजळ घुमट
बांगड्यांशीं खेळणारा कधीं ओलेतीचा घट...

आणि मग सेवीन मी जाईजुईचा गे भात
पोईतल्या मासळीचा स्वाद घेत साथ साथ
वेताचिया खाटेवर थोडा बागेंत दुपारीं
झोपेन मी घोळवीत तुझी अमली सुपारी

आणि सूर्यास्तास माझा रंगी घेऊन शिकारा
तुझ्या संगें जाईन मी इंद्रचंद्रांच्या माहेरा
कुणी भविष्याचा कवि आम्हां ऐकवील गाणीं
ऐकेन तीं समाधानें डोळां घेऊनियां पाणी

थंडीवाऱ्यांत पश्मिनी शाल स्कंधीं घालशील
कांठीं उद्यांचा तो कवि प्रेमें मला सांभाळील
घरीं येतांच नातरें नाचतील आनंदानें
म्हणतील, " सांगा गोष्ट किंवा म्हणा नवें गाणें. "

रचूनियां सांगेन मी त्यांना गाण्यांतच कथा
जेणें जाणवेल त्यांना उद्यां दुसऱ्याची व्यथा
मग रेलून गच्चींत टक लावीन आकाशीं
दाट काळोखांतही मी चिंब भिजेन प्रकाशीं

असें माझें गोड घर केव्हां तरी, केव्हां तरी
अक्षरांच्या वाटेनेंच उतरेल भुईवरी

# श्या मा

तूं शरत्कथेंतिल अमललोचना श्यामा
प्राजक्तमानसा मृदुगंधा अभिरामा
अष्टादश फुलवित पुलकीं प्रणयपुराणें
या आलिस माझ्या वयस्क आश्रमधामा

तूं आलिस पेलित अंगीं वेल विजेची
अधरावर झेलित अमृतकोर बिजेची
घन कुटिल कुंतलीं गुंतवुनी स्मरसेना
पापण्यांतुनी अन् सिंचित धुंद निजेची

श्रमलीस इथें कधिं दक्ष होउनी शिष्या
छेडिलेंस कधिं मज ताणुनि कृष्णधनुष्या
वटतळीं कधीं तर कधीं जळाच्या कांठीं
गाउनी मांडलिस माझी सत्त्वपरीक्षा

दो प्रहरीं आली घडी तुझी जायाची
वाटलें परतली थंड झुळुक वाऱ्याची
वाजली शिटी अन् मी वदलों कांहींसें
तों डोळ्यांतुनि तव झडली सर मोत्यांची

( कर फिरवित शिरिं तव म्हटलें मीं तुज 'वेडी'
तों कळींत फुलली तुझ्या फुलाची गोडी
किति वेळ लोचनांसमोर उरले रूळ
पावलांत पडली त्यांहुनिही जड बेडी )

त्या क्षणें आजपरि तरारले कडुनिंब
या सांकळल्या जळिं थरथरलें विधुबिंब
भिंतीवर श्यामल लसलसल्या दलवेली
अन् हिरवळ झाली दवांत ओलीचिंब

सुटलेलें वेड माझें कुणी मला द्या हो
संसार हा आहे तसा राहो किंवा जावो

वेडानें त्या कणिकोंडा झाला तेव्हां गोड
चांदण्याच्या खव्यालाही काढितों मी खोड

काळोखीं वेंचिल्या तेव्हां नक्षत्रांच्या वेली
आतां विजेंतही डोळां सांचते काजळी

मातींत सोन्याचा तेव्हां उगवला चांफा
आतां सोन्यांतही काळनाग टाकी वाफा

तृणाफुलांतही तेव्हां देखिले मीं देव
देवांतही आतां मला दिसती दानव

हांकेस धांवला तेव्हां गोविंदाचा पावा
आतां गातांहि तो न ये, करीतांही धावा

लोक बोलतात जरी झाला हा शहाणा
स्मरतां तें वेड परि टिकेना बहाणा

जाणीव शाणीव सारी सारें कांहीं न्या हो
मात्र माझें वेड गोड परतुनी द्या हो

# भिजले घुंगुर

भिजले घुंगुर तसें वाजलें कांहीं तरि अंधारीं
आंसवांतले ध्वनि निजलेले नाचत आले दारीं

नव्हतें कळलें आजवरी किति सुखांत होतों दुःखी
तसेंच कळलें अवचित मजला किति सुख असतें शोकीं

ज्योतिमधें जी असते छाया तिच्याविणें नच ज्योती
हृदय असो कीं असो शिंपला व्यथेविणें नच मोती

काळ्या काळ्या जळांतुनी त्या तसे उजळले मोती
रितेपणाच्या घटीं मनाच्या तशा उमलल्या ज्योती

त्या ज्योतींचे, त्या मोत्यांचे घुंगुर घुमले दारीं
नयनीं मोतीं हृदयीं ज्योती थरथरल्या अंधारीं

## डाळिंबीची डहाळिशी

डाळिंबीची डहाळीशी नको वाऱ्यासवें झुलूं
सदाफुलीच्या थाटांत नको सांजवेळीं फुलूं

मऊ शुभ्र जांभापरी नको गुलालांत रसूं
सोनकेतकीशी नको कुशी उसवीत हसूं

बोलतांना लाटेपरी नको मोतियांनीं फुटूं
सावल्यांच्या पावलांनीं नको चांदण्यांत भेटूं

नको चांफ्याच्या श्वासांनीं संगें चालतां लगटूं
गर्द झाडींत विजेचें नको लाघव प्रगटूं

नको घुसळूं पाण्यांत खडीसाखरेचे पाय
नको गोठवूं ओठांत दाट अमृताची साय

नको वितळते डोळे लावूं एकांताच्या पारीं
उसासून धपापून नको होऊं गोरीमोरी

नको सावरून पुसूं जुन्या कवितांचें मूळ
नको उकरून काढूं पुन्हा सोन्याचे ते सूळ

नको फळत्या वयांत घेऊं संयमाचें माप
वर दिलास, तयाचा नको करूं अभिशाप

# काळी माया

काळे काळे केश तुझे काळे काळे डोळे
काळा काळा मेघ तुझ्या माथ्यावरी डोले

काळीं काळीं ढोरें तुझीं काळया डोहाकडे
जेथें काळया जांभळांचे जागोजाग सडे

काळींतुन वाट तुझी काजळल्या वेळे
काळया काळ्या सावल्यांचें सभोवतीं जाळें

अशा धुंद काळेपणीं तीट हवी गालीं
काळी चंद्रकळा, काळया किनारिची चोळी

काळी काळी पोत हवी कंठिं तुझ्या पोरी
सावांसही सुचे अशा काळोखांत चोरी

काळया काळ्या वाघळांची घेरी इथें माया
काळया काळ्या वासनांची घोंगावते छाया

ये ग घरीं, काळा तुझा साज तिथें सारा
काळ्या घडींत या अशा हो ग उरीं तारा

## शा र दे चा भु त्या

प्राणरागिणी सरली, उरला केवळ शब्दतराणा
भाव दिवाणा सरे, उरे, परि स्वभाव मात्र पुराणा

अन्न असुनिही उपास काढुन जागविलें तुज माते !
मींच कोरडे ओढित मजवर तुझें जोडिलें नातें

भुत्या तुझा होऊन लाविला तेल-कांकडा अंगा
तृष्णा पेटविली ज्वाळांनीं असून पोटीं गंगा

तुझिया छंदें स्फुंदस्फुंदुनी धरिला धुंद धुमारा
शिरीं ठेविला धुनींतला तव जळजळता अंगारा

आलिस अंगीं श्रीजगदंबे थयथय घालित गात्रीं
दावित नेत्रां सूर्यसंभवा रुद्रमंगला रात्री

करांतले कोळसे तेधवां झाले दीप्त निखारे
वठल्या खोडां शिवतां फुटले कोमल कोंभ धुमारे

आणि बरळलों त्याची झाली मंतरणारी वाणी
कौल जयांना दिला तयांच्या घरांत भरलें पाणी

भुत्या तुझा हा रिता आज परि जागवितो देव्हारा
विझून गेलों तरी अजूनहि गणिती जन अंगारा

उभेंच जळलें झाड परंतू अजून जळते श्रद्धा
प्राण चितेंतहि पंख पाखडित झोंबतसे नि:शब्दा

प्राणरागिणी सरे, उरे परि केवळ शब्दतराणा
हाहि पुजेचा प्रकार मानुन प्रसाद दे या प्राणा

# झाडें झालीं निळीं निळीं

झाडें झालीं निळीं निळीं करांगुळीं गोवर्धन
धुंद आकाशच झालें मंद असमानी पर्जन्य

जागोजाग पांगुळलें काळें कालिंदीचें पाणी
अंधाराच्या कालियाचे त्यांत चमकले मणी

गंधपिसाऱ्यांचे मोर वारे थबकले सेकीं
आर्त केकावली त्यांची थप्प झाली एकाएकीं

घरें कांवळीं ओढून टक लाविती मुकाट
ओलावले उजेडानें त्यांच्या पापण्यांचे कांठ

युगें पिकून वाकलीं जग जांभळांचें बन
धरित्रीच्या आठवणी उसवल्या कुशींतून

कानीं माझ्या वाजे वेणू प्राण घुमे रुणूझुणू
उरीं कालियाचे डोल गात्रीं हंबरती धेनू

शांताचिया वृष्टीमधें अशी अद्‌भुताची सृष्टी
कां या लावण्यांतही मी असा सुखानेंहि कष्टी ?

# हिमाद्रीहुनी भव्य नक्षत्रमौली

हिमाद्रीहुनी भव्य नक्षत्रमौली तुझी मूर्ति वाढून स्वर्गा भिडे
तडे पाडुनी मत्त इंद्रासनाला द्युती धावते सर्व बद्धांकडे

तुझी तृप्त-कारुण्य-विक्रांतमुद्रा गमे क्षोभल्या नारसिंहापरी
विदारूनियां स्तंभ कारागृहाचे कडाडे तडित्खड्गशी वैखरी

महागर्जनेनें तुझ्या राष्ट्रसिंहा ऋषींची चिरंजीव मंत्रावली
तृणीं शुष्क काष्ठीं तशी भग्न वृक्षीं वदूं लागली अग्निजिव्हादलीं

असें दंडकारण्य पेटून त्याच्या हिमाद्री-समुद्रान्त झाल्या शिखा
अरी वक्र जे नक्रसे सागरींचे तयांची ढळूं लागली पिंडिका

महामुक्तिचा शंख फुंकूनि जीवें शर्वी प्रेरिल्या वीरअक्षौहिणी
नवें मोल आणावया जीवनाला स्वयें सिद्ध केल्यास आत्मार्पणीं

अगा कर्मयोगेश्वरा ! मोक्षद्रष्ट्या ! अगा निर्भया ! जन्ममृत्युंजया !
भयांतून काढून राष्ट्राप्रती या जयारूढ आत्मस्थ केलें तया

तुला गुह्य सांगून गीताभवानी गमे त्वच्चरित्रांत आली गुणा
जिथें ठेविला हस्त वा पाद तूं गा तिथें दीपिका, स्वस्तिकांच्या खुणा

प्रवक्ताच तूं आमुच्या प्राक्तनाचा तुझा शब्द तो आज झाला शक
तुला बाहुनी राष्ट्र जें थोर झालें तुझ्या गौरवीं वाकवी मस्तक

महत्ता तुझी लोकितां लोकमान्या ! सदा चित्त नक्षत्रलोकीं जडो
झडो अल्पता लोचनांची, मनाची, जिण्याची गती ऊर्ध्वमार्गीं चढो

असा कांहिं आशीष द्या या घडीला महत्कारणीं प्राण हा पाखडो
महा राष्ट्रिं जन्मास आल्याप्रमाणें महादिव्य हातून कांहीं घडो !

# ज्ञानदेव गेले तेव्हां

ज्ञानदेव गेले तेव्हां कोसळली भिंत
वेद झाले रानभरी गोंधळले संत

ज्ञानदेव गेले तेव्हां आटे इंद्रायणी
मराठीच्या वडातळीं जळूं लागे पाणी

ज्ञानदेव गेले तेव्हां ढळला निवृत्ति
आसवांच्या डोहीं झाली विझू विझू ज्योती

ज्ञानदेव गेले तेव्हां तडा विटे गेला
बापरखुमादेवीवरु कटींत वाकला

ज्ञानदेव गेले तेव्हां बापुडला नामा
लागोपाठ भांवडें तीं गेलीं निजधामा

माझ्या ज्ञानराजा ! तें रे कळों आलें आज
भर दुपारीं ही तशी झाली तीनसांज

तेव्हांच्यासारखा पुन्हा बावला मोगरा
भुईभर झाल्या कळ्या तुटला आसरा

इथें आळंदींत आतां ऊर मात्र फाटे
पंढरीच्या वाटेंतही बाभळीचे कांटे

कळ्यांचाहि वास जिवा जाहलासे फांस
एकाकी प्रवास आतां उदास उदास

## का म द्रु मा ची ड हा ळी

कामद्रुमाची डहाळी आज एकाएकीं न्हाली
झोपावला माझा रावा झेपावला अंतराळीं

याच डहाळीखालतीं झालें उन्हाचें चांदणें
आणि छायेनें प्रकाशा तिढे घातले उखाणे

उष्टीं घोळवितां बोरें रामा उमगली सीता
भोळ्या मिठींत राधेच्या कृष्णा गवसली गीता

सुजातेची खीर येथें झाली मुक्तीहून गोड
बोधिसत्त्वाची फळली पूर्वसुकृतांची जोड

माग्दालीनेच्या पूजेनें ख्रिस्त येथें झाला होता
सुळीं जाण्याच्या पूर्वींच सुखें मरूनियां जिता

क्रौंच पक्ष्याच्या रक्तानें हीच डहाळी भिजली
फळ हिचेंच चाखून ईन्द्र आपाद लाजली

घामा-रक्ता-आसवांचें हिच्या मुळा झालें आळें
आज अचानक तिला फळ अलुवार आलें

रावा आकाश पिऊन आला, निळा निळा झाला
फळ चाखतां चाखतां स्निग्ध प्रकाशांत न्हाला

" रती असून मी सती " बोले हेलावत फांदी
माझ्या शुकाच्या मुखांत नवी ओलावते नांदी

## हृदयच जेव्हां होतें कोकिळ

हृदयच जेव्हां होतें कोकिळ
 जरठ वनांतहि फुले वसंत
हृदयच होतें भजन जेधवां
 तृणांतही भेटे भगवंत

हृदयच जेव्हां घनीं बहरतें
 जिणें वाहतें बनुनी मोर
हृदयच जेव्हां भरुनि वाहतें
 गंगेहुनि तें होतें थोर

आज अचानक असें जहालें
 सांजहि भासे मला सकाळ
प्राजक्ताच्या आसवांत सखि
 सर्व मौक्तिकें आणि प्रवाळ

सर सोन्याची होउन आलिस
 गाढ कालची झाली ओढ
आज लाभल्यामुळें हृदय तव
 विषहि कालचें झालें गोड

## आता नाहीं जवळ नि दूर

आतां नाहीं जवळ नि दूर
सगळीकडुन दिशांना पूर
गगन वितळलें
भुवन निवळलें
मिळून गेले सुरांत सूर
आतां नाहीं जवळ नि दूर

उरे न आतां खेद नि खंत
खळांतही हसतो भगवंत
प्रकाशलाटा
उधळित वाटा
रचिती एकच पंथ अनंत
उरे न आतां खेद नि खंत

आतां सरलें भलें नि गैर
क्षणीं युगांचें गळलें वैर
मैत्र ओघळे
प्राण मोकळे
उधळिति गंध अनावर स्वैर
आतां सरलें भलें नि गैर

आतां आनंदहि अवधूत
तृप्तीलाही ओला ऊत
आतां शांति
किसलय-कांति
ऋतूवांचुनी नवप्रसूत
आतां आनंदहि अवधूत

स्वराशिवायच आतां गीत
मिठीशिवायच मीठी प्रीत
एकीं दोन्ही
मिटले मौनीं
नवसृजनाची उलटी रीत
स्वरांशिवायच आतां गीत

आतां मी माझ्यांतच चूर
तरि तुमच्यांतच वाहे ऊर
स्वरांत तुमच्या
माझी वाचा
जरी भासलों मुका नि दूर
आतां नाहीं जवळ नि दूर

# झालें हवेचेंच दहीं

झालें हवेचेंच दहीं माती लोण्याहून मऊ
पाणी होऊनियां दूध लागे चहूंकडे धावूं

आज जगाचें गोकुळ आज यमुना पांढरी
आणि कालियाच्या उरीं घुमे कृष्णाची बांसरी

स्वैर चुकूनियां वाट खुळ्या हुंबरती दिशा
भोंवळून धारानृत्यीं वेळा झाल्या वेड्यापिशा

आज समुद्राच्या पोटीं वाजे प्रसवाचा शंख
पालवती तुटलेले पुन्हा पर्वतांचे पंख

लक्ष आंचळांनीं दुभे निळी आकाशाची गाय
थिजणाऱ्या तृप्तीवरी दाटे संतोषाची साय

झुरुमुरु झुरुमुरु धारा लागती या झरूं
हरपलें होतें तें तें पाहे हळूच अंकुरूं

# प्रार्थना

प्रार्थना तीच
जी कवितेसारखी
अचल असून स्पंदशील
शब्दाच्या स्थावर शिल्पांत
बद्ध न झालेली
ती उगवते झाडासारखी
प्राणाचें बीज मेंदीत
चढत रहाते
हिरवीगार अग्निशिखा होऊन
सतत सहज
असीम ऊर्ध्वाचा शोध घेत
ती प्राणांत उमलूं लागतांच
माणसाचाच होतो
अवधूत अश्वत्थ
त्याच्या पायांना मुळ्या फुटतात
आणि शोधूं लागतात
संचिताचें अवाक् आंधळें रसातळ
ज्याच्या दाहक रसामुळेंच
त्याची पालवी झडूं लागते
मौनाचा जप करीत
निष्फळतेच्या उपासनेंत
तो होतो आपादमस्तक
संपूर्ण सफळ
अंगांतून ढाळीत
प्रकाशाचे स्रोत
अशा शिशिरांत न्हाल्यानंतरच

वसंताचा स्पर्श होतो
प्रार्थनाच प्रसाद होऊन
तेवूं लागते ज्योतीसारखी
पण काजळीशिवाय
सावलीशिवाय

## वाढत्या सांजवेळे

वाढत्या सांजवेळे नये ग पाण्या जाऊं
भरल्या कळशीला वेढिती शनि-राहू

ढळते कांसवशी पायींची जड शिळा
बुजून पंचप्राण कंठांत होती गोळा

पाण्यानें भिजे कटी घामानें भिजे चोळी
भाळींचें ओलें कुंकूं भिऊन आसूं गाळी

पेरीत गंध वेडे चेटूक करी वारा
अंगांत यक्ष कोणी छेडितो लक्ष तारा

पुरिलें तुळशींत होतें ग स्वप्न जागें
वैरीण पायवाट ओढिते पाय मागें

काळोखीं चपापून काढिते फणा शंका
स्वप्नींचा राजपुत्र वारीत येतो पंखा

पाण्यानें होते आग पंख्यानें होते लाही
नाहीं ग कधीं होत जीव हा उतराई

फुटतो बाई घडा संसारा जातो तडा
ओखटी वेळ मोठी छंद हा सोड वेडा

# सुखा नाहीं चव

सुखा नाहीं चव
लव वठलेली आहे
दुःखा नाहीं भार
धार बोथटली आहे

ओसरला गंध
वारा पडलेला आहे
झाड बंद आतां
पाला झडलेला आहे

हवेमध्यें कुंद
छंद गोठलेला आहे
पावसाचा थेंब
वाटे आंत चाट पाहे

# फांद्यामधुनी चंद्र दिसावा

फांद्यांमधुनी चंद्र दिसावा
मुळ्यांतुनी घुसळावें पाणी
सावल्यांतुनी अन् वाऱ्यानें
शिंपित जावें अत्तरदाणी

पाषाणाला स्वप्न पडावें
खुळी कळ्यांना यावी डुलकी
पदर ढळावा तुझा जरासा
झुळुक लागुनी हलकीफुलकी

तुला तयाचें भान नसावें
सांगत असतां होउनि कष्टी
त्या तेव्हांच्या धुंदपणांतिल
माझ्या मूर्खपणाच्या गोष्टी

तुझ्या व्यथेनें होतां व्याकुळ
'तिळा' अचानक उघडा व्हावा
जवळ अशी तूं असतांनाही
तसाच पुन्हा विसर घडावा

हलवुनि मज तू चिडुनि म्हणावें
"जन्माचेच तुम्ही बैरागी!"
मींही घ्यावी चूक सुधारुन
होउनि व्यवहारी अनुरागी

फांद्यांमधला चंद्र तेधवां
पानांमागें जरा दडावा
डोळ्यांमधला थेंब तुझ्या अन्
माझ्या खांद्यावरी पडावा

## दीस कसा तरी जातो

दीस कसा तरी जातो मन उन्हांत पांगून
पण काजळतां दिशा भितें जातें बावरून

नोहे रातीचें हें भय; गूढ माझ्याच वातीचें
तेल-खायऱ्या आंधळया मूढ आधार-मातीचें

माती तापून तापेना, वात पेटून पेटेना
ऐन वेळीं विरजती कांठीं जीवघेण्या वेणा

'शुभं करोति' म्हटली तरी घडेना अद्भुत
शापें मातीच्या का होतें असें ज्योतीचेंहि भूत ?

# क्षितिजीं आलें भरतें ग

क्षितिजीं आलें भरतें ग
घनांत कुंकुम खिरतें ग
झालें अंबर
झुलतें झुंबर
हवेंत अत्तर तरतें ग

लाजण झाली धरती ग
साजण कांठावरती ग
उन्हांत पान
मनांत गान
ओलावुन थरथरतें ग

नातें अपुलें न्हातें ग
होउनि ऋतुरस गातें ग
तृणांत मोतीं
जळांत ज्योती
लावित आलें परतें ग

# चित्रवीणा

निळया जळावर कमान काळी
कुठें दुधावर आलीं शेतें
थंडाव्याचीं कारंजींशीं
कुठें गर्द बांबूचीं बेटें

जिकडेतिकडे गवत बागडे
कुठें भिंतिच्या चढे कडेवर
ती म्हातारी थरथर कांपे
सुखासवें होउनी अनावर

तारांमधला पतंग कोठें
झुलून गेला गगनमंडलां
फणा डोलवित झोंबूं पाहे
अस्तरवीच्या कवचकुंडला

उंचवट्यावर म्हशी गोठल्या
तसेच कोठें कातळ काळे
वर्ख तृप्तिचा पानोपानीं
बघून झाले ओले ओले

कोठें तुटल्या लाल कड्यावर
चपळ धीट बकरीचीं पोरें
एक त्यांतलें लुचे आइला
सटीन-कांती गोरें गोरें

फूलपांखरी फूलथव्यावर
कुठें सांडलीं कुंकुम-टिंबें
आरसपानी पाण्यावरतीं
तरल्या बगळ्यांचीं प्रतिबिंबें

कुठें आवळीवरी कावळा
मावळतीचा शकून सांगे
पूर्वेला राउळ इंद्राचें
कोरिव संगमरवरीं रंगे

घाटामध्यें शिरली गाडी
अन् रात्रीचा पडला पडदा
पण चित्रांची विचित्र वीणा
अजून करिते दिडदा दिडदा

# मंद असावें जरा चांदणें

मंद असावें जरा चांदणें कुंद असावी हवा जराशी
गर्द कुंतलीं तुझ्या खुलाव्या शुभ्र फुलांच्या धुंद मिराशी

दूर घुमावा तमांत पांवा, जवळच व्याकुळ व्हावें पाणी
तूंहि कथावीं रुसुन अकारण सासू-नणदांचीं गाऱ्हाणीं

सांगावें तूं दुःख आगळें माझ्यासाठीं गिळिलें कैसें
आणि आंधळ्या भलेपणीं मीं तुला केधवां छळिलें कैसें

उदासतां अन् सुखांत, कोठें कौलारावर धूर दिसावा
असें निसटतें बघून कांहीं विषाद व्हावा जिवा विसावा

मंद असावें जरा चांदणें कुंद असावी हवा जराशी
करुणाभरल्या मुकाटपणिं अन् तुला धरावें जरा उराशीं

## सरिंवर सरी आल्या ग

सरिंवर सरी आल्या ग
सचैल गोपी न्हाल्या ग
गोपी झाल्या भिजून चिंब
थरथर कांपति निंब-कदंब
घनांमनांतुन टाळ-मृदंग
तनूंत वाजवि चाळ अनंग
पानें पिटिती टाळ्या ग
सरिंवर सरी आल्या ग

मल्हाराची जळांत धून
वीज नाचते अधुनमधून
वनांत गेला मोर भिजून
गोपी खिळल्या पदीं थिजून
घुमतो पांवा सांग कुठून ?
कृष्ण कसा उमटे न अजून ?
वेली ऋतुमति झाल्या ग
सरिंवर सरी आल्या ग

हंबर अंबर वारा ग
गोपि दुधाच्या धारा ग
दुधांत गोकुळ जाय बुडून
अजून आहे कृष्ण दडून
मी-तूं-पण सारें विसरून
आपणही जाऊं मिसळून
सरींवर सरी आल्या ग
दुधांत न्हाणुनि धाल्या ग
सरिंवर सरी : सरिंवर सरी...

# ती एक याद

सळसळ लाटा क्षाळिति काठा, वाळूवरही फेनतुरे
साद नसो पडसाद नसो : ती एक याद पण आज पुरे

अशीच होती धुंद वेळ ती गंधकोवळी सांद्र हवा
गडाजवळच्या वडाआडुनी होता उगवत चंद्र नवा
पुढें विचंचळ होतें पाणी, अंचळही तव जवळ तसा
उरिंचा वाळा उसवत आला वासंतिक स्मरमोहरसा
छंदतराणा घुमला पोटीं, ओठीं अमृत तटतटलें
निकट ओढुनी जरा तुला मी गीत लाडकें म्हण म्हटलें
ग्रंथ लावुनी उभय उरोजां सभय बाजुला सरलिस तूं
रुसलिस अन् पण चिडतां मी गे त्या वळणावर अडलिस तूं
बघत भोवतीं भेदरल्यागत कधीं मजकडे कधीं नभीं
अवचित ओठीं टिपुन घेतलिस धुक्यांतली मम पुसट छबी
धुकेंच झालें भवतींभवतीं : त्यांत चांदणें विरघळलें
ग्रंथासह कधिं मावळलिस तूं अजून तें मज नच कळलें

आजहि तरतें क्षण-अत्तर तें चंद्रबिंबही जळिं उतरे
साद नसो पडसाद नसो : ती एक याद पण आज पुरे

# कळत जातें तसें

कळत जातें तसें कशीं जवळचींही होतात दूर ?
जुने शब्द सुने होऊन वाजतात कसे बद्द निसूर ?
कळत जातें तसें कसें ऊन पाण्यांत खिरून जातें ?
वाकुड-सावल्यांत वाट चुकून चांदणें कसें झुरून जातें ?
कळत जातें तसें कशा मूर्ती साऱ्या झिजून जातात ?
पापण्यांमधलें स्नेह थिजून ज्योती कशा विझून जातात ?
कळत जातें तसें कशीं झाडें-पांखरें जीव लावतात ?
शब्द सारे मिटून कसे तळ्यांमधेच पेंगू लागतात ?
कळत जातें तसें कशा दूरच्या घंटा ऐकूं येतात ?
दूरचे रंग, दूरचे गंध प्राण कसा वेधून घेतात ?
कळत जातें तसें कां रे एकटा एकटा होतो जीव ?
रागरोष सरून कशी आपलीच आपणां येते कींव ?

# पर्जन्याचीं पिसें सांडलीं

पर्जन्याचीं पिसें सांडलीं
पिसावलेल्या उन्हांत
तुझें नि माझें लग्न लागलें
विसावलेल्या मनांत
क्षणांत झुलल्या मंगलाक्षता
पाना-सुमना-तृणांत
रत्नांच्या गहिवरांत न कळे
कोण हरवलें कुणांत

# इंद्रदिनांचा असर सरेना

इंद्रदिनांचा असर सरेना
विसरूं म्हणतां विसरेना
चंद्रमंदिर जरि सरल्या घडि त्या
स्वप्नांची लय उतरेना

त्या पहिल्या कापूर-दुपारीं
झाडें झालीं उजवाती
सुरवातीची वाट चालतां
घडल्या अंतिम रुजवाती
फुलपंखांचीं निळीं पिसोळीं
भिडलीं माझ्या अधराला
फडफडुनी क्षण मुकाट जडलीं
तुझ्या हिऱ्याच्या पदराला
करांत कर गुंतला; अबोली
थरथरली पण विखरेना
क्षण ठरला तो व्रण हृदयीं पण
रंगांची लय उतरेना
विसरूं म्हणतां विसरेना

तरुशिखरें अन् घुमट उजळतां
सांध्य सनइच्या प्रहराला
कोळिष्टकही कनकजळानें
भिजुनी येतां बहराला
अभिरगुलालबुक्याच्या घडिला
झडतां सर मम कवनाची
शर रुतल्यागत सय आली तुज
सासरच्या जलभरणाची

कचचंपक गेलीस फेकुनी
दळ त्याचें पण उघडेना
दवांत भिजतें जरी अहर्निश
गंधाची लय उतरेना
विसरूं म्हणतां विसरेना

व्यथा-कथा बोललों किती गऽ
चांदण्यांतल्या अपरात्रीं
पूल फुलांचा झुला होइतों
बघत एकटक जळपात्रीं
होउन खंती वदलिस अंतीं :
" नकळत आंतुन ढळलें मी
सावरुं दे मज, दूर हो कसा
ऋण फेडिन पुढल्या जन्मीं."
जखम गाळितो म्लान चंद्रमा
क्षितिजावरुनी निसरेना
थारोळें जरि उरीं दाटलें
रुधिराची लय उतरेना
विसरूं म्हणतां विसरेना

# फांदीसारखी झुकते सांज

फांदीसारखी झुकते सांज, जांभळांसारखे पिकती ढग
हवेंत गारवा जड होऊन पेंगुळपांगुळ होतें जग
गगनभरल्या आठवणींचे गर्द झाडींत शिरती थवे
ओला काळोख आळत येतो उकल्याझाकल्या काजव्यांसवें
अशा वेळीं दूरचा दिवा जवळ येतो पाण्यावरून
वारा तारा छेडीत घुमतो उदास उदास सूर भरून
डोळ्यांमधें जमतें पाणी : कशासाठीं कळत नाहीं
ऊरभरल्या उसाशाला कुठेंच वाट मिळत नाहीं

# चालले हे उंट कोठें ?

चालले हे उंट कोठें तप्त रेताडांतुनी ?
स्वार झाल्या प्रेपितांना कोण हाकी कोठुनी ?
कां निघाले टाकुनी हे बायकापोरें, घरें
ना जरी वाटेंत कोठें पान, पाणी, पांखरें ?

पाणियाला पाठमोरी कोणती यांची तृपा ?
आणि डोळे बांधणारी कोणती यांची दिशा ?

# शिशासारखी भरली

शिशासारखी भरली मळभट
मृत्यूची चाहूल सुरूंना
अवचित हबकुनि थबके वारा
वाळूंतुन पाऊल सुटेना

घळीघळींतुन अडेआदळे
उजेड वेडा दिसांधळासा
मुकी जखम झाल्या हृदयाचा
तटून आहे एक उसासा

जिथल्या तेथें पंख मिटुनियां
निमूट सारीं घरेंपाखरें
राख माखुनी पडून आहे
लूतलागलें सुणें विचारें

त्रिशूळसा अन् कुणी कावळा
अवकाशाला कापित येतो
जातां जातां या जखमेचा
झटकन् लचका तोडुन नेतो

# विसर

मन वाहत्या पाण्याचें : पालापाचोळा ठरेना
थोर घावाचीहि रेघ चार पळेंहि टिकेना
दुःख वितळे उन्हांत, सुख भिजे चांदण्यांत
प्रेम गारवा होऊन दरवळे वागण्यांत
उरीं भेटल्याची कोठें तळीं साखर पाझरे
जातों तेथें भोवतालीं मळा मातून मोहरे

येते उदासता कधीं ओल्या काळोखासारखी
मध्यरात्रीं तिची पण फुले नक्षत्रपालखी

## आसवें

उन्हासारखा हर्ष माझा असावा
घरांतून बाहेर यावीं मुलें
नभासारखा शोक माझा असावा
तृणांतून देखील यावीं फुलें

जळासारखी तृप्ति माझी असावी
स्त्रियांनीं कडेचे भरावे घडे
स्वरासारखी धुंद माझी असावी
फुलावे भविष्यांतले केवडे

भुईसारखी प्रीति माझी असावी
खणी त्याजलाही फुटावे झरे
निशेसारखी शांति माझी असावी
कुशीला विसाव्यास यावीं घरें

तरीही नसावें असोनी जगीं या
निरालंब छांदिष्ट वाऱ्यापरी
कळावें न कोणा कसा पार झालों
भुलावून लोकांस पाऱ्यापरी

# हळद लावुनी आलें ऊन

हळद लावुनी आलें ऊन, कुंकुमाक्षता फुलांमधून
झाडांमधुनी झडे चौघडा, घुमतें पाणी लागुन धून
नाचुन मिटली श्रावणधार, शीतळ पाऱ्यापरिस दुपार
निळोंतुनी हिरव्यांत भुरळलीं पिवळीं सोनपिसोळीं चार
उभार साळी भरून दूध, हवेंत सजणी कापुरऊद
शेरवडाच्या ढवळ्या पानीं उधळे ऋतुचें लक्ष बिरूद
लावण्याचा लागुन बाण तृप्तीलाही फुटे तहान
मला खोवुं दे तुझ्या कुंतलीं एकच यांतिल पान लहान

## स्मरते कधी

स्मरते कधीं भरली नदी अन् गर्द झाडी काठची
पावसाळी चांदणें अन् साउली घनदाटशी
हिरवे दिवेसे काजवे, मरवा हवेचा तीक्ष्णसा
दूर कोण्या पाखराचा सूर जखमी क्षीणसा
तो धुरानें फासलेला झोपड्यांचा पुंजका
गोठलेलें तें धुकें—छे, कोंडलेला हुंदका

# तूं गेल्यावर

तूं गेल्यावर फिके चांदणें, घरपरसूंही सुनें-सुकें
मुलें मांजरापरी मुकीं अन् दर दोघांच्या मधें धुकें

तूं गेल्यावर घरांतदेखिल पाउल माझें अडखळतें
आणि आटुनी हवा भवतिची श्वासास्तव मन तडफडतें

तूं गेल्यावर या वाटेनें चिमणीदेखिल नच फिरके
कसें अचानक झालें नकळे सगळें जग परकें परकें

तूं गेल्यावर झडून पनगत लागे पिंपळ हाय गळूं
गळ्यांतलें मम झुरतें गाणें : वाटे मरतें हळूहळू

तूं गेल्यावर दो दिवसांस्तव जर ही माझी अशी स्थिती
खरीच माझ्याआधीं गेलिस तर मग माझी कशी गती ?

## जळणाऱ्या जळत रहा

जळणाऱ्या जळत रहा : जळतों सारेच अम्ही
जळण्याच्या लाख तऱ्हा : राख मात्र जास्त-कमी

जळणाऱ्या जळत रहा : ज्वालांचें भाग्य तुझें
ज्वालेविण जळती जे त्यांचें सर्वस्व खुजें

सौख्य खुजें, दुःख खुजें, धूरच मागें नि पुढें
वांझोट्या जळण्यानें घ्यावें तें वळण तिढें

ज्वालांच्या पंखांनीं गगनाला भिडत रहा
प्राणाच्या दीप्तींतुन क्षितिजाचें स्वप्न पहा

असल्या या जळण्यानें जळ घनांत साकळतें
गवसलें न जें युगांत तें पळांत आकळतें

# आंदणवेळ

चांदणकाळीं आंदणवेळ
दल दल फुलते रंजनवेल
आनंदाला फुटून फांद्या
निळें पाखरू घेतें झेल

चांदणकाळीं सलतें सूख
धूप कसें दरवळतें दुःख
चंद्रमणीसा शब्द निथळुनी
डुले घेउनी छंद अचूक

चांदणकाळीं झुलतो पूल
थडगेंदेखिल बनतें फूल
शिळेशिळेवर स्वप्नकळेचें
रत्नोपम उमटें पाऊल

चांदणकाळीं आंदणवेळ
जग सगळें टिपऱ्यांचा खेळ
सृष्टीवरती करिते वृष्टी
स्वरपुष्पांची अमृतवेल

## कृतार्थ

आल्हाद-उत्साहाच्या धबधब्याची
कर्पूरगौर देवताच अशी तूं
रजतस्मिताचा चुरा उधळीत
स्वागतार्थ सामोरी आलीस दारांत
पुढें करीत जिवणीवरचें
डाळिंबीचें लालचुटूक टवटवीत फूल
मिरवीत अंगांत पिसावलेल्या
हिरव्यापिवळ्या पिसोळ्यांचा
रेषोत्कर्षक उन्हेरी झगा
आणि रुळवीत उभार उरोजांच्या मधोमध
उभट नाजूक झिगझिगणारा
कांचन-क्रूस

घेऊन गेलीस उल्हासानें
खानदान ऐश्वर्याच्या दिवाणखान्यांत
उधळीत नितळ उघड्या अंगांगांतून
तरतरीत आठ मुलांचें संतृप्त बाळसें
शरदांतल्या द्वादशीच्या चांदण्यासारखें
बसवून मला झुलत्या आरामखुर्चीत
विराजलीस पुढच्या नक्षीदार शिसवी स्टुलावर
व्हिन्सीच्या चित्रांतील नायिकेसारखी
भोवती घेऊन आपल्या वात्सल्याचा प्रफुल्ल पिसारा
ज्याच्यावर तुझेच आगळे कोवळे तोंडवळे
वेगवेगळ्या वयांतले

तुझे डोळे लागले होते माझ्यावर
सोनकिनारी चंद्रकोर-भिंगांतून
फुललेल्या शृंगारशाखेवर स्थिर वलेल्या
निळ्या पाखरांच्या युगुलासारखे :
अशीच बसली असेल का माग्दालेना
स्निग्ध, सोत्कंठ, ख्रिस्ताच्या शेजारीं ?
परीसारख्या मुलीकरवीं
भरलीस काचेची गुलछडी
फेसाळ गव्हाळ्या मदिरेनें
मनांत आलें, ही शेलाटी पोर घ्यावी सून करून
पण म्हणालों, "ही तर इतक्यांत नवरी झाली."
तेव्हा तूंच बोललीस "घेणार ना सून करून?"

दाखवलेस घरांतले आल्बम
विणीत एकेका चित्रावर
स्मृतींची शुभ्र सुकुमार झालर
पाद्री दीराला सांगूं लागलीस
कॉलेजांतल्या एकेक गोष्टी
तीस वर्षांपूर्वीच्या, नुकत्याच घडल्य'सारख्या
ज्या मी केव्हांच विसरलों होतों :
माझ्या ख्रिस्तचित्राला मिळालेल्या बक्षिसाच्या
प्रोफेसरांना दिलेल्या चमकदार उत्तरांच्या
वर्गांतल्या वर्गांत रचलेल्या कवितांच्या
रेखाटलेल्या चित्रांच्या, मी लावलेल्या लोभाच्या

आणि पाश्चात्त्य संगीताच्या तासाला
मजकडून घडलेल्या गफलतींच्या
जुन्या आठवणींच्या त्या गर्द काळोख्या अरण्यांत
अकस्मात उघडलें सुरम्य सोज्ज्वळ ऊन

जादूच्या पंख्यासारखें
आणि मावळलेलें तारुण्य
एकदम बहरून आलें
माघांतली दुपार होऊन
म्हणालीस, " तेव्हासारखे गा पुन्हा एकदां
वर्षं तुम्हाला शिवलीं नाहींत. "
असा गायलों ऊर भरून
की गळा स्त्रवला अमृत होऊन...
होतीस तशीच आहेस अजून
व्हर्जिन मेरी, पण सुखदुःखांची तड ओलांडलेली

कृतार्थ अशी पाहून तुला
काटाकाटा फुलला आहे
वाळवंटांतून हिंडला जीव
शहाळें पीत बसला आहे
डाळिंबीचें फूल होऊन
उन्हांत आता झुलतों आहें
हिरव्या-पिवळया पिसोळयांचा
थवा तेवढा बघतों आहें

वळून बघतां मागें आतां घडलें तेंच पसंत
व्याप वाढती परंतु त्यांतच असे उदंड उसंत

पहाटशी ही वाटे संध्या, निर्मळ उजळ दिगंत
करुणाघन होऊन वोळती सगळे खेद नि खंत

दवांत भिजुनी दगडहि आतां हरित तृणें श्रीमंत
आता कोणी उरे न परकें भेटे तें गुणवंत

शिशिरांतहि या स्पर्शुनि जातो कधिं अशरीर वसंत
आणि शहारुनि बोलूं बघतो हृदयांतिल रसवंत

बोलावेंसें वाटे तें तें बोलुन गेले संत
अमृतसिंधू किति उपसावा आणि कोठपर्यंत ?

कांटयांतुनि चाललों तिथें हा उमले कुसुमित पंथ
असेंच लिहितो मोडीमधुनी बालबोध भगवंत

टी पा

## कवी कोण ?

'कवी कोण' हे शोधायचा प्रयत्न 'आपण कोण' हे शोधण्यासाठी अनेक कवींनी केला आहे. कविता म्हणजे आकाशीची वीज, असे केशवसुतांनी एका पत्रात म्हटले होते. ही वीज धरण्याच्या प्रयत्नात माणसे होरपळतात, जळतातही. हे होरपळणे, जळणे दृष्टिआड राहते आणि आपल्याला फक्त काव्याचे दर्शन घडते. पण जळणाऱ्या माणसाला आपण कशासाठी जळतो आहोत हा प्रश्न केव्हातरी स्वतःला विचारावासा वाटतो. जळणे सुसह्य होईल असे काही उत्तरही त्याला शोधावे लागते. ही उत्तरे खरी असतात की नाही हा वादाचा प्रश्न होऊ शकेल. पण कवीच्या आत्मरक्षणाला ती आवश्यक असतात, यात मात्र शंका नाही. आणि—

देवाचे संदेश उकलोनी दावी
विश्वास सुखवी आत्मज्ञानी

यात तशी अत्युक्तीही नाही. कारण सृष्टीतील घटनेचा उलगडा ज्ञानविज्ञानाला करता येईल, पण तिच्या व्यवहारातून झिरपणारे सौंदर्याचे व भावबंधनांचे संदेश शोधणे हे काव्याचेच काम आहे.

## सांजवेळ

समुद्रकाठावर अवतरलेल्या एका संध्येचे हे सुरम्य आणि सहज वर्णन. 'भव्य नौकातले दीप'—या दृश्याने तोपर्यंतच्या सर्वसाधारण वर्णनाला एक वैशिष्ट्य दिले आहे. गोव्याला समुद्राची सर्वत्र जवळीक आहे. या समुद्राचे स्वर बोरकरांच्या काव्यात अनेकदा सहजतेने विणले जातात. त्यांच्या कविमनावरील सागराच्या वर्चस्वाचा प्रारंभिक प्रत्यय या कवितेत पाहावयास मिळतो.

## तेथे कर माझे जुळती

कवीच्या नावाशी निगडित झालेली ही एक सुप्रसिद्ध कविता. बहुतेक प्रथितयश कवींनी आपल्या उदयकालामध्ये अशा इतिहास घडविणाऱ्या कविता लिहिल्या आहेत. उदयोन्मुखतेच्या धुकाळ क्षेत्रातून अशी कविता कवीला एकदम बाहेर आणते, त्याला सामान्यातून असामान्याच्या पातळीवर नेते, थोड्यांच्या प्रोत्साहनाऐवजी बहुसंख्यांतील प्रतिष्ठा त्याला मिळवून देते. या 'ऐतिहासिक' कविता कवींच्या सर्वश्रेष्ठ कविता

असतातच असे नाही. उलटपक्षी, अशा कविता व्यापक आवाहनक्षेत्र संपादन करतात म्हणून त्या कमी प्रतीच्या असतात, हा कित्येकांचा अभिप्रायही असमंजसपणाचाच समजायला हवा. रसिकांना एक अभिनव प्रत्यय देणाऱ्या या कवितांत कवीच्या अनेक सामर्थ्यांचा प्रत्ययकारी मिलाफ झालेला असतो. कवीची सर्वात लोकप्रिय म्हणून त्याची ती सर्वात चांगली कविता असतेच असे नाही हे जितके खरे, तितकेच हेही खरे की, कवीच्या श्रेष्ठ काव्यगुणांचा अशा कवितेत आविर्भाव होत असल्यामुळेच तिला रसिकतेचे व्यापक व चिरस्थायी अधिष्ठान प्राप्त होते. शब्दाचा शोध घेणाऱ्या माणसाच्या मूलभूत भावना अशा कवितेत उत्तम रीतीने शब्दांकित झालेल्या असतात.

'तेथे कर माझे जुळती' ही बोरकरांनी प्रारंभीच्या काळात लिहिलेली कविता त्यांच्या व्यक्तित्वाची एक आधारवृत्ती सुंदर शैलीत प्रगट करणारी आहे. बोरकर हे सौंदर्याचे उपासक आहेत, चराचर सृष्टीतील सुंदरावर त्यांची वारकरी स्वरूपाची निष्ठा आहे हे खरे; पण त्यांच्या सुंदराच्या कक्षेत शिवाचाही समावेश होतो. करुणा, समर्पण, साधुत्व इत्यादि गुणविशेषांनी प्रकाशित झालेले गांधीजींसारख्यांचे जीवन त्यांना शिव-सुंदराच्या एकरूपतेचाच एक आविष्कार वाटतो. शिवातील सुंदराचा शोध हा बोरकरांच्या काव्याचा एक स्थायी विशेष आहे. या शोधाला या कवितेत एक मनोहर शब्द-रूप मिळाले आहे.

ही कविता म्हणजे संस्कृतीला आधारभूत असलेल्या माणसाच्या दिव्यत्वाला केलेला एक भावपूर्ण नमस्कार आहे. हे दिव्यत्व लहानशा घरकुलात व्यक्त होते आणि कोठल्या तरी जीवनमूल्याच्या रक्षणासाठी समाजात धगधगणाऱ्या यज्ञकुंडातही. मुलाबाळांसाठी स्वतःचा जीव जाळणारे कुटुंबशील, आपल्या त्यागमय वात्सल्याने घराला सतत सावलीत ठेवणाऱ्या स्त्रिया, जगाच्या जमाखर्चात ज्यांच्या परिश्रमांची नोंद होत नाही असे श्रमिक, ध्येयासाठी प्राणाहुती देणारे अज्ञात हुतात्मे हे सर्व या दिव्यत्वाचे प्रतिनिधी, मानवी व्यवहारातील शिवमंगलाचे राखणदार. कवितेची अखेर व्यक्तिगत स्वरावर होत असली तरी एकूण कविता त्या मर्यादेत राहात नाही. तिच्यातील व्यक्तिगत अनुभूती सर्वसाधारण मानवी जाणिवेच्या विशाल पातळीवर जाते आणि कवीने दिव्यत्वाला केलेले अभिवादन हे सर्व मानवजातीने केलेले अभिवादन होते.

यज्ञी ज्यांनी देउनी निजशिर
घडिले मानवतेचे मंदिर
परि ज्यांच्या दहनभूमिवर
नाहि चिरा, नाही पणती, तेथे माझे कर जुळती

या सहजसुंदर ओळींनी या कवितेला एक अक्षयतेचे सामर्थ्य दिले आहे.

## मुशाफिरा

बोरकरांच्या तरल प्रतिभेचा प्रत्यय आणून देणारी ही कविता ' जीवनसंगीत- ' मध्ये प्रसिद्ध झाली होती. ' तेथे कर 'प्रमाणे ही कविताही कवीला नवीनातून प्रस्थापितांत आणण्यास कारणीभूत झाली. बोरकरांच्या काव्याचा एक वेगळा आणि अधिक प्रभावी असा स्वभावविशेष या कवितेत अत्यंत हृदयंगम रीतीने व्यक्त झाला आहे.

हा विशेष म्हणजे काव्याला प्रेरक होणाऱ्या अनुभूतीत एकजीव झालेली निसर्गाची जाणीव. निसर्ग हा बोरकरांच्या बाबतीत केवळ दृश्याच्या पातळीवर राहात नाही. तो त्यांच्या अंतःकरणात शिरतो आणि तेथील अन्य अनुभवांशी स्वतःला एकरूप करून घेतो. ' मुशाफिरा 'तील सुंदर चित्रांची माळ काव्यानुभवापासून वेगळी पडत नाही किंवा रंगमंचावरील पडद्याप्रमाणे त्याला पार्श्वभूमी पुरवीत नाही. ती मुशाफिराच्या सफरीचा एक अविभाज्य भाग झाली आहे.

हा ' मुशाफिर ' म्हणजे कोणाचा तरी प्रियकर असलेला कोणी एक प्रवासी. या मुशाफिराची आकृती एखाद्या स्वप्नासारखी धूसर आहे आणि त्यातील एकही रेषा ठळकपणाने चितारलेली नाही. कवितेचे अवीट सौंदर्य या धूसरतेतच आहे. रूपरेषा नसल्यामुळेच या प्रवाशाची प्रतिमा मर्यादारहित झाली आहे. त्याचे एकाकीपण केवळ कवितेत नव्हे तर कवितेच्या बाहेरही धुक्यासारखे आहे असे वाटते.

## दूधसागरास

गोव्यात उतरणाऱ्या सह्याद्रीच्या घाटामध्ये ' दूधसागर ' हा प्रसिद्ध धबधबा आहे. पहाडावरून खळाळणाऱ्या, फेसाळणाऱ्या त्याच्या पांढऱ्या शुभ्र पाण्याचा कल्लोळ पाहून ' दूधसागर ' हासत आहे, असे कवीला वाटते, किंबहुना एका विशाल, सनातन आणि कारणहीन हास्याच्या रूपानेच तो कवीच्या अंतःकरणात शिरलेला आहे. या हास्याच्याभोवती अनेक सुंदर कल्पना कवीने उभ्या केल्या आहेत. या कल्पनांतून,

> प्रभुहि अकारण हसला
> नी त्रिलोक रसरसला
> विश्व तदिय हास्याचा मोकळा निळा झरा

या भव्य कल्पनाचित्रापर्यंत आपण जाऊन पोचतो. कवितेचा स्वाभाविक ओघ येथेच संपल्यासारखा वाटतो.

कविता एका निसर्गदृश्यावर असली तरी त्याचे छायाचित्रात्मक वर्णन ती आपल्याला देत आहे. चिरंतन हास्याच्या रूपाने ' दूधसागर ' कवीला जाणवला आहे. ती जाणीवच काव्यात प्रगट होते.

## जलद भरुनि आले

सर्व चराचर सृष्टी वर्षाकाळातील पहिल्या मेघांची प्रतीक्षा करीत आहे. ' चपलचरण ' वारे वाहू लागले आणि गडद निळ्या जांभळ्या ढगांचा जथा क्षितिजा-वर दिसू लागला आहे. हे ढग बरसू लागण्यापर्यंतच्या रोमहर्षक प्रतीक्षेचे चित्र या कवितेत पाहावयास मिळते. कवितेचा प्रारंभ सहजतेने व सुंदर झालेला आहे. पण पुढे ती सांकेतिकतेत शिरल्यासारखी वाटते.

## ते कर मन्मातेचे

स्वरसुंदर कवितेप्रमाणे वाटणारे हे हात म्हणजे ' आई ' च्या जागी असलेल्या एका वत्सल स्त्रीचे हात होत. ' तिच्यात मातृत्वाचे जे विशेष गुण मला दिसले त्यांचे छंदगायन गाणारे हे सूक्त. तिच्यासारखे वत्सल आणि सेवाभावी हात, मग ते कुठेही असोत, परमार्थाने ते तिचेच, हाही भाव या कवितेत आहे '-बोरकर. कवींनी दिलेली ही टीप लक्षात घेतल्यावर ' आधारचि तो निराश्रितांना '-या काव्याचा भावार्थ लक्षात येऊ शकेल.

## उर्वशीच तू जाया

प्रेयसीच्या सहवासात अनुभवलेल्या एका संध्येचे सौंदर्य वर्णन करून कवी म्हणतो =

ज्योतिर्मयता अपुल्या प्राणा
काया या जणु छाया

संध्येच्या सोनेरी सौंदर्याचा चहूकडून शिडकाव होत असताना शरीराच्या पलीकडे असलेली जीवनाची जाणीव उत्कट झाली आणि बाहुपाशात घेतलेली प्रेयसी ही जवळ असूनही ' उर्वशी ' प्रमाणे दूर व अप्राप्य आहे असे वाटू लागते. उर्वशी नावाची अप्सरा पुरूरव्याला सोडून गेली होती, हा पौराणिक संदर्भ येथे गृहीत आहे. संध्येचे प्रारंभिक वर्णन सुंदर असले तरी त्याचा दोन मनांवर होणारा परिणाम हाच कविते-तील महत्त्वाचा भाग आहे.

## सुर्मेवाला

कवी आपल्या काव्याच्या द्वारा प्रेमाचा आनंद जगामध्ये पसरवीत असतो. संसाराच्या आधीव्याधीमध्ये जे रुतलेले आहेत त्यांची दृष्टी मलूल आणि गढूळ होते. जीवनातील निर्व्याज आनंदाचे व सौंदर्याचे दर्शन घ्यायला ती असमर्थ ठरते. अलौकिक, निर्मळ प्रेमाचा 'सुर्मा' या दृष्टीला मिळाला तर ती माणसाला सुखाच्या मार्गावर नेऊ शकते.

## बांगड्या

आषाढातील वादळी पाऊसझडीनंतर श्रावणात धरणी फुलायला लागते. नद्या, झरे निर्मळ पाण्याने दुथडी भरून जातात, ऊन-पावसाचे सोनेरी खेळ सुरू होतात आणि सृष्टी हिरव्यागर्द आल्हादाने ओथंबून जाते. निसर्गातील या महोत्सवात भाग घेण्यासाठीच श्रावणात अनेक सणांची योजना माणसाने केली आहे. या श्रावणाचे कविमनाला सदैव आकर्षण वाटावे यात नवल नाही. बालकवींप्रमाणे बोरकरही निसर्गाच्या सुंदरतेत रमणारे, त्याची उपासना करणारे कवी आहेत. श्रावणावरील बालकवींची कविता प्रसिद्ध आहे. श्रावणकालातले सर्व वातावरण त्या कवितेत चित्रित केले आहे. या कवितेत बोरकरांनी श्रावणाला वेगळ्या रूपात पाहिले आहे. सरळ रेषे-पेक्षा गोल रेषा ही अधिक सौंदर्यपूर्ण असते. ('त्याच्या पाठीमागे तुझे आसन असते, गोलरेषांच्या विस्मयकारक रहस्यांनी विणलेले, सगळ्या भकास सरळ रेषांचा त्याग करणारे'—टागोर) श्रावणाच्या लावण्यात या गोलरेषांची कंकणे कवीला चहूकडे दिसतात., जमिनीवर, पाण्यात आणि आकाशातही. हिरव्या, जांभळ्या, सोनेरी अशा विविध रंगांच्या चमकदार बांगड्यांचे हे भांडारच श्रावणाने उघडले आहे. म्हणून कवी आवाहन करतो :

ये कन्ये ये दुहिते
अपरिणिते, ललितलते
ये कांते, ये दुहिते
सुभग साज न्याया

लावण्यराज श्रावणाचे कवीला जाणवलेले हे वेगळे रूप आकर्षक आहे यात शंका नाही.

## माझी बेगम

प्रेयसीच्या अनपेक्षित दर्शनाने हृदयात बेहोषी दाटावी आणि त्या मादक

आनंदरसाचे मोहक शब्दांच्या स्फटिककणांत रूपांतर व्हावे असे या कवितेचे स्वरूप आहे.

प्रारंभीच्या ' वेगम ' या शब्दानेच प्रेयसीभोवती अद्भुताची एक प्रभावळ निर्माण होते. पुढील सर्व कवितेतून शराब, मोगली, रंगमहाल, खंजरि, वाळ्याचे अत्तर इत्यादि शब्दांनी व प्रतिमानी ह्या प्रभावळीत गहिरे रंग कवीने भरली आहेत. बोरकरांच्या असाधारण शब्दलालित्याचा या छोट्या कवितेत आपल्याला प्रत्यय येतो आणि हे लालित्य अनुभवाच्या बाहेरही स्वैरपणाने जात नाही.

## स्मृती

गतकाळातील एका मधुर भावपूर्ण प्रणयप्रसंगाचे हे एक उत्कट आणि जिवाला कासाविसी देणारे चित्रण. सुरुवातीचे चांदण्यारात्रीचे वर्णन आणि पुढील भागातील भावचित्र ही दोन्हीही प्रत्ययकारी आहेत. ' पाठमोरी पौर्णिमा 'प्रमाणे ही कविताही गझल वृत्तात लिहिली आहे.

## दुखणाइत दिवा

एका क्षीण, दुबळ्या, प्रकाशापेक्षा काजळीच अधिक पसरविणाऱ्या दिव्याच्या संगतीत आपण एका लहानशा खोपटात प्रवेश करतो. दरिद्री आणि व्यसनापायी उद्ध्वस्त झालेल्या संसाराचे सारे अमंगल विशेष तेथे आपल्या दृष्टीला पडतात. जुन्या चिरगुटांवरून आणि उपाशीपोटी झोपलेल्या मुलांवरून हा उजेड आपल्याला नेतो एका स्त्रीकडे- चुलीजवळ ताठरलेल्या निर्विकार नजरेने बसलेल्या घरधनिणीकडे. त्या दुखणेकरी दिव्याप्रमाणे ते सगळे घरच व्याधीने व वेदनेने गांजलेले आहे हे आपल्या लक्षात येते. सारेच चित्र फार परिणामकारक आहे, थोड्या ठसठशीत रेषांनी काढलेल्या रेखा-चित्रासारखे. शेवटचा ' मुशाफिर ' मात्र खटकतो. त्यामुळे या दृश्यातील खाजगीपणा नाहीसा होऊन त्याला सार्वजनिक स्वरूप आल्यासारखे वाटते. रस्त्यावरच्या घटनेत मुशाफिराची भागीदारी आपण समजू शकतो. अशा ठिकाणी नाही.

## माझा छंद

या छंदाने मुकले घर जरि<br>रत लोकत्रय पाहुणचारी...

सौंदर्याची उपासना स्वीकारल्यावर सभोवारच्या सर्व व्यवहारांतील सुंदरता, स्नेह आणि तेज यांचे दर्शन होऊ लागते. अमंगलातील मंगलाचा स्वर ऐकू येतो, स्वप्नाप्रमाणे शस्त्रालाही धार मिळते आणि प्रेमावर उभारलेल्या नव्या जीवनाचा

साक्षात्कार घडतो. या उपासनेमुळे जवळचे दूर झाले तरी दूरवर असलेले सर्व जग जवळचे होते आणि मोठमोठ्यांनाही न लाभणारे प्रेम त्या उपासकास लाभते. तर्काच्या द्वारा ज्याचे आकलन होत नाही त्याचे आकलन काव्याच्या म्हणजे सौंदर्याच्या द्वारा होते.

## जपानी रमलाची रात्र

जीवनातील श्रेष्ठ मूल्यांची ' भक्ती ' करताना बोरकरांची कविवृत्ती ' गोसावीपण ' पत्करते, त्याप्रमाणे त्यातील रसरंगाचा अनुभव घेतानाही ती बेहोष होते. अशा भोक्त्याच्या मनःस्थितीत सुंदर अनुभवाचा प्रत्येक घटक मोराप्रमाणे पिसारा फुलवूनच त्यांच्यासमोर उभा राहातो आणि त्या अनुभवाच्या लौकिकाला एक अलौकिक रूप प्राप्त करवून देतो. मंगेश पाडगावकरांनी म्हटल्याप्रमाणे, ' त्यांच्या कवितेने शरीर नाकारलेले नाही; धुंद, रंगेल, विलक्षण सुंदर होऊन ते त्यांच्या प्रेमकवितांतून प्रगट होते. ' अशा धुंद, मादक प्रणयानुभवाचे या कवितेतील चित्रण ' कानशिलांच्या तारा झणाणून टाकणारे ' आहे. कामना ही मूलतः सुंदर असते आणि एरव्ही धूसर वाटणाऱ्या तिच्या अभ्रातून सात रंगांचे एक गंधर्वस्वप्न कवीची प्रतिभा येथे उभी करू शकते.

' रमल ' हा शब्द, मनावर मोहिनी टाकणारा एक जादूटोण्याचा प्रकार, या अर्थाने येथे वापरलेला आहे. जपानी ' कार्निव्हल- ' ( विलासोत्सव ) सारखा हा प्रसंग आहे.

## साद

ही एक देवाची प्रार्थना आहे. तिच्यात देवाकडे सुखांचे मागणे केले नसून दुःखांचे मागणे केले आहे. आदर्शांच्या मार्गावरून आपले पाय बाजूला गेले तर त्या अपराधांचे शासन आपल्याला मिळायला हवे अशी कवीची भावना आहे. या संदर्भात आपल्याकडून होऊ शकणाऱ्या विविध अपराधांचा कवीने येथे निर्देश केला आहे. ' कलेनुनी घसरता ' आणि ' विश्वनाट्यविकासनी तुझ्या या ' ही दोन कडवी विशेष लक्षात घेण्यासारखी आहेत.

## भिडली रात्र पहाटे

' उरी उगवला आत्मसुधाकर ' या नव्याने येणाऱ्या अनुभवाभोवती या कवितेची उभारणी आहे.

' रसलंपट मी तरि मज अवचित गोसावीपण भेटे '–गोसावीपणाचा म्हणजे

भोगाच्या पलीकडे जाणाऱ्या सर्वात्म भावनेचा आनंद अपार आहे. भोगाची रात्र या नवीन साक्षात्काराला भिडली आहे. हा आनंद समर्पक शब्दांत व वृत्तात बांधला गेला आहे.

## सायंप्रार्थना

रोज सायंकाळी सामुदायिक प्रार्थना करणे हा म. गांधींच्या जीवनातील एक महत्त्वाचा कार्यक्रम होता. विशेषतः गांधींच्या उत्तर आयुष्यात या प्रार्थनेला असाधारण महत्त्व प्राप्त झाले होते. विविध धर्मीय प्रार्थना या कार्यक्रमात व्हायच्या आणि गांधीजींचे एक छोटे भाषणही व्हायचे. ही भाषणे म्हणजे प्रवचने नसत तर हृद्गते असत. गांधीजींची सारी महात्मता या सायंप्रार्थनेच्या वेळी त्यांच्या शब्दांतून व व्यक्तित्वातून प्रगट होत असे. अशा प्रसंगी गांधीजींचे दर्शन घेणाऱ्या कवीच्या प्रतिभा-दृष्टीला त्यांच्या मस्तकामागे तेजाची प्रभावळ दिसावी आणि भक्तिभावनेने त्याचे अंतःकरण लीन व्हावे हे अपरिहार्य होते. त्या भारावलेल्या मनःस्थितीचे उत्कट चित्र या कवितेत आपल्याला पाहावयास मिळते.

कवितेच्या पहिल्या तीन कडव्यांत गांधींच्या दर्शनाची अपेक्षा व शेवटच्या तीन कडव्यांत या दर्शनाचा मनावर झालेला परिणाम कवीने वर्णन केला आहे. या दोहोंच्या मध्ये असलेल्या 'ती मूर्ति साजिरी ..' या एका कडव्यात गांधीजींच्या प्रत्यक्ष दर्शनाचा अनुभव कवीने मोजक्या पण रेखीव शब्दात व्यक्त केला आहे. अभावितपणे आलेले या रचनेतील नाट्य मनोवेधक आहे.

ज्या रस्त्याने गांधीजी गेले त्या रस्त्याला पाय लावण्याचे धैर्य कवीला होत नाही. हा रस्ता होण्याचे भाग्य आपल्या जीवनास लाभावे असे त्याला वाटते आणि हा अनुभव त्या क्षणापुरता मर्यादित राहिला नाही. पुढील आयुष्यातही त्या प्रसंगांचा कवीला मोठा आधार वाटतो. लोकांचे पदाघात जेव्हा त्याच्या हृदयावर होतात तेव्हा त्या 'दिव्य पदांची चाहूल' त्याला ते सहन करण्याची शक्ती देते. म. गांधी हा अनेकांना विचाराचा विषय असेल, पण बोरकरांसारख्या कवीला तो अनुभवाचा विषय होतो. या अनुभवाचे हे चित्रण मराठी कवितेत तरी दुर्मिळच असावे.

## गृहलक्ष्मीस

सुरुवातीला मधुर शब्दांच्या आवर्तात सापडलेली व त्यामुळे अंधुक झालेली ही कविता पुढे पुढे नितळ होत जाते आणि 'सुत-कन्यांनी अंगण भरले—' या चार ओळींत ती अंतःकरणाला स्पर्श करते.

'वात्सल्याने कृतार्थ केले सखि अपुल्या शृंगारा' ही ओळ तिच्या रेखीवपणामुळे लक्षात राहाण्यासारखी आहे.

## स्पर्श

दोन हृदयांच्या मीलनातील पहिल्या स्पर्शोत्सवाचा सोहळा, त्यातील सर्व वेहोषी आत्मसात करणाऱ्या शब्दांत या कवितेमध्ये वर्णन करण्यात आला आहे. पहिल्या दोन ओळींतूनच मीलनानंदाचा धुंद उद्रेक आपल्याला जाणवतो. ही तार त्याच स्वरात शेवटपर्यंत झंकारत राहाते.

## शांतीचा जयजयकार

कुसुमाग्रजांच्या 'क्रांतीचा जयजयकार' या कवितेच्या अनुरोधाने व एका परीने त्याच प्रश्नाची दुसरी बाजू मांडण्यासाठी ही कविता लिहिलेली असावी.

म. गांधींच्या तत्त्वज्ञानावर कवीचा दृढ विश्वास आहे हे लक्षात घेतले तर या काव्यामागची भूमिका सहज लक्षात येईल. माणसांना सुरेप्रमाणे समरांगणही चढते. दुसऱ्या महायुद्धात माणसांच्या कत्तली झाल्या, अगणित मालमत्ता नष्ट झाली, संस्कृतीचे बांधकाम हादरले व खचलेही. अशा रक्ताळलेल्या काळात गांधींचा एकाकी आवाज शांततेचा, परस्परसमजुतीचा आणि विशाल प्रेमाचा मंत्र उच्चारीत होता. त्या मंत्राचा काव्यमय जयघोष या कवितेत ऐकायला मिळतो.

पहाटेच्या वेळी आकाशात संचार करणाऱ्या द्विजांना म्हणजे पक्ष्यांना उद्देशून कविता लिहिली आहे. कवितेचे लेखन १९४६ मध्ये म्हणजे भारतीय स्वातंत्र्याचा उदय होत असताना झालेले आहे. तेव्हा हे द्विज म्हणजे त्या येऊ घातलेल्या स्वातंत्र्याचे शाहीर आणि त्या आंदोलनात भाग घेणारे सैनिक असे मानावयास हरकत नाही. महायुद्धातील रक्तपाताची व परसत्तेच्या अत्याचारांची रात्र संपली आहे, क्षितिजावर स्वातंत्र्यसूर्याचे पहिले किरण प्रकाशत आहेत, नवे युग आकारत आहे अशा प्रसंगी अंतःकरणातले विष निपटून काढायला हवे, शांततेची उपनिषदे गायला हवीत. भारताची मुक्ती म्हणजे जगन्मुक्तीचा प्रारंभ आहे. म्हणून या मुक्तीला शांततेचे, सर्वसंगोपनाचे अधिष्ठान मिळायला हवे अशी कवीची श्रद्धा आहे.

## जीवन त्यांना कळले हो

संतांनी सांगितलेले मानवी जीवनाचे तत्त्वज्ञान अतिशय सुंदर शब्दांत आणि समर्पक कल्पनांच्या आश्रयाने या कवितेत प्रगट करण्यात आले आहे. मीमांसक आणि

तत्त्ववेत्ते जीवनाचा अर्थ लावण्यासाठी ज्ञान-विज्ञानाचा आधार घेतात आणि कधीही न संपणाऱ्या शून्यशोधनात प्रवेश करतात. संत जीवनाची उगमस्थाने गृहीत धरतात–ईश्वर, नीती, धर्म यांसारखी–आणि मानवी व्यवहाराला न्यायाचे व करुणेचे अधिष्ठान घेऊन जीवनातील दुःख कमी करण्याचा प्रयत्न करतात. ही ज्यांची भूमिका आहे त्यांनाच खरोखर जीवन म्हणजे काय हे समजले आहे हा या कवितेचा भावार्थ. ज्यांचा अहंभाव नाहीसा झाला आहे, जे सेवारत आहेत, जे पुण्यशील व आत्मज्ञानी आहेत तेच जीवनाचा अर्थ जाणणारे व त्याला अर्थ देणारे. घटपटाच्या वादंगात गुंतलेली मीमांसा या जीवनार्थापासून नेहमीच दूर राहाते.

बोरकर जेव्हा स्वतःच्या जीवनश्रद्धांसंबंधी लिहितात तेव्हा त्यांची कविता नाद-सौंदर्याच्या मोहापासून दूर जाते व अधिक नितळ रूप धारण करते हे लक्षात घेण्या-सारखे आहे. आंतर्बाह्य सौंदर्यातील योग्य तोलामुळे या कवितेला तिच्या वर्गात एक अजोड स्थान मिळालेले आहे.

## अमृत खेचुनि आणू भूवर

समुद्रवीणा छेडीत जगावर प्रेमसुधा उधळणाऱ्या चंद्राला उद्देशून ही कविता लिहिली आहे. चांदणे आणि काव्य या दोघांचे कार्य व शील समान आहे. शक्तीच्या मस्तकावर मुकुट चढविण्याचे कार्य ती करीत असतात.

## रूमडाला सुम आले ग

रूमड म्हणजे औदुंबर वा उंबर. उंबराला फूल येणे म्हणजे एखादी अशक्य-प्राय गोष्ट घडणे. प्रेयसीच्या सान्निध्यात शारीरिक मीलन न होताही मीलनाचा अपार आनंद मिळाला आणि ‘ मदनाच्या अस्थी प्रयागतीर्थी ’ पडल्या, ही ती असंभव वाट-णारी पण प्रत्यक्षात घडलेली घटना.

## साबरमतीच्या काठी

कवीच्या व्यक्तिगत जीवनातील हा एक नव्या जीवनाचे आश्वासन देणारा प्रसंग आहे. कवीला स्वप्नात दृष्टान्त झाला होता, तो खरा झाला आहे. आयुष्यातील एक नवा अध्याय सुरू होत आहे, कुटुंबीयांशी झालेली ताटातूट आता संपत आहे, प्रतिकूल परिस्थितीचा किनारा दिसत आहे, आणि मुख्य म्हणजे ‘ महात्म्याच्या पावलांनी जेथे धुळीचा बुका ’ झाला आहे, अशा वातावरणाचा कवीच्या प्रतिभेला लाभ होत आहे.

या कवितेचा गोडवा तिच्या मोकळ्या स्वरात; भाविकतेत आणि 'बांध पदराला चार गोण्याचे तांदूळ' अशा काव्यात्म आचारप्रेमात आहे. म. गांधीं संबंधीची कवीची अपार श्रद्धाही येथे प्रगट झाली आहे.

## माझ्या मनाची 'माऊ' ली

संपूर्ण रूपकात्मक कविता बोरकरांनी फार कमी लिहिल्या आहेत. सामान्यतः छोट्या रूपकांच्या अथवा प्रतिमांच्या साखळीतून त्यांची कविता पुढे जाते. एखाद्या घटनेचे वा विचाराचे आकलन कोणत्या तरी विशाल रूपकचित्राच्या द्वारा होणे ही एक स्वाभाविक अशी कविप्रवृत्ती आहे. पण तपशिलातील साम्य प्रस्थापित करण्याच्या मोहाने कित्येकदा अशी कविता बाजूला खेचली जाते. 'माऊ'ली मध्ये असा प्रकार काही ठिकाणी झालेला दिसतो. 'माऊ' म्हणजे कवीची प्रतिभा अथवा काव्यशक्ती. मांजरीच्या जीवनातील विविध तपशिलातून आकारत जाणारे हे काव्य रंजक वाटते, पण प्रत्ययकारी वाटत नाही. मांजरीचे रूपकच मुळामध्ये काव्यविषयाला न्याय देण्यास असमर्थ आहे; शिवाय जादा तपशिलामुळे तो पिछाडीला हटल्यासारखा वाटतो.

## क्षितिजाकडे

कविता छोटीच आहे. पण तिच्यातील ख्रिस्ताचा आभास ठसठशीत आहे. ओलसर हिरव्या माळावर एकच झाड, जणू सभोवारचा अंधार आपल्यामध्ये साठवून बसलेले. अंतःकरणात कोठली तरी जखम असलेल्या कवीला त्या झाडाच्या बुंधावरती क्रूसावर चढलेल्या ख्रिस्ताचा भास होतो. त्याच्या वेदनेला एक निवारा सापडतो.

## माझी पूजा

'मी जीवनाचा भोक्ता आहे आणि भक्त आहे' असे बोरकरांनी एका प्रस्तावनेत म्हटले आहे. या दोन वृत्तींतून त्यांच्या काव्यात दोन महत्त्वाचे प्रवाह उत्पन्न झालेले दिसतात. तेथे कर माझे जुळती, साद, सायंप्रार्थना, माझी पूजा, यांसारख्या सामाजिक जाणिवा व्यक्त करणाऱ्या कविता स्थूल मानाने भक्तीच्या भूमिकेवरून लिहिलेल्या दिसतात, भोग आणि भक्ती यांचे प्रांत संपूर्णतः विलग असतातच असे नाही. भोग म्हणजे सर्वस्वाने घेतलेला अनुभव आणि भक्ती म्हणजे थोडे अंतर ठेवून एखाद्या दिव्यत्वाचे केलेले आकलन–असे मानले तर कोणतीही एक

अनुभूती भोग व भक्ती या दोहींचा विषय होऊ शकेल. ‘ तुतारी ’ वा ‘ नवा शिपाई ’ या कवितेत सामाजिक जाणीव ही केशवसुतांच्या भक्तीचा विषय नसून व्यापकार्थाने भोगाचाच विषय आहे. तुकारामासारख्या कवीत ईश्वर हा अनुभव-देखील भक्तीच्या प्रांतातून भोगाच्या प्रांतात प्रवेश करताना दिसतो. उलटपक्षी, गड-कऱ्यांच्या कित्येक प्रेमकाव्यांतून प्रेम हा भोगापेक्षा भक्तीचाच विषय अधिक आहे असे वाटते. तेव्हा बोरकरांच्या बाबतीतही दोन प्रवाहांसंबंधी वरती केलेले विधान परमार्थाने घेऊ नये. भोग-भक्तीतील ही अलगता त्यांच्या काही कवितांतून जाण-वण्याइतकी दिसते एवढाच त्याचा अर्थ.

‘ माझी पूजा ’ ही कविता कवीच्या मनातील एक व्यथा व्यक्त करणारी असली तरी पर्यायाने ती भक्तीच्या कक्षेतीलच आहे. ज्यांनी कोणत्या ना कोणत्या प्रकारचा त्याग करून मानवी जीवन अधिक उजळ व विकसित केले आहे. त्यांच्यासंबंधीची भक्तिभावना या व्यथेच्या पाठीमागे आहे. सभोवार चाललेल्या महापूजेत आपण घंटा झालो आहोत ही रम्य कल्पना या भावनेची निदर्शक आहे.

## असले हे फळ केवि तपाला

गांधीजींच्या आत्म्याला उद्देशून लिहिलेल्या या कवितेत प्रचलित परिस्थिती-संबंधीची खंत आणि चीड कवींनी व्यक्त केली आहे. महात्माजींनी सर्व जीवनाला नैतिक अधिष्ठान देण्याचा प्रयत्न केला. पण त्यांच्या मरणानंतर जीवनाच्या सर्व क्षेत्रांत भ्रष्टाचाराला, भोगलालसेला आणि अन्यायाला ऊत आला. अशा परिस्थितीत कवीला आपल्या श्रद्धास्थानाची तीव्रतेने आठवण होते आणि ‘ हृदयातील काजळी ’ झडावी म्हणून तो गांधींकडे उःशाप मागतो.

## वास्तवता मज न दिसे

‘ काचेमधोनी दिसते जनाला । धोंड्यामधुनीहि दिसे कवीला ॥ ’ हे केशवसुतांचे उद्‌गार प्रसिद्ध आहेत. वरवर दिसणाऱ्या वास्तवातून कवीची दृष्टी पलीकडे जाते आणि त्यातील ‘ प्राण ’ त्याच्या नजरेला पडतात. विविध वस्तूंचे आणि दृश्यांचे संदर्भ देऊन हा विचार कवीने प्रस्तुत कवितेत मांडला आहे. ‘ वस्तूचे प्राण ’ हा वाक्प्रयोग येथे शास्त्रीय अर्थाने घ्यायचा नाही. कोणत्या तरी वैशिष्ट्याने परिपूर्ण असलेली प्रत्येक वस्तू कवीला कोणती तरी सूचना देत असते. या सूचना कवीच्या व्यक्तित्वाशी संबंधित आणि म्हणून प्रत्येक कवीच्या बाबतीत वेगळ्या असतात. वस्तू

एकच असली तरी देखील कवीच्या मनःस्थितीनुसार ती वेगवेगळ्या भाववृत्ती त्याच्या मनात उत्पन्न करू शकेल. कवीची नजर कोणत्याही घटनेच्या मुखपृष्ठात गुंतून पडत नाही हा विचार येथे महत्त्वाचा.

दोन ओळींच्या प्रत्येक कडव्यात एकेक स्वतंत्र 'वास्तव व त्याचे प्राण' अशी कवितेची रचना आहे. शेवटच्या चार सहा ओळींत मात्र एकच विचार ओवला गेला आहे. तोपर्यंतच्या वास्तवतेपेक्षा एक वेगळ्या (अधिक वास्तविक) स्वरूपाची वास्तवता कवीला जाणवते आणि केवळ काल्पनिकाच्या कोशातून तो बाहेर येतो. त्यामुळे या ओळींत एक अलगपणा जाणवतो व तो अधिक प्रभावीही वाटतो.

## अजून थोडे सोस मना

आपण कविवर्य तांब्यांची गायकी पुढे चालवीत आहोत अशा आशयाचे उद्गार बोरकरांनी 'जीवनसंगीता'च्या प्रस्तावनेत काढले आहेत. तांब्यांच्या कवितेतील आंतर संगीत बोरकरांना सुरुवातीच्या काळात स्फूर्तिदायक झाले यात शंका नाही. प्रतिभा या प्रारंभिक संग्रहातील कवितेहून 'जीवनसंगीता'तील कवितेचे रूप खूपच वेगळे आणि विकसित आहे. 'जीवनसंगीता'त तिला स्वतःचा स्वर आणि स्वभावही सापडला आहे असे दिसते. यात तांब्यांच्या कवितेचे श्रेय असले तरी बोरकरांचे काव्य त्या गायकीच्या मर्यादेत राहिले नाही. त्याने स्वतःची एक वेगळी 'गायकी' निर्माण केली. परंतु तांब्यांच्या प्रभावाखाली काही कविता पुढील काळातही लिहिलेल्या आढळतात. त्यातील ही एक. रचना आणि आशय या दोन्ही दृष्टींनी ही कविता तांब्यांशी नाते सांगणारी आहे.

## माझ्या गोव्याच्या भूमीत

गोव्याची संस्कृती आणि गोव्याचे सौंदर्य या दोहोंचे जरतारी धागे बोरकरांच्या काव्यात सर्वत्र विणलेले आहेत. त्या गोव्यासंबंधीची ही वर्णनात्मक कविता ओवी छंदात आणि लोकगीताच्या धर्तीवर लिहिलेली आहे.

## हिरवळ आणिक पाणी

निसर्गाचे सौंदर्य हे बोरकरांच्या काव्याचे एक प्रमुख स्फूर्तिस्थान आहे; बालकवींप्रमाणे. परंतु बालकवींचा निसर्गसौंदर्याचा अनुभव हा बव्हंशी एक चित्रानुभव असतो. एखादे सुंदर दृश्य पाहिल्यावर विविध चित्रांची मालिका त्यांच्या मनात व

कवितेतही अवतीर्ण होते. निसर्गाच्या मूळ सुंदरतेपेक्षा या मनोनिर्मित चित्रदृश्यातच ते अनेकदा हरवून गेलेले दिसतात. बोरकरांनीही काही थोड्या कवितांत हे 'हरवलेपण' प्रगट केले आहे. एरव्ही सर्वसामान्यपणे त्यांच्या कवितेत निसर्ग व्यक्त होतो तो 'जिरवलेपणाने.' निसर्ग हा त्यांच्या सौंदर्यासक्तीपेक्षा स्वभावाचाच अधिक भाग झालेला दिसतो. म्हणून त्यांच्या बहुतेक सर्वच कवितांत निसर्गाची जाण ही हारातील कलाबुताप्रमाणे आतबाहेर चमकताना आढळते. निसर्गानुभव हा बोरकरांच्या काव्यात बहुधा भावानुभव होतो. या अनुभवाचे एक मनोहर चित्र या कवितेत पाहावयास मिळते. सृष्टीच्या सान्निध्यातील खेड्यातील मानवी जीवन इतके मांगल्यमय खरोखरच असते काय, हा प्रश्न येथे अप्रस्तुत आहे. कारण हे वास्तवाचे चित्रण नाही. निसर्गामधून कविमनावर झिरपणाऱ्या भावनांचे हे दर्शन आहे.

## मी नंदाघरिची बावडि ग

गोपींची कृष्णासंबंधीची गाणी पुष्कळांनी गायली आहेत. कोणी काही म्हटले तरी चंद्रसूर्यासारखा कृष्ण हा काव्याला आवाहन करणारा एक चिरंतन विषय आहे. या कवितेत नंदाच्या घरची विहीरच एक गोपी होऊन आपले मनोगत सहज सुंदर शब्दात व्यक्त करीत आहे. देण्याने संपन्न होणारी ही बावडी कृष्णासाठी तहानलेली आहे.

## मज लोभस हा इहलोक हवा

पृथ्वीवरील माणसांचा संसार हा मोहजन्य पापांनी भरलेला आहे म्हणून त्याचा धिक्कार करणारी तत्त्वज्ञाने सर्वत्रच निर्माण झाली आहेत. भारतात तर विशेषच. पण ऐहिकालाही आपली म्हणून एक कैफियत असते. ऐहिक जीवनातील ज्या कमतरता म्हणून मानल्या जातात त्यांच्याच दुसऱ्या टोकाला एक दिव्यत्वाची किनार असते. अशा अनेक गोष्टींचा उल्लेख या कवितेत आलेला आहे. काही 'हव्याशा' गोष्टी स्वतंत्रपणाने आलेल्या आहेत.

मार्क्साचा मज अर्थ हवा अन् फ्राइडचा मज काम हवा  
या असुरांपरि रावविण्या परि गांधींचा मज राम हवा

ज्ञानविज्ञान आणि माणुसकी यांचा मेळ घालणाऱ्या तत्त्वज्ञानाचे सूत्र इतक्या सुंदर रीतीने क्वचितच सांगितले गेले असेल. कवीच्या लालित्यपूर्ण व प्रवाही शैलीचे एक उत्तम उदाहरण म्हणून या कवितेचा निर्देश करता येईल.

## माझे घर

हे एक मधुर आणि जिव्हाळ्याने ओलावलेले स्वप्नचित्र आहे. मध्यवयाच्या उंबरठ्यावरून भूतकाळाकडे पाहावेसे वाटते, त्याप्रमाणे भविष्यकाळाकडेही 'स्वतःचे घर' हे प्रौढांना दिसणारे एक सार्वत्रिक स्वप्न आहे. पण या ठिकाणी या चित्राचा जो तपशील आपल्याला मिळतो तो मात्र सार्वत्रिक नाही. तो खास कविहृदयाचा निदर्शक आहे. त्यात मी आणि माझे यांच्याबरोबर खारीचा, फुलपाखरांचा आणि भविष्यकालीन तरुण कवींचाही समावेश आहे. कवीने केव्हातरी प्रसन्न मन स्थितीत पाहिलेले हे स्वप्नचित्र तितकेच प्रसन्न आणि हृदयंगम झाले आहे.

## श्यामा

शरत्कथा म्हणजे बंगाली कादंबरीकार शरद्चंद्र चतर्जी यांच्या कथा-कादंबऱ्या. प्रेम करण्याचे अपार सामर्थ्य, परिस्थितीमुळे आलेली अगतिकता, विलक्षण संयम व विलक्षण मोकळेपणा–अशा विविध आणि विरोधी गुणधर्मांचे हृदयस्पर्शी दर्शन शरद्-चंद्रांच्या नायिकांत घडते. अव्यक्ताचे बंधन पत्करणारे आणि तरीही व्यक्त होऊ पाहाणारे मधुर, निरागस प्रेम या कवितेत शब्दांकित झाले आहे. 'डाळिंबीची डहाळीशी' या कवितेत असाच अनुभव वेगळ्या संदर्भात प्रगट झाला आहे.

## सुटलेले वेड

कलावंताच्या आयुष्यात केव्हातरी अपरिहार्यपणे येणारी ही एक अवस्था. ही अवस्था वयाशीच संबंधित असते असे नाही अथवा आल्यानंतर ती कायम राहते असेही नाही. पण येते तेव्हा ती त्याला अतिशय अस्वस्थ करते यात शंका नाही. बाह्य व्यवहारांची कदर न करता, कलावंत कलेच्या साधनेत सर्वस्वाने रमून जातो, हे त्याचे वेड. ते नाहीसे झाल्याने काही व्यावहारिक फायदे त्याच्या पदरी पडतात, पण अंतरंगात एक पोकळी जाणवते.

## शारदेचा भुत्या

कवी आणि काव्य यांच्या संबंधावरील ही एक अत्यंत प्रभावी कविता. स्वतःला शारदेच्या देवळातील 'भुत्या' मानून कवीने त्याचे, त्याच्या उन्मादाचे आणि अखेरीस त्याच्या रितेपणाचेही जे चित्र रेखाटले आहे त्यात भावना आणि चित्रा-

त्मकता या दोन्हींचा सुंदर मिलाफ झाला आहे. ‘ मीच कोरडे ओढित मजवर तुझे जोडले नाते ’ हे काव्यसाधनेचे वर्णन फार मार्मिक व खूप सांगणारे आहे.

## झाडे झाली निळी निळी

पर्जन्यामुळे धूसर निळ्या झालेल्या सृष्टीचे हे वर्णन, शांत अशा पावसाच्या वर्णनातही कवीच्या मनाला अद्‌भुताचा प्रत्यय येतो व गूढ सुखाच्या भावनेने त्याचे मन अस्वस्थ होते.

घरे कांबळीं ओढून टक लाविती मुकाट
ओलावले उजेडाने त्यांच्या पाण्यांचे काठ

हे शब्दचित्र मनोहर आहे.

## हिमाद्रीहुनी भव्य नक्षत्रमौली

लोकमान्य टिळकांवरील ही कविता केवळ प्रासंगिक स्वरूपाची नाही. विषयानुकूल शब्दांत आणि वृत्तात रचलेले हे एक सुंदर स्तोत्र आहे. ‘ महा राष्ट्री ’ हे शब्द लेखनात तुटलेले आहेत. कविता लिहिताना ते मनात तुटलेले होते की नाही, कोणास ठाऊक !

## कामद्रुमाची डहाळी

दीर्घकाल म्लान असलेल्या कामना शरीर–मनात पुन्हा एकाएकी फुलून बहरून आल्या आणि त्यामुळे जीवनाला एक नवीन धुंद लाभली. राम, बोधिसत्व, ख्रिस्त, इत्यादींच्या दाखल्यांनी या अनुभवाचे- अनावश्यक असलेले–समर्थन करण्यात आले आहे. त्यामुळे कविता केंद्रापासून दूर जाते, ओघळते.

## आता नाही जवळ नि दूर

संत अद्वैतभावाने स्वतःच्या बाहेर जातो आणि जगाशी एकरूप होतो. काव्याच्या मुळाशी असलेल्या सौंदर्य, आनंद, सहानुभव इत्यादी वृत्ती कवीलाही केव्हा केव्हा या प्रवासाचा परवाना मिळवून देतात. या अवधूत आनंदावस्थेचे निवेदन प्रस्तुत कवितेत करण्यात आले आहे. येथे स्वतःत चूर होणे हे सर्वांत मिळून जाणे आहे. या अवस्थेत गीत स्वरातीत व प्रेम शरीरातीत होते.

## झाले हवेचेच दही

जमिनीत हरवलेल्या बीजांना कुरवाळणारा, त्यांना विकासाची वाट दाखव-णारा पहिला वादळी पाऊस पाहिल्यावर कवीच्या मनात एक सुंदर प्रतिमा आकारते :

लक्ष आंचळांनी दुभे निळी आकाशाची गाय

हवेचे दही होणे म्हणजे उसळत्या तुषारांनी हवा जड आणि शुभ्र होणे. चहूकडून आकाशात मेघ गर्जायला लागले म्हणजे रस्ता चुकलेल्या गाईप्रमाणे ते हंबरत आहेत अशी कल्पना मनात येते. ढगांनी वेढलेले पर्वत पुन्हा सपंख झाले आहेत असे वाटते व तुफानी समुद्राचा आवाज निर्मितीच्या शंखस्वरासारखा भासतो.

## प्रार्थना

काव्येतिहासातील प्रत्येक कालखंडाला स्वतःचे काही खास आवडते 'स्वर' असतात. त्याप्रमाणेच काही खास 'छंद' ही असतात. स्वराच्या म्हणजे आशयाच्या अनुरोधाने छंद म्हणजे आविष्काररूपही बदलत जाते हे खरे. परंतु काही अंशी स्वतंत्र-पणानेही ही रूपे बदलण्याची आवश्यकता निर्माण होते असे दिसून येते. बराच वापर झालेल्या हत्यारांप्रमाणे छंद-वृत्तेही कालांतराने बोथट होतात व व्यवहाराच्या बाहेर जातात. केशवसुतांपासून अलीकडील काळापर्यंतचा विचार केला तर श्लोकवृत्तांपासून जातिछंदा-पर्यंत, व जातिछंदांपासून मुक्तछंद, मुक्तकाव्यादि आविष्कारप्रकारापर्यंत असा हा प्रवास झालेला दिसतो. हे छंदाचे परिवर्तन आशयाच्या परिवर्तनाशी नेहमी बांधलेले असतेच असे नाही. मर्ढेकरांचा आशय नवा असूनही तो पादाकुलकासारख्या जुन्या पारं-परिक जातींतूनच प्रगट झाला. उलटपक्षी, अनिलांसारख्या ( त्या मानाने ) पारंपरिक समजल्या जाणाऱ्या कवीला रविकिरणांच्या अमदानीतच मुक्तछंद रूढ करणे जरूर वाटले.

बोरकर या बाबतीत बरेचसे तटस्थ व स्वतःच्या जागेवरच उभे आहेत असे दिसते. पहिली दहा वर्षे सोडली तरी तीसपस्तीस वर्षेपर्यंत त्यांच्या प्रगल्भ कवितेची कारकीर्द आहे. या काळात आविष्काराच्या बाबतीत अनेक प्रयोग झाले. परंतु बोर-करांनी ते फारसे संमत वा स्वीकृत केल्याचे आढळत नाही. याचे महत्त्वाचे कारण त्यांनी आपल्या संपूर्ण संग्रहाच्या प्रस्तावात सांगितले आहे. आंतरबाह्य संगीताचे अद्वैत साधल्याशिवाय आपले समाधान होत नाही असे त्यांनी म्हटले आहे. रागताल बरोबर घेऊनच कविता अवतीर्ण होते. टागोर-तांब्यांप्रमाणे त्या कवितेचा संगीत हा एक स्वभावधर्म आहे, केवळ अलंकार नव्हे. ( आणि म्हणूनच संगीतात मनसोक्त

न्हाऊनही त्यांची कविता भावगीताच्या अंगाला कधी सरकलेली दिसत नाही. ) या स्वभावधर्मामुळेच संगीतापासून किंबहुना गेयतेपासून दूर जाणारे छंद-प्रयोग त्यांना सहसा रुचले नाहीत. नववधू, लवंगलता, चंद्रकांत, विविध गझलप्रकार, यांसारख्या संगीतानुकूल जातींचाच त्यांच्या काव्याने बव्हंशी अवलंब केला आहे.

प्रार्थना ही एक अपवादात्मक कविता, जीत बोरकरांनी मुक्तकाव्याचा स्वीकार केला आहे.: ' मुक्तकाव्य ' हा मुक्तछंदापेक्षाही अधिक सैल व अंतर्गत लयीखेरीज दुसरे कोठलेही बंधन न मानणारा काव्यप्रकार. यात अक्षरांचे उच्चार गद्याच्या धर्तीनेच करावयाचे असतात.

## वाढत्या सांजवेळी

लोकवाङ्मयातील स्त्रीगीतांशी या कवितेची जवळीक आहे. तशाच प्रकारच्या गोडव्याने, कल्पकतेने आणि भावनेने हे गीत शिगोशीग भरलेले आहे. कवितेतील विषय व वातावरण ही काळाच्या दृष्टीने दूरची व म्हणूनच अधिक मनोवेधक वाटतात. कासव, तुळस, इत्यादिकांभोवती विणलेल्या कल्पना हृद्य आहेत.

## दीस कसा तरी जातो

मातीच्या पणतीच्या रूपकातून ही कविता रातकालातील ( बहुधा जीवनाच्या ) कातरता प्रगट करत आहे. वात पेटवली आहे पण तेल पिणारी पणतीची माती पुरेशी तापत नाही आणि वातीला चांगले पेटू देत नाही. हा मूढ ' आधार–माती' चा शाप आहे का ?

## चित्रवीणा

' चित्रवीणा ' आणि ' क्षितिजी आले भरते ग ' या कविता निसर्गाचा सादर्यानुभव व्यक्त करणाऱ्या आहेत. ' क्षितिजा 'मध्ये शब्दांच्या मधुर लयीवरती तर ' चित्रवीणे 'त तपशीलवार वर्णनावरती अधिक भर आहे. वर्ख, कुंकुमटिबे, इंद्राचे राऊळ इत्यादिकाच्या प्रतिमा वैशिष्ट्यपूर्ण आहेत.

## मंद असावे जरा चांदणे

'फांद्यामधुनी चंद्र दिसावा' आणि 'मंद असावे...' या दोन्ही कविता 'असावे'-च्या कक्षेतील प्रौढ मनातील स्वप्नचित्रे रेखाटणाऱ्या आहेत. ही दोन्ही स्वप्ने चांदण्यातली, निसर्गाच्या सान्निध्यातली आणि सखीच्या सहवासाची आहेत. दोन्हीतील भाववृत्ती हळवेपणाची व काहीशी सांत्वनाची आहे.

## ती एक याद

गतकालात विरून गेलेले पण स्मृतीला बिलगून बसलेले हे एक भाव चित्र-आयुष्याच्या उत्तरार्धात अशा आठवणीचे रंग अधिक गडद होतात, वर्तमानाला दिलासा देणारा अमृतरस त्यातून झिरपत असतो. हे गडद रंग या कवितेने चांगले पकडले आहेत.

## कळत जाते तसे

ही कविता ( आणि पुढील ' फांदीसारखी झुकते सांज ' ) वृत्ताच्या दृष्टीने एक वेगळा प्रयोग करणारी, किंवा स्वीकारणारी आहे. हा मुक्तछंदाचा एक प्रकार. कळत जाते–तसे कशी–जवळचीही-होतात दूर असे यती घेऊन हा छंद वाचायचा. अक्षरांचे उच्चार गद्यसदृश रचनेत, महत्त्व तालाचे, मात्रांच्या वा अक्षरांच्या संख्येचे नाही.

## इंद्रदिनांचा असर सरेना

' याद ' प्रमाणे हेही एक स्मरणचित्र. परंतु अशा स्वरूपाच्या कवितांतील कवीची ही सर्वोत्कृष्ट कविता. रंग, गंध आणि रक्त यांच्या ' लयी 'भोवती फुलणारी ही कविता शब्दांनी, लयीने आणि भावनेनेही इतकी गहिरलेली आहे,की तिच्या प्रवाहात शिरणारा वाचक स्वतःला न कळत शेवटपर्यंत जाऊन पोचतो. आणि हा केवळ लयीचा अथवा रचनेचा प्रभाव नव्हे. असफल असूनही सफलतेचे दान देणाऱ्या एका सुंदर प्रणयस्वप्नाचा प्रत्ययही त्याच्या रसिकतेला येतो.

इंद्रदिनांचा असर म्हणजे त्या दिव्य अलौकिक दिवसांचा प्रभाव.

## चालले हे उंट कोठे ?

कोणत्या तरी दूरवरच्या साध्यासाठी आपल्या आयुष्याचे वाळवंट करणाऱ्या, ' पाणियाला पाठमोरी ' अशी तृषा असलेल्या मुशाफिरांच्या प्रवासाचे छोटे पण सुंदर चित्र येथे रेखाटले आहे.

## शिशासारखी भरली

दुपारच्या जळत्या उन्हाने करपलेल्या, मृतवत् झालेल्या सृष्टीच्या या चित्राला शेवटच्या चरणातील ' त्रिशूलाप्रमाणे ' येणाऱ्या कावळ्याने गती आणि सुंदरताही दिली आहे.

## ( १ ) असावे ( २ ) तू गेल्यावर

या दोन्ही कविता आविष्काराच्या दृष्टीने बऱ्याच साध्या सरळ, पण कवीची कौटुंबिक भावना हळवेपणाने प्रगट करणाऱ्या आहेत. ‘ तू गेल्यावर ’ ही कविता तिच्यातील अर्थपूर्ण तपशिलामुळे आणि कवीच्या मनात शेवटी आलेल्या अनिष्टाच्या शंकेमुळे हृदयस्पर्शी वाटते. प्रौढ माणसाच्या मनातील ही एक चिरंतन व्यथा. जिच्या संगतीत जीवनाचा बहुतांश प्रवास झाला त्या व्यक्तीचे अस्तित्व सगळ्या आंतर्बाह्य व्यवहारात ओवलेले असते. थोड्या काळासाठी ती व्यक्ती दूर झाली तरी सर्व व्यवहार थांबल्यासारखे, अगतिक झाल्यासारखे होतात. सर्वत्र एक रितेपणा उत्पन्न होऊन—

मुले मांजरापरी मुकी अन्
 दर दोघांच्या मधे धुके

अशी अवघड अवस्था होते. या अवस्थेत ती व्यक्ती कायमची दूर झाली तर आपली स्थिती काय होईल—ही शंका काळजाला दंश करते. ‘ इंद्रदिनांचा अेसर सरेना ’ यांसारख्या छंद कवितांची संगीतमय अलंकारपूर्ण शैली आणि या कवितेचा साधा पण भावशील आविष्कार, यातील फरक लक्षात घेण्यासारखा आहे. आशयाशी आविष्कार कसा बांधलेला असतो हे येथे ध्यानात येते.

## जळणाऱ्या जळत रहा

सारीच माणसे आपल्या जीवनात कमीअधिक जळत असतात. पण कित्येकांचे जळणे आपल्या ज्वालांनी आकाशाला भिडणारे असते. स्वार्थाच्या संकुचित कक्षेत त्यांचे हे ‘ जळणे ’ नसते. कोठल्या तरी दूरच्या ध्येयासाठी, स्वार्थाचे विसर्जन परार्थात करण्याच्या वृत्तीतून ते उद्भवलेले असते. हे जळणे जगाला प्रकाश देऊन जाते, नुसती राख नव्हे.

## कृतार्थ

‘ याद ’ प्रमाणे ही आठवण नव्हे. हे एक वर्तमानातील चित्र. पण भूतकालातील स्वप्नाशी धागा जोडणारे. कवितेची सुरुवात काहीशी शृंगाराच्या स्वरावर होते पण पुढे ती शांत अशा कृतार्थतेच्या भावनेत विसर्जन पावते. ‘ प्रार्थना ’ प्रमाणे ही कविताही ‘ मुक्तकाव्या ’ त लिहिलेली आहे.

— कुसुमाग्रज

दा. क्र. 78589